

आजच्या अंकासोबत उंबरठा पुरवणी

लोकांचे दैनिक

# लोकशाही वार्ता

epaper.lokshahivarta.in

नागपूर। वर्धा। चंद्रपूर। गडचिरोली। भंडारा। गोंदिया। अमरावती। यवतमाळ । अकोला। वाशीम। बुलडाणा-खामगाव जिल्ह्यात वितरित होणारे दैनिक


ऋषभ पंत लखनौ सुपर जायंट्सचा नवा कर्णधार / पान ८

वर्ष-१५, अंक- ३०५, पृष्ठे : ८ + गुडमॉर्निंग + ८, किंमत ५.०० रुपये | नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५ | RNI No. MAHMAR/2010/35482 | अग्रलेख - गमन आणि आगमन! ******


## दृष्टिक्षेप

### २६ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींना हप्ता

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे जानेवारी महिन्याचे पैसे २६ जानेवारीपूर्वी त्यांच्या खात्यात जमा होतील, असे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. कोणत्याही परिस्थितीत ही योजना सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. लाडकी बहीण योजना सुरू ठेवताना या योजनेच्या लाभार्थ्यांना चाळण लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचवेळी लाभार्थी महिलांना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याचे जाहीर केले आहे. याबाबत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, काळजी करू नका. या योजनेचा लाभ गरजू महिलेला मिळाला पाहिजे. जी व्यक्ती श्रीमंत आहे, टॅक्स भरते, नोकरी आहे, त्यांच्याबाबत वेगळा विचार होणार आहे. लाडकी बहीण योजना ज्या मायमाऊलीपर्यंत पोहोचायला हवी होती, त्यांच्यापर्यंत ही योजना पोहोचवण्याचे काम महिला आणि बालविकास विभागाने केले आहे.

### दिल्ली विमानतळावर २६ जानेवारीपर्यंत विमानसेवा बंद

**नवी दिल्ली :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली विमानतळावरील विमानसेवा पूर्णपणे बंद करण्यात आल्याचे वृत्त आहे. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील (आयजीआयए) विमान वाहतूक तात्पुरती प्रतिबंधित करण्यात येत असल्याचे विमान प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने (डायल) शनिवारी जाहीर केले आहे की, १९ जानेवारी २०२५ (रविवार) पासून २६ जानेवारी २०२५ (रविवार) पर्यंत येथील विमानतळावर कोणतेही विमान उतरणार नाही किंवा उड्डाण करणार नाही. खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

### दिनेश वाघमारे राज्याचे नवे निवडणूक आयुक्त

**मुंबई :** ज्येष्ठ सनदी अधिकारी दिनेश वाघमारे यांची राज्याचे नवीन निवडणूक आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नावाची शिफारस राज्यपालांकडे केली होती. त्यावर राज्यपालांनी शिक्कामोर्तब केलं आहे. राज्यातील महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी नवीन निवडणूक आयुक्तांवर असणार आहे. दिनेश वाघमारे पुढील पाच वर्षांसाठी राज्याचे निवडणूक आयुक्त असतील. त्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती मिळणार नाही. मंत्रिपरिषदेने नव्या निवडणूक आयुक्तांची निवड करण्याचे सर्वाधिकार हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले होते. त्यानुसार, मुख्यमंत्र्यांनी वाघमारे यांच्या नावाची शिफारस केली होती.

### सोने चांदी

| | |
|---|---|
| सोने | ८१,२३०/- |
| चांदी | ९६,५००/- |

* सोने-२४ कॅरेटचे दर, चांदी प्रती किलो

### तापमान

| शहर | कमाल / किमान |
|---|---|
| नागपूर | ३१.० / ११.२ |
| वाशीम | ३१.६ / १४.४ |
| अकोला | ३२.८ / १३.५ |
| बुलडाणा | २९.६ / १४.६ |
| अमरावती | ३१.६ / १४.२ |
| यवतमाळ | ३०.७ / १२.८ |
| वर्धा | ३१.५ / १२.९ |
| चंद्रपूर | ३०.४ / १४.२ |
| गडचिरोली | ३१.० / १३.० |
| भंडारा | ३०.० / १३.० |
| गोंदिया | २९.८ / ११.६ |

# अक्षय शिंदेचा एन्काऊंटर फेक!

## न्यायालयीन समितीचा धक्कादायक अहवाल

**वृत्तसंस्था/मुंबई**

बदलापूर शाळेतील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेंच्या कथित बनावट चकमकीचा चौकशी अहवाल मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आला. आरोपी अक्षय शिंदेला घेऊन जाणाऱ्या पाच पोलिसांकडून वापरलेले बळ अनावश्यक होते आणि त्याच्या मृत्यूसाठी हे पाच पोलिस जबाबदार असल्याचे ठाणे दंडाधिकारी चौकशी अहवालात म्हटले आहे. त्यामुळे आता न्यायालयीन चौकशी समितीच्या अहवालावरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने



खुल्या न्यायालयात अहवाल वाचून दाखवला. 'गोळा केलेल्या साहित्यानुसार आणि एफएसएल अहवालानुसार, मृताच्या पालकांचे आरोप योग्य आहेत आणि हे पाच पोलिस त्याच्या मृत्यूसाठी जबाबदार आहेत असे म्हटले जाते', असे न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी अहवाल वाचून दाखवताना म्हटले.

बदलापुरातील एका शाळेतील तीन चिमुकलींच्या अत्याचार प्रकरणातील आरोपीचा एन्काऊंटर करण्यात आला होता. आरोपी अक्षय शिंदे याने पोलिसांच्या गाडीतून रिव्हॉल्व्हर हिसकावून पोलिस पथकावर गोळीबार केला असल्याची माहिती देण्यात आली होती. त्यावेळी दावा करण्यात आला होता की, आरोपीने पोलिस पथकावर गोळीबार केला, ज्यात पोलिस अधिकारीही जखमी झाले. त्यानंतर पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी केलेल्या गोळीबारात अक्षय शिंदे ठार झाला.

### फेक एन्काऊंटरला पाच पोलिस जबाबदार

**अक्षय शिंदेसोबत झालेल्या झटापटीत पाच पोलिसांनी वापरलेला बळाचा वापर अनावश्यक होता आणि त्याच्या मृत्यूसाठी हे पाचही पोलिस जबाबदार आहेत. पोलिसांच्या म्हणण्यांनुसार, अक्षय शिंदेंने त्यांच्यावर गोळीबार केला होता. मात्र मृताचे बंदुकीवर बोटांचे ठसे नाहीत. स्वसंरक्षणार्थ गोळीबार करणाऱ्या पोलिसांचा वैयक्तिक बचाव अवास्तव आणि संशयास्पद आहे, असे अहवालात म्हटले आहे.**

### पोलिसांवर एफआयआर नोंदवा-न्यायालय

**न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने संकलित केलेले साहित्य आणि एफएसएल अहवालानुसार मृताच्या पालकांचे आरोप योग्य आहेत आणि हे पाच पोलिस त्याच्या मृत्यूला जबाबदार आहेत, असे म्हटले. अहवालानुसार पोलिस कर्मचारी परिस्थिती सहज हाताळू शकले असते आणि बळाचा वापर न्याय्य ठरू शकत नाही. त्यामुळे राज्याने या पोलिसांवर एफआयआर नोंदवणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.**

# दोषी संजय रॉयला जन्मठेपेची शिक्षा

## कोलकाता येथील बलात्कार प्रकरण



**वृत्तसंस्था/कोलकाता**

कोलकाता येथील आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील बलात्कार हत्याकांडातील दोषी संजय रॉय याला सियालदाह न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यासोबतच न्यायालयाने ५० हजार रुपयांचा दंडही ठोठावला आहे. आरजी कार हॉस्पिटलमधील घटनेनंतर सुमारे १६२ दिवसांनी, न्यायालयाने शनिवार, १८ जानेवारी रोजी निकाल दिला आणि संजय रॉय याला दोषी घोषित केले.

न्यायालयाने म्हटले की, हा किरकोळ गुन्हा नाही. पण न्यायालयाने त्याला दुर्मिळातील दुर्मिळ गुन्हा म्हटले जाऊ शकत नाही. शनिवारी न्यायालयाने संजयला दोषी घोषित केले होते.

सियालदाह न्यायालयाच्या न्यायाधीशांनी त्यांच्या निर्णयात म्हटले आहे की या प्रकरणातील आरोपी संजय रॉय दोषी आढळला आहे. न्यायालयाने फॉरेन्सिक अहवालावर निर्णय घेतला. याअंतर्गत न्यायालयाने संजय रॉय याला या प्रकरणात दोषी ठरवले.

शिक्षेच्या घोषणेपूर्वीच्या सुनावणीदरम्यान, संजय याने न्यायाधीशांसमोर बाजू मांडली. त्याने न्यायाधीशांना सांगितले की, मी दोषी नाही. मला अडकवले जात आहे. मी कोणताही गुन्हा केलेला नाही. बरेच काही उद्ध्वस्त झाले आहे. मी कोणताही गुन्हा केलेला नाही. माझ्यावर गुन्हा कबूल करण्यासाठी दबाव आणला जात आहे. मी रुद्राक्षाची माळ घातली होती. जर मी हे केले असते तर माझी रुद्राक्षाची माळ तुटली असती, असा दावा त्याने न्यायालयात केला.

### जर कठोर शिक्षा झाली नाही तर समाजाचा विश्वास उडेल - सीबीआय

संजय म्हणाला की त्याला अशा गुन्ह्याची शिक्षा मिळत आहे जो त्याने केलाच नाही. दरम्यान, सीबीआयने म्हटले आहे की संजयचा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ आहे. जर कठोर शिक्षा दिली नाही तर समाजाचा विश्वास उडेल. न्यायालयाने म्हटले की हा किरकोळ गुन्हा नाही. महिला डॉक्टरची निर्घृण हत्या करण्यात आली.

# मी पुन्हा येईन म्हणत खरंच आलात, पुन्हा पुन्हा या

## दावोसमधील चिमुरड्याचे बोल, फडणवीसांनी घेतला गालगुच्चा

**वृत्तसंस्था/दावोस**

दावोस येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वित्झर्लंड दौऱ्यावर आहेत. यावेळी फडणवीस महाराष्ट्र मंडळाच्या एका कार्यक्रमातही सहभागी झाले. एका चिमुरड्याने 'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन असे तुम्ही म्हणाला होतात, आणि तुम्ही खरंच पुन्हा आलात, हे मला खूप छान वाटतेय, असे सांगत मुख्यमंत्र्यांचे मन जिंकले. चिमुरड्याने मराठी अभिमान गीताने मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वित्झर्लंडमध्ये स्वागत केले.

हा मुलगा म्हणाला की, माननीय प्रिय देवेंद्र फडणवीस काका, माझ्याकडून तुम्हाला एक छोटंसं



### मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यात डेटा सेंटर्स, ऑटोमोबाइल, सेमीकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रांत मोठ्या संख्येने सामंजस्य करार होणार आहेत.

गिफ्ट, असे म्हणत चिमुकल्याने फडणवीस यांना एक ग्रिटींग कार्ड दिले. तसेच 'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन असं तुम्ही म्हणाला होतात, आणि तुम्ही खरंच पुन्हा आलात, हे मला खूप छान वाटतंय. असंच तुम्ही पुन्हा पुन्हा येत राहा, आता मी तुमचे स्वित्झर्लंडमध्ये स्वागत करणार आहे', असे म्हणत 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी. धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी', अशा मराठी अभिमान गीताच्या चार ओळी चिमुकल्याने गाऊन दाखवल्या. त्यानंतर देवेंद्र फडणवीसांनाही त्याचा गालगुच्चा घेण्याचा मोह आवरला नाही.

### काँग्रेसचे नाना पटोले यांची टीका

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनीही राज्यातील उद्योगपतींना दावोसला घेऊन दौरा केला होता. त्याची नक्कल देवेंद्र फडणवीस यांनी करू नये. महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर असल्याचा दावा भाजप सरकार करत आहे. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे. महाराष्ट्राची घसरण झाली असून गुंतवणुकीच्या नावाखाली दावोसला जाऊन जनतेच्या पैशाची उधळपट्टी करू नका.

# ट्रम्प अध्यक्षपदी विराजमान

## दुसऱ्यांदा सांभाळणार महासत्ता अमेरिकेचे प्रमुखपद

**वृत्तसंस्था/वॉशिंग्टन**

जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा विराजमान झाले आहेत. भारतीय वेळेनुसार सोमवारी रात्री साडेदहा वाजता डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतली. हा सोहळा वॉशिंग्टन डीसीमधील यूएस कॅपिटल इमारतीत पार पडला. कडाक्याच्या थंडीमुळे शपथविधी सोहळा इनडोअर ठेवण्यात आला होता. सध्या राजधानीचे तापमान उणे ५ अंश सेल्सिअस आहे.

शपथविधी सोहळ्याला इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, अर्जेंटिनाचे अध्यक्ष जेवियर मेली, भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्यासह ७०० हून अधिक नेते आणि सेलिब्रिटी उपस्थित होते. शपथ घेतल्यानंतर ट्रम्प यांनी राष्ट्राला संबोधित केले. त्यानंतर त्यांनी राष्ट्राध्यक्षांच्या ताफ्यासह कॅपिटल हिलहून व्हाईट हाऊसपर्यंत प्रवास केला. दरम्यान शपथविधीपूर्वी ट्रम्प वॉशिंग्टन डीसीमधील सेंट जॉन्स चर्चमध्ये गेले. येथे त्यांनी प्रार्थना केली. दुसरीकडे, पद सोडण्याच्या काही तास आधी मावळते राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी अनेक लोकांना आगाऊ माफी दिली.



नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि मेलानिया ट्रम्प यांचे व्हाईट हाऊस येथे आगमन झाल्यानंतर मावळते अध्यक्ष जो बायडेन आणि जिल बायडेन यांनी त्यांचे स्वागत केले.

### तिसरे महायुद्ध होऊ देणार नाही

**शपथविधी सोहळ्यापूर्वी बोलताना ट्रम्प यांनी तिसरे महायुद्ध थांबवण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्यांनी वॉशिंग्टन डीसीमधील कॅपिटल वन अरेना येथे विजयी रॅलीला संबोधित केले. ही रॅली मेक अमेरिका ग्रेट अगेन या थीमवर आयोजित करण्यात आली होती. रॅलीमध्ये ट्रम्प यांनी काही तासांत बायडेन यांचे सर्व निर्णय मागे घेण्याचे आश्वासन दिले. ट्रम्प म्हणाले, आम्ही आमची मालमत्ता परत मिळवणार आहोत. आमचे प्रशासन लवकरच देशाच्या सीमांवर पुन्हा नियंत्रण मिळवेल. यावेळी अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठी हद्दपार योजना राबणार आहोत.**

**मोदींच्या 'गुप्त पत्रा'सह जयशंकर शपथविधीला**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर अमेरिकेत पोहोचले. सूत्रांचा दावा आहे की जयशंकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक 'गुप्त पत्र'ही सोबत नेले आहे. त्यांनी ते पत्र अध्यक्ष ट्रम्प यांना दिले.

# सैफवर हल्ला करणारा निघाला नॅशनल प्लेयर!

## चांगली शरीरयष्टी असूनही सैफ मात देऊ शकला नाही

**वृत्तसंस्था/मुंबई**

बालिवूड अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोपी बांगलादेशचा नॅशनल प्लेयर निघाला आहे. पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे की, हल्लेखोर बांगलादेशातील राष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू होता. कदाचित यामुळेच सैफ, चांगली शरीरयष्टी असूनही, त्याला मात देऊ शकला नाही.

यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद



असून तो बांगलादेशी आहे. त्याची चौकशी सुरू आहे. दरम्यान, शहजादने बांगलादेशमध्ये राष्ट्रीय पातळीवर कुस्ती खेळल्याचे वृत्तही समोर आले आहे. यामुळेच तो सामान्य उंचीचा असला तरी, धडधाकट व्यक्तिमत्व असलेला सैफ त्याला पकडू शकला नाही. पोलिसांनी त्याची चौकशी केली तेव्हा शहजादने सांगितले की, तो कमी वजनाच्या गटात राष्ट्रीय पातळीवर कुस्तीगीर आहे. यामुळेच त्याला सैफच्या फ्लॅटवरून निसटून जाण्यास फारशी अडचण आली नाही. आता पोलिस शहजादच्या जबाबांची पडताळणी करतील.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहजादने म्हटले आहे की, सैफची इमारत फारशी उंच वाटली नाही. तो तेथे गेला होता आणि तेथील सेक्युरिटी कोणत्या वेळी सैल असते, हे त्याला माहीत होते. तो बांगलादेशमध्ये कुस्तीपटू होता. त्याला तेथे काम नव्हते म्हणून तो कामाच्या शोधात मुंबईत आला होता. येथून परतण्यासाठी ५० हजार रुपयांची आवश्यकता होती. त्यामुळे तो चोरी करण्यासाठी गेला होता.

# युकाँचे ६० पदाधिकारी तत्काळ पदमुक्त

**वृत्तसंस्था/नागपूर**

संघ मुख्यालयाला घेराव घालण्यासाठी आयोजित युवक काँग्रेसच्या आंदोलनात सहभाग न नोंदवल्याबद्दल युवक काँग्रेसच्या ६० पदाधिकाऱ्यांना सोमवारी तडकाफडकी पदमुक्त करण्यात आले आहे. त्यामध्ये विजय वडेट्टीवार यांची कन्या शिवानी वडेट्टीवार आणि आमदार विकास ठाकरेंचे सुपूत्र केतन ठाकरे यांचाही समावेश आहे.

युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब आणि प्रदेश अध्यक्ष कुणाल राऊत यांच्या नेतृत्वात नागपूरच्या महाल परिसरातील देवडिया काँग्रेस भवनातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला. आंदोलक संघ मुख्यालयाकडे जात असतानाच त्यांना चिटणवीस पार्कजवळ पोलिसांनी ताब्यात घेतले. या आंदोलनात शिवानी वडेट्टीवार, केतन ठाकरे यांच्यासह अनेकजण अनुपस्थित होते.

# पालकमंत्रिपदावरून कोणतेही वाद नाहीत

## महसूल मंत्री बावनकुळे यांचा दावा

**वृत्तसंस्था/मुंबई**



महायुती सरकारमध्ये पालकमंत्रिपदावरून कोणतेही वाद नाहीत, काही कुरबुरी असतील त्यावर चर्चेतून मार्ग निघेल, अशी स्पष्टोक्ती महसूल मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

सोमवारी माध्यमांशी संवाद साधताना ना. बावनकुळे म्हणाले, सातारा, संभाजीनगर, यवतमाळ येथे आमचे मंत्री असतानासुद्धा शिवसेनेला पालकमंत्रिपद देण्यात आले आहे. पालकमंत्रिपदाबाबत तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी मिळून निर्णय घेतला आहे. महायुतीचे सरकार हे समन्वयाने चालवावे लागते. ठाण्यापासून संपूर्ण कोकणच्या पट्ट्यात राष्ट्रवादीला कुठेच पालकमंत्रिपद मिळाले नव्हते. त्यामुळे त्यांच्याकडे रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देण्याचा निर्णय सवार्नुमते घेण्यात आला. तसेच, नाशिक येथे आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गिरीश महाजन यांच्याकडे पालकमंत्रिपद देण्याची मागणी असल्याने निर्णय घेण्यात आला, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

ज्या ज्या वेळी राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार येते त्या त्या वेळी काही घटकांकडून महाराष्ट्र अशांत केला जातो, असेही बावनकुळे यांनी सांगितले. पण, विरोधकांचा हा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही असे ते म्हणाले.

### सत्ता न मिळाल्याने विरोधक अस्वस्थ

सत्ता न मिळाल्याने विरोधक अस्वस्थ असून, त्यांचा मानसिक पराभव झाला आहे. त्यामुळेच विरोधक सैफ अली खान यांच्यावरील हल्ला प्रकरणाचे तसेच बीड आणि परभणी येथील घटनांचे राजकारण करत आहेत. वास्तविक, अशा घटनांचे कोणीही अजिबात राजकारण करू नये. संजय राऊत आणि विजय वडेट्टीवार यांनी आमच्या महायुतीकडे जास्त लक्ष देण्यापेक्षा आपली महाविकास आघाडी कशी टिकेल, याकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचा टोलाही या वेळी लगावला.


# ताप आला तेव्हा गोमूत्र प्राशन केल्याने बरा झालो

## आयआयटी मद्रासच्या संचालकांचा दावा : गोमूत्राचे औषधी गुणधर्म सांगणारा व्हिडिओ व्हायरल

**वृत्तसंस्था/चेन्नई**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) मद्रासचे संचालक व्ही. कामकोटी यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये त्यांनी गोमूत्राच्या औषधी गुणधर्मांबद्दल सांगितले आहे. एकदा खूप ताप आला होता, तेव्हा गोमूत्र प्राशन केल्याने बरा झालो, असा दावा कामकोटी यांनी त्यात केला आहे.

व्ही. कामकोटी १५ जानेवारी रोजी मट्टू पोंगल दिवशी आयोजित गो संरक्षण शाळेमध्ये आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. देशी



गायींचे संरक्षण आणि सेंद्रिय शेतीचे महत्त्व यावर बोलताना व्ही. कामकोटी यांनी गोमूत्राच्या अँटी-बॅक्टेरियल, अँटी-फंगल आणि पचनक्रिया सुधारण्याच्या गुणधर्मांबद्दल सांगितले. इरिटेबल बोवेल सिंड्रोम सारख्या मोठ्या आतड्यांशी संबंधित समस्यांसाठी गोमूत्र उपयुक्त असल्याचेही ते म्हणाले.

कामकोटी यांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेस आणि द्रमुक नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. द्रमुकने ते सत्याच्या विरुद्ध आणि लज्जास्पद असल्याचे म्हटले आहे.

### कामकोटींचे वक्तव्य हास्यास्पद - द्रमुक

**डीएमके नेते टी. के. एस. एलंगोवन म्हणाले की, कामकोटींचे वक्तव्य हास्यास्पद आहे. देशाची शिक्षणव्यवस्था बिघडवणं हेच केंद्र सरकारचे धोरण असल्याचं पाहायला मिळत आहे. तर के. रामकृष्णन म्हणाले की, कामकोटी यांनी जे काही दावे केले आहेत त्याबाबतचे पुरावे देखील सादर करायला हवेत, अन्यथा त्यांनी माफी मागावी. त्यांनी माफी मागितली नाही तर आम्ही त्यांच्याविरोधात आंदोलन करू. दरम्यान, काँग्रेस नेते कार्ती पी. चिदंबरम म्हणाले की, आयआयटी मद्राससारख्या संस्थेच्या संचालकाने अशा प्रकारचं वक्तव्य करणे अनुचित आहे.**

### गोमूत्र प्राशन केल्याने जिवाणू संक्रमण -डॉक्टर

**दरम्यान, डॉक्टर्स असोसिएशन फॉर इक्वेलिटीचे डॉ. जी. आर. रवींद्रनाथ म्हणाले की, 'गोमूत्र प्राशन केल्याने जिवाणू संक्रमण होऊ शकतं आणि हे एक वैज्ञानिक सत्य आहे.' अंधश्रद्धेला खतपाणी घातल्याबद्दल रवींद्रनाथ यांनी केंद्रातील भाजपा सरकारचा निषेध नोंदवला.**

# शिवसेनेत फुटीच्या बातम्या खोट्या

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची संजय राऊतांच्या दाव्यावर प्रतिक्रिया

**वृत्तसंस्था/पुणे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतही फुटीची शक्यता विरोधकांनी वर्तवली असताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी या शक्यता फेटाळून लावल्या आहेत. शिवसेनेत (शिंदे) फूट पडण्याच्या बातम्या खोट्या आहेत, असे ते म्हणाले.

दावोस येथे होत असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेला (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) हजेरी लावण्यासाठी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत स्वित्झर्लंडमधील झुरिच येथे गेले आहेत. त्यानंतर इकडे राज्यात शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी त्यांच्याबद्दल मोठा दावा केला आहे. भाजपा आता एकनाथ शिंदे यांना बाजूला करेल. तसेच शिवसेनेत आता नवा 'उदय' होईल, असे



विरोधकांचे म्हणणे आहे. दरम्यान खा. संजय राऊतांच्या दाव्यासंबंधी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी हे खोटे असल्याचे स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ह्याला काही अर्थ नाही. तथ्यहीन बातम्या आहेत. उगाच कारण नसताना अशा प्रकारच्या बातम्या पसरवून देणे बरोबर नाही, असे त्यांनी स्पष्ट केले

पुढे बोलताना अजित पवार यांनी विरोधकांच्या दाव्यांबद्दल बोलताना उदाहरणदेखील दिले. ते म्हणाले की, मी बारामतीला होतो, तेव्हा सैफच्या घरावर हल्ला झाला होता. त्यानंतर मुंबईतील कायदा सुव्यवस्था ढासळल्याबद्दल अनेक बातम्या देण्यात आल्या होत्या. पण आरोपीला पकडल्यानंतर लक्षात आलं की तो बांगलादेशातून कलकत्त्यात आला, तेथून मुंबईला आला. तिथं हाऊसकिपींगचं काम काही दिवस केले. तो काही सराईत गुन्हेगार देखील नव्हता. तो अचानक त्या बिल्डिंगमध्ये शिरला. वास्तविक बिल्डिंगने अंतर्गत बंदोबस्त ठेवण सौसायट्यांचा अधिकार आहे. बाहेर काही झालं तर पोलीस यंत्रणा काम करते, असे ते म्हणाले.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. यावरून आता 'शॅडो पालकमंत्री' हे धनंजय मुंडे असतील, अशी चर्चा सुरू आहे. याबद्दल विचारण्यात आले असता अजित पवार म्हणाले की, तुम्ही अजित पवारला किती वर्षांपासून ओळखता? खूप वर्ष अजित पवार कसे वागतो? मी तिथं गेल्यावर लोकांना कळेल, असा दावा त्यांनी केला.

### शिंदे रुसले तेव्हाच 'उदय' होणार होता- संजय राऊत



**एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेते आणि उद्योग मंत्री उदय सामंत दावोसला गेले आहेत. याबाबत बोलताना संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उदय सामंत यांना दावोसला नेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे मंत्री उदय सामंत यांच्याबरोबर २० आमदार आहेत. सरकार स्थापन करताना मुख्यमंत्री पदावरून जेव्हा एकनाथ शिंदे रुसले होते, तेव्हाच हा उदय होणार होता. पण एकनाथ शिंदे सावध झाले, असा दावा त्यांनी केला.**

# मक्यापासून इथेनॉल निर्मिती बाबतचा नवा निर्णय

**वृत्तसंस्था/मुंबई**

उसाच्या रसापासून इथेनॉलचे उत्पादन करणाऱ्या आसवनी प्रकल्पांच्या श्रेणीत सुधारणा करून, ऊस गाळप हंगाम संपल्यानंतर मका किंवा अन्य अन्नधान्यांपासून वर्षभर इथेनॉल निर्मितीला चालना दिली जाणार आहे. त्यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालय आणि राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने पुढाकार घेतला आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील सहकारी साखर कारखान्यांतून होणाऱ्या इथेनॉल उत्पादनाला अधिक चालना देण्यासाठी महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांच्या बैठकीचे आयोजित करण्यात आले होते. बैठकीला सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापकीय संचालक, राज्य साखर संघांचे व्यवस्थापकीय संचालक डी. के. वर्मा, एनसीडीसीचे संचालक गिरराज अग्निहोत्री, महाराष्ट्राचे साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार आदी उपस्थित होते.

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, सहकार क्षेत्राला आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालयाने साखर कारखान्यांच्या आसवनी प्रकल्पांच्या श्रेणीत सुधारणा करण्याला हिरवा कंदील दिला आहे. उसाचा गाळप हंगाम संपल्यानंतर कारखान्यांमधून इथेनॉल निर्मितीला मर्यादा येतात. त्यामुळे हंगाम संपल्यानंतरच्या काळात अन्नधान्य विशेषतः मक्यापासून इथेनॉलचे उत्पादन केल्यास हे प्रकल्प वर्षभर चालतील आणि त्यातून कारखान्यांना आर्थिक स्थर्य मिळेल, असे केंद्र सरकारला सुचविण्यात आले होते.

### सहकारी साखर कारखान्यांना मोठा दिलासा

### केंद्रीय सहकार मंत्री अमित शहांचा पुढाकार

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सहकारी साखर कारखान्यांतून वर्षभर इथेनॉल निर्मिती सुरू राहण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आसवनी प्रकल्पांचे मल्टिफीडमध्ये रुपांतर करण्यासाठी सवलतीच्या व्याज दराने मुदत कर्ज दिले जाणार आहे. तेल कंपन्यांकडून प्राधान्याने सहकारी कारखान्यांकडून इथेनॉल खरेदी केली जाणार आहे, अशी माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

# बेकायदा पिस्तूल हाताळताना 'मिसफायर'

**वृत्तसंस्था/पुणे**

बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्या एका सराइत गुन्हेगाकडून पिस्तूल



हाताळताना 'मिसफायर' झाले. या मिसफायरमध्ये दुसऱ्या सराईत आरोपीच्या खांद्यातून गोळी आरपार गेल्याने तो गंभीर जखमी झाला. ही घटना कोंढवा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणातील दोघेही इस्टेट एजंट म्हणून काम करत असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, याप्रकरणात उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केल्यानंतर घटनेबाबतची चुकीची माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचे उघडकीस आले. दरम्यान, दारू पिण्यास बसल्यानंतर मिसफायर झाल्याचा प्रकार पोलीस चौकशीत समोर आला आहे. याप्रकरणी गोळीबार करणाऱ्या अनिल चव्हाण नावाच्या सराइताला पोलिसांनी ताब्यात घेतले, तर या घटनेत गंभीर जखमी झालेल्या सराईत इस्टेट एजंटचे नाव प्रदीप सावंत (वय ३१) असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावंत आणि चव्हाण हे दोघे मित्र असून, दोघेही रिअल इस्टेटची कामे करतात. शनिवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास गंगाधाम-कोंढवा रस्त्यावरील एका ओपन प्लॉटमध्ये ते दोघे दारू पिण्यासाठी आले होते. त्या वेळी दोघांपैकी एकाने स्वतःबरोबर एक गावठी बनावटीचे पिस्तूल आणले होते. दारू पित असताना त्यातील अनिल चव्हाण हा पिस्तूल हाताळत असताना त्याच्याकडून अचानक मिसफायर झाले. या वेळी गोळी सावंतच्या दंडातून आरपार जाऊन तो गंभीर जखमी झाला. हा प्रकार दोघांच्याही अंगलट येणार असल्याने अनिल चव्हाण याने सावंतला जखमी अवस्थेत स्वामीनारायण मंदिर परिसरात सोडले.

# मोबाईल टॉवर कर वसुलीसाठी राज्य सरकारच्या पायघड्या

**वृत्तसंस्था/पुणे**

पुणे महापालिकेच्या मिळकत कराची मोबाईल टॉवर असलेल्या कंपन्यांकडे ३ हजार ५०० कोटींची थकबाकी आहे. ही थकीत रक्कम सक्तीने वसूल करू नये, असा आदेश राज्य सरकारने ऑगस्ट महिन्यात दिला होता. त्यामुळे ही थकीत रक्कम कशी वसूल करायची ? असा प्रश्न महापालिका प्रशासनापुढे निर्माण झाला आहे. त्यावर तोडगा काढण्यासाठी आता मुख्य सचिवांची भेट घेऊन दाद मागणार आहे.

२०२४-२५ आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात मिळकत कर विभागाला २७०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्यापैकी १ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळकत कर विभागाने जमा केले आहे. पुढील दोन महिन्यांमध्ये हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महापालिकेने जप्त केलेल्या मिळकतींचा लिलाव करण्याचाही निर्णय घेतला आहे. महापालिकेचा विस्तार होत असल्याने विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता भासते.

मोबाईल कंपन्या महापालिकेचा मिळकत कर भरत नसल्याने त्यांच्याकडे असलेल्या थकबाकीच्या रकमेत वाढ होत आहे. महापालिका प्रशासन आणि मोबाइल कंपन्यांमध्ये गेल्या काही वर्षांपासून मिळकत कर आकारणीवरून वाद सुरू आहेत.

# अंधश्रद्धेतून महिलेचा खून

## नैवेद्य म्हणून मृतदेहाचे तुकडे चार बाजूला फेकले

**वृत्तसंस्था/सातारा**

फलटण तालुक्यातील विडणी येथील एका उसाच्या शेतात अंधश्रद्धेतून झालेल्या महिलेच्या निघृण खुनाचा तपास सुरूच आहे. नैवेद्य म्हणून खून झालेल्या महिलेच्या मृतदेहाचे तुकडे चार बाजूला फेकले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. महिलेचे धड अद्याप सापडले नसून, याचा कसून तपास सुरू आहे. घटनास्थळी पोलिस ठाण मांडून असून तपासासाठी विविध पथके रवाना झाली आहेत.

विडणी येथील पंचवीस फाटानजीक प्रवीण जाधव यांच्या उसाच्या शेतात शुक्रवारी एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. भानामतीच्या प्रकारातून हा खून झाल्याचा पोलिसांचा कयास आहे. घटनास्थळावर हळदी-कुंकू, गुलाल, साडी, काळी बाहुली, दहीभात व लिंबू यासह अन्य वस्तू आढळून आल्या. हा खून इतका निघृणपणे करण्यात आला आहे की त्या महिलेची कवटी घटनास्थळापासून ५०० मीटर अंतरावर आढळून आली तर कमरेखालचा भाग दुसऱ्या ठिकाणी सडलेल्या अवस्थेत सापडला असून शरिराचा मानेपासून कमरेपर्यंतचा भाग (धड) अद्यापही सापडला नाही. त्याचा कसून तपास सुरू आहे.

### १६ एकरांतील ऊस तोडण्याचे काम सुरू

संपूर्ण पोलिस यंत्रेणेसह जिल्हा पोलिसप्रमुख समीर शेख स्वतः घटनास्थळी ठाम मांडून आहेत. त्यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून पोलिसांची विविध पथके संशयितांच्या शोधार्थ अनेक ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. दरम्यान तपास कामात अडथळा येत असलेल्या घटनास्थळ परिसरातील १६ एकरातील ऊस ऊसतोड कामगारांकडून तोडण्यात येत आहे.

# आता महागडे 'आरटीएमएस' उपचार मोफत!

**वृत्तसंस्था/पुणे**

सध्या मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. यावर रिपीटेटिव्ह ट्रान्सक्रॅनिअल मॅग्नेटिक स्टिम्युलेशन (आरटीएमएस) ही उपचारपद्धती परिणामकारक ठरते. परंतु, हे उपचार महागडे असल्याने सर्वसामान्य रुग्णांना परवडत नाहीत. आता येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयात रुग्णांसाठी ही सुविधा मोफत सुरू झाली आहे.

मनोविकारासह चेतासंस्थेशी निगडित आजारांवर आरटीएमएस उपचार प्रभावी ठरतात. या उपचाराचे अत्याधुनिक यंत्र प्रादेशिक मनोरुग्णालयात बसविण्यात आले आहे. या यंत्राद्वारे मानसिक उपचार सुरु झाले. हे उपचार बाह्यरुग्ण विभागात उपलब्ध असून, त्यासाठी कोणतीही प्राथमिक शारीरिक चाचणी करण्याची आणि भूल देण्याची आवश्यकता नाही. सर्वसाधारणपणे खासगी रुग्णालयात आरटीएमएस उपचाराच्या एका सत्राचा खर्च ६ ते ८ हजार रुपये असतो. यामुळे एका रुग्णाच्या संपूर्ण उपचाराचा खर्च लाखाच्या घरात जातो. प्रादेशिक मनोरुग्णालयात पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडासह इतर ठिकाणांहून मनोरुग्ण उपचारासाठी येतात. आता त्यांना हे उपचार मोफत मिळणार आहेत.

# विशाल गवळीच्या तिघा भावांनाही दणका

**वृत्तसंस्था/ठाणे**

कल्याण पूर्वेतील चक्कीनाका परिसरात राहणाऱ्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणारा नराधम विशाल गवळी याचे तिन्ही भाऊ पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती हाती येताच पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी या तिन्ही गुंडांच्या नांग्या ठेचून काढल्या आहेत. या तिन्ही भावांकडून देखील समाजाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्यांना दोन वर्षांसाठी ठाणे, मुंबई आणि रायगड या तिन्ही जिल्ह्यांतून तडीपार केले आहे.

आकाश अभिमान गवळी (वय ३३), शाम अभिमान गवळी (वय ३४) आणि नवनाथ अभिमान गवळी (वय २८) अशी हद्दपार केलेल्या बदमाशांची नावे असून चक्कीनाका भागातील रहिवाशांसह व्यापारी आणि दुकानदारांमध्येही या तिघांची प्रचंड दहशत आहे. या कारवाईमुळे कल्याण-डोंबिवलीत गेल्या अनेक वर्षांपासून दहशत माजवणाऱ्या गुंडांच्या उरात धडकी भरली आहे. अनेक गुंडांनी घाबरून शहराबाहेर पळ काढला आहे. समाजाला धोका निर्माण करणाऱ्या, कायदा शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या कल्याणमधील कोळसेवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील छोट्या-मोठ्या गुंड आणि गुन्हेगारांची पोलिसांनी यादी तयार केली आहे. अशा गुंडावर संघटित गुन्हेगारी कायद्यासह हद्दपारीच्या कारवाया करण्यात येणार असल्याचे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

बालिका अत्याचार-हत्याकांड प्रकरणातील आरोपी विशाल गवळी याचे कल्याण पूर्वेतील नंदादीप सोसायटी, नंदादीप नगर, चक्कीनाका भागात राहणारे आकाश, शाम आणि नवनाथ या तिन्ही भावांच्या नावावर जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापती करणे, बेकायदा शस्त्र जवळ बाळगणे, मालमत्तेचे नुकसान करणे, गंभीर दुखापती करणे, आदी गुन्ह्यांच्या नोंदी कोळसेवाडी पोलिस ठाण्यात असून तसे त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत. या तिन्ही गुंडांच्या उपद्व्यापांमुळे परिसरातील रहिवाशांसह व्यापारी आणि दुकानदार भीतीच्या छायेखाली राहत होते. या गुंडांबद्दल स्थानिक कोळसेवाडी पोलिस ठाण्यात तक्रारी वाढत चालल्या होत्या. पोलिस उपायुक्त झेंडे यांनी या तिन्ही गुंडांची माहिती संकलित करण्याचे आदेश कोळसेवाडी पोलिसांना दिले.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कदम यांनी या तिन्ही भावांना महाराष्ट्र पोलिस कायदा १९५१चे कलम ५५अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव उपायुक्त अतुल झेंडे यांच्यासमोर ठेवला होता. उपायुक्त झेंडे यांनी तातडीने हा प्रस्ताव मंजूर केला. या तिन्ही भावांना पोलिसांनी तडीपाराच्या नोटिसा बजावल्या. त्यानंतर ताब्यात घेऊन त्यांना सातारा जिल्ह्याच्या हद्दीत नेऊन सोडण्यात आले.

### दोन वर्षांसाठी मुंबईसह तीन जिल्ह्यांतून तडीपार

### कल्याणमधील बालिका अत्याचार-खून प्रकरण

### विशाल गवळी सध्या पत्नीसह तुरुंगात

चक्कीनाका परिसरात अत्याचार करून बालिकेची हत्या करणारा विशाल गवळी सध्या पत्नीसह तुरुंगात आहे. त्याच्या तिन्ही गुंड भावांवर केलेल्या कारवाईने कल्याण पूर्वेतील चक्कीनाक्यासह तिसगाव परिसरातील रहिवासी, व्यापारी, विक्रेते, व्यावसायिक आणि दुकानदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

# २३ जानेवारीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राबवून अडीच कोटी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा लाडक्या बहिणींच्या हस्ते नागरी सत्कार होणार आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त २३ जानेवारी रोजी शिवसेनेकडून वांद्रे कुर्ला संकुल येथे हा सत्कार सोहळा आयोजित केल्याची माहिती शिवसेना उपनेते राहुल शेवाळे यांनी दली.

शेवाळे म्हणाले की, जून २०२२ मध्ये शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी ऐतिहासिक निर्णय घेत वंदनीय बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जाण्याचा संकल्प केला होता. तो संकल्प लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पूर्ण झाला. त्यामुळे शिवसैनिक आणि राज्यातील तमाम नागरिकांच्या वतीने एकनाथ शिंदे आणि निवडून आलेल्या सर्व आमदार आणि खासदारांचा भव्य नागरी सत्कार केला जाणार आहे.



ते पुढे म्हणाले की, शिंदे यांच्याच्या नेतृत्वात लोकसभेत शिवसेनेचे ७ खासदार निवडून आले तर विधानसभेत शिवसेनेचे ५७ आमदार निवडून आले. विधानसभेत शिवसेनेला उबाठाच्या तुलनेत १५ लाख ६३ हजार ९१७ जास्त मते मिळाली. राज्यातील मतदारांनी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला, असे शेवाळे म्हणाले. पक्षाने हा विजय वंदनीय बाळासाहेब ठाकरेंना समर्पित केल्याचे शेवाळे म्हणाले. महायुतीच्या विजयात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. त्या लाडक्या बहिणींच्या हस्ते एकनाथ शिंदे आणि शिवसेना मंत्र्यांचा सत्कार होईल. यावेळी सोनू निगम व अवधूत गुप्ते यांचा देखील सांगीतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे शेवाळे म्हणाले.

९ फेब्रुवारी रोजी पक्षाचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने पक्षाकडून २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या सदस्य नोंदणी मोहीम आणि मतदारांचे आभार मानण्यासाठी जिल्हानिहाय सभा आयोजित केल्याचे शेवाळे म्हणाले.

# पुण्यातील बहीण-भाऊ केरळच्या हॉटेलमध्ये मृतावस्थेत

## चिठ्ठी लिहून संपवले आयुष्य, धक्कादायक कारण समोर

**वृत्तसंस्था/पुणे**

पुण्याचे रहिवासी असलेल्या भावा-बहिणीचा केरळमध्ये दुदैर्वी अंत झाल्याची घटना समोर आली आहे. पुण्यातील भाऊ - बहीण एका हॉटेलमध्ये मृतावस्थेत आढळले आहेत. हॉटेल कर्मचाऱ्यांनी दरवाजा ठोठावूनही प्रतिसाद न मिळाल्याने दरवाजा उघडला असता, भाऊ फाशी घेतलेल्या अवस्थेत आणि बहिणीचा मृतदेह बेडवर पडलेला आढळला.

डाकताई कोन्तिबा बामन (४८) आणि मुक्ता कोन्तिबा बामन (४५) अशी मृत भावा-बहिणीची नावं आहेत. ते दोघे पुण्यातील रहिवासी होते. मृतावस्थेत असलेली बहीण दिव्यांग होती. त्यामुळे दिव्यांग बहिणीच्या उपचारासाठी दोघे तिरुवनंतपुरमला आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी पोलिसांना एक सुसाइड नोट सापडली असून त्यात दोघांनी धक्कादायक बाब लिहिली आहे. 'आमच्याकडे ना घर आहे, ना नोकरी. आमचा मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करू नका', असे त्या नोटमध्ये लिहिले होते.

शुक्रवारी, १७ जानेवारी रोजी दोघे भाऊ - बहीण यांवी थंपनूर येथील एका हॉटेलमध्ये चेक-इन केले होते. एक दिवस दोघेही तिथेच हॉटेलमध्ये राहिले. मात्र रविवारी सकाळीपासून त्यांच्या हॉटेल रूममधून कोणत्याही हालचाली झाल्या नाहीत. रुममधून हालचाल न झाल्याने कर्मचाऱ्यांना काहीतरी संशयास्पद जाणवले आणि त्यांनी लगेच याबाबतची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी येऊन दरवाजा उघडला. त्यावेळी दोघे भाऊ-बहीण मृतावस्थेत असल्याचे दिसले. भाऊ फासावर लटकलेल्या अवस्थेत, तर बहीण हॉटेलमधील बेडवर पडलेली होती. प्राथमिक तपासात भावाने आधी बहिणीची हत्या केली आणि नंतर आत्महत्या केल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# युनिक कोडवरच ठरेल खरा देवगड हापूस आंबा!

## प्रकल्प राबवण्याचा आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा निर्णय

**वृत्तसंस्था/सिंधुदुर्ग**

शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या बळावर यावर्षीपासून 'युनिक कोड' असेल तोच 'देवगड हापूस आंबा' अशी बाजारात मार्केटिंग करून देवगडच्या नावाने विकल्या जाणाऱ्या बोगस आंब्याला पुरता पायबंद घालावा, या मागणीवर शेतकऱ्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे जीआय कायद्याने प्राप्त होणारे अधिकार वापरून आता देवगड हापूसच्या नावाने विकल्या जाणाऱ्या प्रत्येक आंब्यांवर युनिक कोड असणे बंधनकारक केले आहे. त्याकरता टीपी सीलबाबतचे पेटंट मिळालेल्या मुंबई येथील सनसोल्यूशन या कंपनीबरोबर संस्थेने आधीच करार केलेला आहे.

देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अॅड. अजित गोगटे म्हणाले की, देवगड हापूस आंब्यांच्या नावाने होणाऱ्या बोगस



विक्रीला पायबंद घालण्यासाठी हापूसच्या जीआयची देवगड तालुक्यासाठीची रजिस्टर प्रॉपरायटर अर्थात कस्टोडियन असलेल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने प्रत्येक देवगड हापूस आंब्याला युनिक कोडचा (यूआयडी) देण्याचा निर्णय २ जानेवारी रोजी घेतला होता. या विषयाबाबत आणखी माहिती देण्यासाठी व २ तारखेला हजर राहू न शकलेल्या शेतकऱ्यांसाठी संस्थेने दुसरे चर्चासत्र आयोजित केले होते. त्यामध्ये विस्तृत चर्चा होऊन मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांच्या उस्फूर्त प्रतिसादाच्या बळावर या वर्षीपासून 'युनिक कोड असेल तोच देवगड हापूस' अशी बाजारात मार्केटिंग करून देवगडच्या नावाने विकल्या जाणाऱ्या बोगस आंब्याला पुरता पायबंद घालावा, या मागणीवर शेतकऱ्यांनी शिक्कामोर्तब केले आहे.

हे कोड केवळ जीआयधारक शेतकऱ्यांना वितरित केले जाणार आहेत. २०१८ साली हापूसला जीआय जाहीर झाला. जीआय कायद्यानुसार हापूस नावाने आंबा विकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने जीआय नोंदणी करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्याला हापूस नाव वापरता येणार नाही. विना नोंदणी हापूस वापरणे हा अदखलपत्र गुन्हा असून सहा महिने ते तीन वर्ष कैदेची किंवा रुपये ५० हजार ते दोन लाख इतक्या दंडाची तरतूद आहे असे संस्थेचे सल्लागार अँड. ओमकार सप्रे यांनी सांगितले. देवगड मध्ये सुमारे ५ हजार शेतकरी असूनही गेल्या सहा वर्षांत केवळ अंदाजे ५०० शेतकऱ्यांनी जीआय नोंदणी घेतली आहे. १० वर्षांच्या नोंदणीसाठी केवळ २ हजार १० रुपये शुल्क असताना जीआय नोंदणी घेण्यासाठी देवगडचा शेतकरी उदासीन आहेत.

### युनिक कोड मिळणार

**हे युनिक कोड संस्थेच्या मार्फत फेब्रुवारी महिन्यात वितरित केले जाणार आहेत. युनिक कोडचा बोगस वापर होऊ नये याकरिता शेतकऱ्यांनी आंबा कलमे याची सातबारा उताऱ्यावर नोंद करुन घ्यावीत. याबाबतची तपासून आणि त्यांची उत्पादक क्षमता बघून कोड दिले जाणार आहेत. त्याकरिता 31 जानेवारी २०२५च्या अगोदर शेतकऱ्यांनी संस्थेकडे संपर्क साधून नोंदणी करावी आणि कोडची ऑर्डर नोंदवावी, असे आवाहन अॅड. अजित गोगटे यांनी केले आहे.**

### देवगड हापूसच्या दोन पेट्या वाशी मार्केटला रवाना

**देवगड तालुक्यातील कुणकेश्वर मधील प्रगतशील आंबा बागायतदार मोहन शंकर पेडणेकर यांच्या बागायतीमधील देवगड हापूस आंब्याच्या दोन पेट्या उद्योजक नंदूशेठ घाटे यांच्या हस्ते पूजा करून मुंबई वाशी मार्केट येथे पाठविण्यात आल्या.**

# ठाकरेसेनेचे माजी नगरसेवक नाराज

## जळगाव शिवसेनेत भूकंप अटळ

**वृत्तसंस्था/जळगाव**

जळगावात महापालिका निवडणुकीपूर्वी मोठ्या भूकंपाची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवेसना (ठाकरे)चे माजी नगरसेवक आणि इतर पदाधिकारी नाराज आहेत. या नाराजीचा फटका उद्धव ठाकरे यांना बसू शकतो.

जळगावात ठाकरे गटातील नाराजांना सोबत घेण्याच्या हालचाली सुरू असून, जळगाव महापालिकेचे ठाकरे गटातील माजी नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. महापालिकेतील शिवसेना ठाकरे गटाचे चार ते पाच माजी नगरसेवक हे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे १ फेब्रुवारीला जळगाव दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणूक लढलेले तसेच ठाकरे गटाचे माजी उपमहापौर कुलभूषण पाटील हे सुद्धा शिवसेनेत प्रवेश करणार आहेत, अशी चर्चा सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून शासकीय दौऱ्यासोबत शिवसेना पक्षाचा संघटनात्मक आढावा घेतला जाणार आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटावर नाराज असलेले माजी नगरसेवक हे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जळगावमध्ये महापालिका निवडणुकीच्या आधीच ठाकरे गटाच्या महापालिकेतील नगरसेवकांना सोबत घेत शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याचे पाहायला मिळत आहे. आमच्यावर लागलेला गद्दारीचा डाग जनतेने पुसून टाकला असून, इथे फक्त आता शिवसेना चालणार आहे, असंही यावेळी मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटलं आहे. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका तसेच पंचायत समितीवर भगवाच फडकणार असल्याचा विश्वास देखील यावेळी मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### नांदेडमध्येही ठाकरेंना धक्का?

दरम्यान दुसरीकडे नांदेडमध्येदेखील उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि राज्य संघटक एकनाथ पवार यांनी राजीनामा दिला आहे. २०२४च्या विधानसभा निवडणुकीत एकनाथ पवार हे लोहा झ कंधार मतदारसंघाचे ठाकरे गटचे उमेदवार देखील होते. हा नांदेडमध्ये शिवसेना ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

लोकांचे दैनिक
लोकशाही वार्ता



# भारतीय लष्कराच्या डेअरडेव्हिल्सचा कर्तव्य पथावर 'विश्वविक्रम'

## ७ बाईक, ४० जवान, २०.४ फूट उंच मानवी मनोरा

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारतीय सैन्याच्या मोटरसायकल रायडर डिस्प्ले टीम डेअरडेव्हिल्सने २० जानेवारी २०२५ रोजी कर्तव्यपथ नवी दिल्ली येथे मोटारसायकल चालवताना सर्वात उंच मानवी मनोऱ्याचा जागतिक विक्रम करून अभूतपूर्व कामगिरी केली.

भारतीय लष्कराची मोटरसायकल रायडर टीम डेअरडेव्हिल्स प्रजासत्ताक दिनी कर्तव्य पथावर परेड करणार आहे. याची सध्या जोरदार तयारी सुरू आहे. डेअरडेव्हिल्स या टीमने २० जानेवारी रोजी कर्तव्य पथावर एक पराक्रम केला, ज्या अंतर्गत ४० सैनिकांनी सात मोटरसायकलवर २० फूट उंचीचा मानवी मनोरा तयार केला. भारतीय सैन्याच्या डेअरडेव्हिल्स टीमने विजय चौक ते इंडिया गेट असे एकूण दोन किलोमीटरचे अंतर या २० फुटांच्या मानवी मनोऱ्यासह कापले. डेअरडेव्हिल्स टीम ही भारतीय लष्कराच्या कॉर्प्स ऑफ सिग्नल्सचा एक ऐतिहासिक टीम आहे. ज्यांनी आपल्या अतुलनीय कौशल्य आणि कामगिरीसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली आहे. सोमवारी कर्तव्यपथावर केलेल्या ताज्या कामगिरीसह, डेअरडेव्हिल्स टीमकडे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्सह एकूण ३३ जागतिक विक्रम आहेत. डेअरडेव्हिल्सचे इंडिया गेटवर सिग्नल्स फ्रेटरनिटीच्या सदस्यांनी भव्य स्वागत केले. कॉर्प्स ऑफ सिग्नल्सचे प्रमुख लेफ्टनंट जनरल केव्ही कुमार यांच्या उपस्थितीत टीमला प्रोत्साहन देण्यात आले.



### भारतभर १,६०० हून अधिक मोटरसायकल प्रात्यक्षिके

**१९३५ मध्ये स्थापन झालेल्या डेअरडेव्हिल्स टीमने आतापर्यंत भारतभर १,६०० हून अधिक मोटरसायकल प्रात्यक्षिके आयोजित केली आहेत. प्रजासत्ताक दिन परेड, आर्मी डे परेड आणि अनेक लष्करी कार्यक्रम यासारख्या प्रतिष्ठित कार्यक्रमांमध्ये त्यांच्या कामगिरीने प्रेक्षकांना भुरळ घातली आहे.**

# उत्तर भारतात थंडीची लाट

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये सध्या थंडीची तीव्र लाट सुरू असून जम्मू-काश्मीर, लडाख आणि हिमाचल प्रदेशात सतत बर्फवृष्टी होत आहे. हिमाचलच्या तीन शहरांमधील तापमान शून्याखाली गेले असून ताबो येथे सर्वात कमी उणे पाच अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. येथे पुढील चार दिवस बर्फवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

बर्फाळ वाऱ्यांमुळे उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान १० अंशांच्या खाली नोंदवले गेले. इटावामध्ये पारा चार अंशांवर पोहोचला. अयोध्येत थंडीमुळे पाचवीपर्यंतच्या शाळा बंद करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सहावी ते बारावीपर्यंतच्या शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. पंजाबमध्येही थंडीची लाट कायम असून अमृतसरमध्ये ४.८ अंशाची नोंद झाली आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये तापमानात घसरण सुरूच आहे.

# अदानींना लक्ष्य केलेल्या अँडरसनवर 'सिक्युरिटीज फ्रॉड'चा आरोप

## 'हेज फंड'शी संगनमत केल्याचे उघड

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

अमेरिकेची शॉर्ट-सेलिंग फर्म हिंडेनबर्ग रिसर्चने नुकतेच त्याचे कामकाज बंद करण्याची घोषणा केली. हिंडेनबर्ग रिसर्चने अदानी समुहाला लक्ष्य केले होते. यामुळे अदानी समुहातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण होऊन त्यांचे मोठे नुकसान झाले. दरम्यान, आता हिंडेनबर्ग रिसर्चचे संस्थापक नेट अँडरसन याच्यावर सिक्युरिटीज फसवणुकीचा आरोप लावला जाऊ शकतो, असे वृत्त वृत्तसंस्थेने दिले आहे.

एका कॅनडाच्या मार्केट फ्रॉड्स पोर्टलवर आधारित एका रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, विविध कंपन्यांना लक्ष्य करण्यासाठी रिपोर्ट्स तयार करताना हेज फंडशी संगनमत केल्याप्रकरणी नेट अँडरसनची चौकशी सुरू आहे. यासाठी या पोर्टलने ओंटारियो न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रांचा हवाला दिला आहे.

पोर्टलने पुढे म्हटले आहे की, मानहानी खटल्यात ओंटारियो सुपीरियर कोर्टात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे स्पष्ट झाले आहे की, कॅनडाच्या अँसन हेज फंडचे प्रमुख मोएझ कस्सम यांनी हिंडेनबर्गचे नेट अँडरसनसह विविध सुत्रांकडे संशोधनाची माहिती शेअर केल्याचे कबूल केले आहे.

पोर्टलने पुढे नमूद केले आहे की, न्यायालयातील कागदपत्रांवरून कथितरित्या उघड झाले की हिंडेनबर्ग रिसर्चने रिपोर्ट तयार करताना हेज फंडने अँडरसनशी संगनमत केले.

सहभागाची माहिती न देता 'बेयरिश ट्रेंड' निर्माण करणारा रिपोर्ट तयार केल्याबद्दल यूएस सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशनद्वारे सिक्युरिटीज फसवणुकीचा आरोप केला जाऊ शकतो, हे देखील त्यांत अधोरेखित करण्यात आले आहे.

पोर्टलचा हवाला देत वृत्तसंस्थेने म्हटले आहे की, अँडरसन आणि अँसन फंड्स यांच्यात ईमेलद्वारे झालेल्या संभाषणांमुळे आम्हाला असे दिसून आले आहे की तो प्रत्यक्षात अँसनसाठी काम करत होता. त्याला जसे सांगण्यात आले, त्यानुसार त्याने तसा रिपोर्ट प्रकाशित केला. त्यात प्राइस टार्गेटपासून ते रिपोर्टमध्ये काय असावे आणि काय नसावे? याचा समावेश होता.

### हेज फंडचा सहभाग

**कंपन्यांबद्दल निगेटिव्ह रिपोर्ट समोर आल्यानंतर शॉर्ट-सेलर्सनी सिक्युरिटीज उधार घेऊन त्या खुल्या बाजारात विकणे आणि नंतर कमी किमतीत त्याची पुन्हा खरेदी करणे हे सामान्य आहे. पण हेज फंडचा या प्रकरणात सहभाग असणे ही चिंता निर्माण करणारी गोष्ट आहे. कारण असे फंड समांतर पैसे लावू शकतात ज्यामुळे शेअर्सच्या किमतीवर घसरणीचा दबाव वाढतो. दरम्यान, अँडरसन, अँसन आणि कस्सम यांनी अद्याप या प्रकरणी कोणतेही निवेदन जारी केलेले नाही.**

# 'स्लो पॉइझन' देऊन प्रियकराचा काटा काढला

## न्यायालयाने प्रेयसीला सुनावली मृत्यू दंडाची शिक्षा

**वृत्तसंस्था/तिरुअनंतपुरम**

केरळमध्ये एका प्रेयसीने तिच्या प्रियकराची स्लो पॉइझन देऊन त्याची हत्या केली होती. ही घटना २०२२ मध्ये घडली होती. यानंतर आता केरळमधील एका न्यायालयाने संबंधित प्रेयसीला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. नेय्याटिंकरा अतिरिक्त जिल्हा न्यायालयाने या प्रकरणातील आणखी एक आरोपी, महिलेचा काका, निर्मलकुमारन नायर याला तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे, तर महिलेच्या आईला आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २४ वर्षीय आरोपी ग्रिष्मा हिनेही न्यायालयासमोर कमी शिक्षा करण्याचीही विनंती केली. ग्रिष्माच्या वतीने, सांगण्यात आले की ती तिच्या पालकांची एकुलती एक मुलगी आहे. त्यांची शैक्षणिक कारकिर्दही चांगली आहे. शिवाय, तिचे पूर्वीचे कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. यामुळे शिक्षा सुनावताना याचा विचार व्हावा. दरम्यान, ५८६ पानांचा आपला निकाल देताना न्यायालयाने म्हटले आहे की, गुन्ह्याच्या गांभीर्याशिवाय इतर कोणत्याही गोष्टीवर लक्ष देण्याची गरज नाही. ग्रीष्माला भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली दोषी ठरवण्यात आले आहे.

पोलीस रिपोर्टनुसार, पीडित शेरोन राज हा तिरुअनंतपुरम जिल्ह्यातील परसाळा येथील रहिवासी होती. ग्रिष्मा आणि त्याच्यामध्ये प्रेमसंबंध होते. १४ ऑक्टोबर रोजी ग्रिष्माने शेरोनला कन्याकुमारी येथील तिच्या घरी बोलावले आणि त्याला आयुर्वेदिक औषधीतील एक 'स्लो पॉइझन' दिले. यानंतर, शेरोनला सातत्याने समस्या जाणवू लागल्या. ११ दिवसांनंतर, त्याच्या अनेक अवयवांनी काम करणे बंद केले आणि २५ तारखेला शेरोन राजचा रुग्णालयात मृत्यू झाला.



# राहुल गांधींवर गुन्हा दाखल होणार नाही

## शहा यांच्यावर टिप्पणी प्रकरण : सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**वृत्तसंस्था/रांची**

राहुल गांधींविरोधात सुरू असलेल्या मानहानीच्या खटल्यातील ट्रायल कोर्टाच्या कामकाजाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने झारखंड सरकार आणि भाजप नेत्याला नोटीस बजावली आहे आणि त्यांची प्रतिक्रिया मागवली आहे.

२०१९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी झारखंडमधील चाईबासा येथे भाषणादरम्यान राहुल गांधींनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टिप्पणी केली होती. यानंतर भाजप कार्यकर्ता नवीन झा यांनी २०१९ मध्ये अमित शहा यांच्या विरोधात अपमानास्पद वक्तव्य केल्याबद्दल राहुल गांधींविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. सुनावणीदरम्यान, गांधी यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद केला की अनेक न्यायालयीन निर्णयांमध्ये असे म्हटले आहे की केवळ पीडित व्यक्तीच मानहानीची तक्रार दाखल करू शकते. त्रयस्थच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली होती. मानहानीच्या खटल्यात असे करणे मान्य नाही.

### खासदार-आमदार न्यायालयात वर्ग करण्यात आले प्रकरण

**चाईबासा येथे दाखल केलेला खटला रांचीच्या खासदार-आमदार न्यायालयात सुनावणीसाठी वर्ग करण्यात आला. नंतर चाईबासा येथे खासदार-आमदार न्यायालय सुरू झाल्यानंतर ते पुन्हा चाईबासा येथे वर्ग करण्यात आले. येथील सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती ऋषी कुमार यांनी राहुल गांधी यांची याचिका फेटाळून लावली आणि हजर राहण्याची नोटीस दिली.**



# वशिष्ठांची 'ममता' बनली महाकुंभमेळ्यात 'महामंडलेश्वर'

## दोन महिन्यापूर्वी झाले लग्न : किन्नर आखाड्याच्या आचार्य यांनी केला ममताचा पिंडदान आणि पट्टाभिषेक



**वृत्तसंस्था/प्रयागराज**

प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात दररोज कोवधी भाविक श्रद्धेने सहभागी होत आहे. अनेकजण यावेळच्या महाकुंभमेळ्यात चर्चेचा विषय ठरले असून, आता २५ वर्षीय ममता वशिष्ठही महामंडलेश्वर बनली आहे. ममता वशिष्ठला किन्नर आखाड्याच्या आचार्य महामंडलेश्वर डॉ. लक्ष्मी नारायण यांनी पिंडदान करून पट्टाभिषेक केला.

यावेळच्या महाकुंभमेळ्यात आयआयटी बाबा अभय सिंह आणि हर्षा रिछारिया यांची प्रचंड चर्चा झाली. दोघांचेही फोटो, व्हिडीओ प्रचंड व्हायरल होत आहेत. आता काही महिन्यांपूर्वी लग्न झालेली ममता वशिष्ठ चर्चेत आली आहे. ममता वशिष्ठने माध्यमांशी बोलताना सांगितले की, तिचे दोन महिन्यांपूर्वीच नोव्हेंबर २०२४ मध्ये संदीप वशिष्ठसोबत लग्न झाले होते. ममताचा पती सरपंच आहे. ममताला वयाच्या सातव्या वर्षापासूनच धार्मिक गोष्टींबद्दल आवड निर्माण होत गेली. ममताला रविवारी (१९ जानेवारी) महामंडलेश्वर बनवण्यात आले.

ममता म्हणाली की, मला माझ्या कुटुंबातील आणि माझ्या पतीचा पूर्ण पाठिंबा आहे. माझ्या या निर्णयानंतर ते माझ्या पाठीशी उभे राहिले. तरीही काही असे लोक आहेत, जे माझ्या निर्णयाच्या विरोधात आहेत. माझी सहा वर्षांपूर्वी किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर स्वामी पार्वती नंद धुलिया यांच्याशी भेट झाली होती.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या परिषदेसाठी गेले आहेत. एक्स या समाजमाध्यमावर फडणवीस यांनी दावोस येथून शेअर केलेले हे छायाचित्र.

# हिमाचलमध्ये दोन पर्यटकांचा पॅराग्लायडिंगवेळी पडून मृत्यू

**वृत्तसंस्था/शिमला**

हिमाचल प्रदेशातील कांगडा आणि कुल्लू जिल्ह्यात २४ तासांत पॅराग्लायडिंगच्या दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन पर्यटकांचा मृत्यू झाला. हे पर्यटक अहमदाबाद आणि तामिळनाडू येथील होते. अहमदाबाद येथील भावसार खुशी (१९) या तरुणीचा पॅराग्लायडिंग करताना धर्मशालाजवळील इंद्रनाग पॅराग्लायडिंग साइटवर दरीत पडून मृत्यू झाला. तिच्यासोबत पॅराग्लायडिंग पायलटही नदीत पडला. तो जखमी झाला आहे. जखमी पायलटला उपचारासाठी तांडा मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले.दुस?ऱ्या घटनेत कुल्लू जिल्ह्यातील गरसा लँडिंग साइटजवळ पॅराग्लायडिंग करताना तामिळनाडूतील २८ वर्षीय जयश रामचा मृत्यू झाला. पॅराग्लायडरची चुकून दुसऱ्या पॅराग्लायडरला टक्कर होऊन जयश दरीत कोसळला. या घटनेत त्याचा मृत्यू झाला, तर पायलट अश्विनी कुमार गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी चंदीगडच्या रुग्णालयात पाठवण्यात आले.

# अतुल सुभाषच्या आईला 'सर्वोच्च' झटका

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

आत्महत्या केलेल्या इंजिनिअर अतुल सुभाषच्या आईला सर्वोच्च न्यायालयात झटका बसला. अतुल सुभाषच्या मुलाचा ताबा मिळावा म्हणून त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. पण, न्यायालयाने मुलगा त्याच्या आईकडेच राहील असे स्पष्ट केले. न्यायालयाने अतुल सुभाषच्या आईला यासंदर्भात कनिष्ठ न्यायालयात जाण्यास मूभा दिली आहे.

अतुल सुभाषची आई अंजू देवा यांनी चार वर्षाच्या नातवाचा (अतुल सुभाषचा मुलगा) ताबा मागितला होता. याचिकेत अतुल सुभाषच्या आईने म्हटले की, निकिता आणि तिच्या कुटुंबाने अतुलला खोट्या गुन्ह्यात अडकवले. पैसे मागून त्रास दिला. त्यामुळे त्याला आत्महत्या करावी लागली. निकिता सिंघानियाकडे अतुलचा मुलगा सुरक्षित नाही, असे याचिकेत म्हटले होते. या याचिकेवर न्यायमूर्ती नागरत्ना आणि न्यायमूर्ती साईश चंद्र शर्मा यांच्या खंठपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, आम्हाला हे सांगता खेद वाटतो, पण मुलासाठी याचिकाकर्ती (अतुलची आई) अनोळखी आहे. जर तुमची इच्छा असेल, तर तुम्ही मुलाला भेटू शकता. जर तुम्हाला मुलाचा ताबा हवा असेल, तर यासाठी वेगळी प्रक्रिया आहे, असे सांगत न्यायालयाने मागणी फेटाळून लावली.

# आजचा शेतकऱ्यांचा दिल्ली मोर्चा स्थगित

## केंद्र सरकारने १४ फेब्रुवारीपूर्वी बैठक चंदीगडमध्ये नव्हे तर दिल्लीत घ्यावी -पंढेर

**वृत्तसंस्था/पटियाला**

हरियाणा-पंजाबच्या शंभू सीमेवरील शेतकरी मंगळवारी (दि. २१) दिल्लीला जाणार नाहीत. सोमवारी किसान मजदूर मोर्चाचे (केएमएम) निमंत्रक सर्वनसिंग पंढेर यांनी शंभू सीमेवर पत्रकार परिषद घेतली आणि सांगितले की, दिल्लीकडे जाणारा मोर्चा तूर्तास स्थगित करण्यात आला आहे. केंद्र सरकारने १४ फेब्रुवारीपूर्वी चंदीगडऐवजी दिल्लीत बैठक घ्यावी, असे ते म्हणाले. विशेष म्हणजे सोमवारी सकाळी पंढेर यांनी दिल्लीला जाणार असल्याचे सांगितले होते.

दरम्यान, संयुक्त किसान मोर्चाने सोमवारी (दि. २०) पंजाब-हरियाणासह देशभरातील लोकसभा आणि राज्यसभा खासदारांच्या निवासस्थानांचा घेराव करून पिकांना किमान आधारभूत किंमत हमी कायदा आणि इतर मागण्यांबाबत घोषणा केली होती. तथापि, केंद्राकडून चर्चेचे आमंत्रण मिळाल्यानंतर, संयुक्त किसान मोर्चाने सांगितले की, घेराव घालण्याऐवजी सर्व शेतकऱ्यांनी ई-मेलद्वारे खासदारांना मागण्यांचे निवेदन पाठवावे. २६ जानेवारी रोजी देशभरात ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येणार आहे. संयुक्त किसान मोर्चाचे नेते दर्शनपाल सिंह म्हणाले होते की, खासदारांमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संदेश देण्याचा प्रयत्न केला जाईल, जेणेकरून शेतकऱ्यांशी लवकरच चर्चा सुरू होईल.



### उपोषण सुरूच राहणार - डल्लेवाल

केंद्र सरकारकडून १४ फेब्रुवारीला चर्चेचा प्रस्ताव आल्यानंतरही डल्लेवाल यांनी जोपर्यंत एमएसपीवरील हमी कायदा लागू होत नाही तोपर्यंत आपण काहीही खाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांचे उपोषण सुरूच राहणार आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या विनंतीवरून ते शनिवारी रात्री उशिरापासून वैद्यकीय सुविधा घेत आहेत. डॉक्टरांनी त्यांना ग्लुकोज दिले आहे. दरम्यान, डल्लेवाल यांच्यावर देखरेख करणाऱ्या डॉक्टरांच्या टीमचा एक भाग असलेले डॉ. स्वयमान सिंह म्हणाले की, डल्लेवाल यांना केवळ वैद्यकीय मदतीवर १४ फेब्रुवारीपर्यंत ठेवणे कठीण आहे. शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल यांच्या आमरण उपोषणाचा सोमवारी ५६ वा दिवस होता.

### हरियाणा पोलिसांच्या शेतकऱ्यांना नोटिसा

**शेतकरी नेते अभिमन्यू कोहर म्हणाले की, २३ फेब्रुवारी २०२४ रोजी शेतकरी आंदोलन-२ च्या समर्थनार्थ हिसारमधील खेडी चौपाटा येथे जमलेल्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली होती. या कारवाईत अनेक शेतकरी जखमी झाले असून अनेक खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यावेळी प्रशासनाने शेतकऱ्यांशी तडजोड करून प्रकरणे रद्द करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अलीकडे पुन्हा शेतकऱ्यांना नोटिसा पाठवण्यात येत आहेत.**

# घरच्यांनी वाचवले पण रुग्णवाहिकेने घेतला जीव

## विचित्र घटनेत हॉस्पिटल बाहेरच महिलेचा मृत्यू

**वृत्तसंस्था/भिलवाडा**

राजस्थानच्या भिलवाडामध्ये हॉस्पिटलच्या बाहेरच एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. महिला रुग्णाला घेऊन आलेली रुग्णवाहिका वेळेवर पोहोचूनही महिलेला वाचवता आले नाही. महिलेच्या मृत्यूबाबत निष्काळजीपणाचा आरोप करत कुटुंबीयांनी गोंधळ घातला. हॉस्पिटलच्या गेटपर्यंत पोहोचलेल्या रुग्णवाहिकेचा दरवाजा असा अडकला की रुग्णाला बाहेर काढणे कठीण झाले आणि एवढा वेळ गेला की महिलेचा मृत्यू झाला. तब्बल २० मिनिटे महिला आतमध्ये अडकून पडली होती.

भिलवाडाच्या प्रताप नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा सगळा प्रकार घडला. पीडित महिलेच्या कुटुंबीयांनी बराच वेळ रुग्णवाहिकेचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र दरवाजा लॉक असल्यामुळे उघडता येत नव्हता. शेवटी कुटुंबीयांनी रुग्णवाहिकेची काच फोडून महिलेला बाहेर काढण्याचे ठरवले. पण तोपर्यंत बराच उशीर झाला होता. या धक्कादायक व्हिडिओही समोर आला आहे. ज्यामध्ये महिलेचे कुटुंबीय रुग्णवाहिकेचा दररवाजा उघडण्याचा प्रयत्न करत आहेत. रुग्णवाहिकेत ऑक्सिजन सिलिंडर नसल्याचाही आरोप कुटुंबीयांनी केला.

मिळालेल्या माहितीनुसार, जवाहरनगर येथील ४६ वर्षीय सुलेखा नावाच्या महिलेने गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. सुदैवाने कुटुंबीयांनी ते पाहिले आणि तिला हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र त्यानंतर अशी काही परिस्थिती निर्माण झाली की प्रयत्न करुनही सुलेखा यांना वाचवता आले नाही.



रविवार असल्याने मी उशिरापर्यंत झोपून होतो. फोन वाजल्यावर मला जाग आली तेव्हा मला आई फासावर लटकलेली दिसली. माझा धाकटा भाऊ आणि वडिलांनी तिला फासावरुन खाली उतरवले आणि रुग्णवाहिकेच्या मदतीने हॉस्पिटलला रवाना झाले. त्यावेळी आई श्वास घेत होती. त्या रुग्णवाहिकेतील ऑक्सिजन सिलिंडर पूर्णपणे काम करत नव्हता. दुसरीकडे ड्रायव्हरही रस्ता चुकला आणि मग आम्ही कसेतरी हॉस्पिटलमध्ये पोहोचलो तेव्हा दरवाजा अडकून पडला. या सगळ्यात २० मिनिटे गेली. त्यामुळे माझ्या आईचा तिथेच मृत्यू झाला, असे मृतक सुलेखा यांचा मुलगा गौरवने सांगितले.

**भिलवाडा जिल्ह्यात ३२ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. रुग्णवाहिकेत तांत्रिक बिघाड नव्हता. रुग्णवाहिकेच्या सिलेंडरमध्ये ऑक्सिजनही आहे, कोणीही तपासू शकतो. रुग्णवाहिका अजूनही पोलिस ठाण्यात उभी आहे, अशी माहिती भिलवाडा येथील मुख्य वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी डॉ. सीपी गोस्वामी यांनी दिली.तर महिलेच्या आत्महत्येची माहिती मिळाली होते. पोलीस पोहोचेपर्यंत कुटुंबीयांनी महिलेला घरातून बाहेर काढून रुग्णालयात नेले होते. कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासनावर अनेक आरोप केले आहेत. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर परिस्थिती स्पष्ट होईल. सध्या कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिलेली नाही, अशी माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.**

# राशिभविष्य

**मेष**
कामाचा ताण हलका होईल. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळेल. प्रवासात काळजी घ्या.

**वृषभ**
कौटुंबिक अडचणी वाढतील. वाढत्या खर्चाला आवर घालावा. बोलण्यातून गैरसमज निर्माण होतील.

**मिथुन**
कलाकारांचा उत्साह वाढेल. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात वाव मिळेल.

**कर्क**
बेरोजगारांना दिलासा मिळेल. प्रक्रिया उद्योगात संधी लाभतील. प्रवासात नव्या ओळखी होतील.

**सिंह**
आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. जुनी येणी पुन्हा रखडतील. कायदेशीरबाबतीत विशेष काळजी घ्या.

**कन्या**
महत्त्वाचे निर्णय घाईगडबडीत घेऊ नका. मोठे करार सध्याच करू नयेत. स्पर्धांमध्ये यश मिळेल.

**तुळ**
दिवसभरातील तुमचे निर्णय महत्त्वाचे ठरतील. आप्तस्वकीयांच्या भेटी होतील. आर्थिक लाभ होईल.

**वृश्चिक**
पूर्वीच्या चुकांची पुनरावृत्ती टाळा. इतरांच्या वादात मध्यस्थी नको. ग्रहमानाची प्रतिकूलता राहील.

**धनु**
भावंडांचे उत्तम सहकार्य लाभेल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. बाकी चिंता करू नये.

**मकर**
गृहदुरूस्तीची कामे मार्गी लागतील. प्रेमप्रकरणात सामंजस्य राहील. शिक्षण क्षेत्रात संधी लाभेल.

**कुंभ**
किरकोळ बाबींचा अधिक विचार करू नका. अचानक धनलाभ संभवतो. मुलांचे प्रश्न सुटतील.

**मीन**
स्थापत्य, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील. जुनी येणी वसूल होतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.

# फॅशनचे नवे रंग





यंदाचा हिवाळा आता काही दिवसांचा सोबती राहिला आहे. थंडी कमी होत जाऊन उष्मा वाढत जाईल. या उरलेल्या थंडीच्या काळात काही फॅशनेबल बाबींचा अवलंब करायला हवा. यात काही रंगांसोबत तुम्हीही एक्सपरिमेंट करू शकता. त्याविषयी...

* सध्या पांढ्या कपड्यांची जागा ऑफ व्हाईटने घेतली आहे. हा रंग कोणत्याही रंगासोबत उठून दिसतो. पांढ्याऐवजी हा रंग ट्राय करता येईल. ऑफ व्हाईट रंगाच्या शर्टवर मॅचिंग पँट घाला. त्यावर बेज रंगाचा ब्लेझर कॅरी करा. पॉकेट स्वेअरने तुमचा लूक खुलवा.

* हेझल हा ब्राउनच्या जवळ जाणारा रंग. या रंगला टॅन असंही म्हटलं जातं. गडद रंगाच्या छटांसह हेझल रंगाचे कपडे घाला. मिक्स अँड मॅचचा फंडा वापरा. * अ‍ॅव्होकॅडो ग्रीन हा रंग भाव खात आहे. लिनन पँटवर या रंगाचा शर्ट शोभून दिसेल. * गडद जांभळा रंगही सध्या इन आहे. गडद जांभळ्या रंगाच व्हेलवेटचा ब्लेझर, पांढरा शर्ट आणि जीन्स हे कॉम्बिनेशन हिट ठरेल.

* लालसर केशरी हा रंगही फॅशनमध्ये आहे. या रंगाचा सिल्कचा कुर्ता कोणत्याही ऑकेजनची शान ठरेल. या रंगाचा सिल्कचा शर्टही उठून दिसेल.

## मेकअप मंत्रा
# बबल मास्क

त्वचेचं सौंदर्य खुलवण्यासाठी आपण वेगवेगळे मास्क लावतो. बबल मास्क लावल्यानंतर चेहऱ्यावर बुडबुडे येतात. त्यामुळे याला बबल मास्क असं म्हटलं जातं. यात क्रीमचं प्रमाण जास्त असतं. त्यामुळे ऑक्सिजनशी संपर्कात आल्यावर चेहऱ्यावर बुडबुडे येतात. या मास्कमुळे चेहऱ्याला नवतजेला मिळतो. एवढंच नाही तर, चेहरा नीट स्वच्छ होतो. हा मास्क लावल्यानंतर काही काळ तसाच ठेवावा लागतो. चेहऱ्यावरील बुडबुड्यांमुळे त्वचा आतून स्वच्छ होते. चेहऱ्यावरील मुरुमं, पुटकुळ्या कमी होण्यास मदत होते. बबल मास्क लावण्यासाठी तुमच्या संपूर्ण चेहऱ्याला क्रीम लाऊन घ्या. तोंड, नाक आणि डोळ्यांलगतचा भाग टाळा. क्रीमचा ऑक्सिजनशी संपर्क आला की चेहऱ्यावर बुडबुडे येतील. हे बुडबुडे ग्रे रंगाच्या दाढीसारखे दिसतात. या बुडबुड्यांना हात लावल्यावर नेहमीपेक्षा वेगळी जाणीव होते. जरा वेळाने क्रीम धुवून टाका. तुमचा चेहरा छान खुललेला असेल.



## वाचा तर खरे

आता लवकरच परीक्षांचा सीझन सुरू होत आहे. या परीक्षांमध्ये अधिकाधिक गुण मिळावेत या हेतूने अनेकांनी अभ्यासाला सुरुवात केली असेल. काहींची उजळणी सुरू असेल. अभ्यासादरम्यान सगळ्यात महत्त्वाची असते ती एकाग्रता. एकाग्रता साधण्याची सोपी युक्ती पाहा. अभ्यासातून थोडा वेळ काढा, पेनाचं टोपण काढून निब डोळ्यासमोर धरा. आता निबकडे एकटक पाहा. यावेळी डोक्यात कोणतेही विचार येणार नाहीत याची काळजी घ्या. एक मिनिटांपर्यंत असं केल्याने एकाग्रता साधणं सहज शक्य होईल.

## हे गुणगुणा

पाहिले न मी तुला, तू मला न पाहिले
ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले

हिमवर्षावातही कांती तव पाहुनी
तारका नभातल्या लाजल्या मनातुनी
ओघळले हिमतुषार गालांवर थांबले
ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले

का उगाच झाकिशी नयन तुझे साजणी
सांगतो गुपीत गोड स्पर्श तुझा चंदनी
धुंदल्या तुझ्या मिठीत देहभान हरपले
ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले

मृदू शय्या टोचते, स्वप्न नवे लोचनी
पाहिलेस तू तुला आरशात ज्या क्षणी
रूप देखणे बघून नयन हे सुखावले
ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले

गीत - मधुसूदन कालेलकर
संगीत - अनिल-अरुण
स्वर - सुरेश वाडकर
चित्रपट - गुपचुप गुपचुप

## फॉरवर्ड्स

प्रेमातल्या लपंडावाचा खेळ म्हटला
तर सोपा, म्हटला तर अवघड.
जिक्र ही नही मेरा होता है
कभी उनकी जुबान पर,
कहने को वो क्या-क्या कह
जाते है शायरीसे

## आरोग्यमंत्र
# लाभदायी हिंग



विविध पदार्थांमध्ये वापरला जाणरा महत्त्वाचा घटक म्हणजे हिंग. हिंगामुळे पदार्थांना विशिष्ट चव प्राप्त होते. परंतु हिंगामध्ये औषधी गुणधर्मही आहेत. त्यात पोटाचे विकार तसंच पचनासंबंधीच्या तक्रारींवर हिंग गुणकारी ठरतो, हे बहुतेकांना माहीत आहे. मात्र, या व्यतिरिक्तही हिंगाचे आरोग्यदायी लाभ आहेत. त्या विषयी जाणून घेऊ...

❖ हिंगाच्या सेवनाने डोळ्यांचे काही विकार बरे होतात.

❖ काटा टोचल्यास किंवा शरीरात लाकडाचं तूस गेल्यास हिंग पाण्यात मिसळून त्या भागावर लावावं. वेदना थांबतीलच आणि काटाही निघून येईल.

❖ खाज, खरूज अशा त्वचाविकारांवर हिंग उगाळून लावावं. त्वचाविकार बरे होतात.

❖ बद्धकोष्ठतेची तक्रार असल्यास हिंग आणि खायचा सोडा हे मिश्रण रात्री घ्यावं. सकाळी पोट साफ होईल.

❖ पोटदुखी असेल तर हिंग, ओवा आणि मीठ यांचं मिश्रण खावं. पोटात जंत झाले असतील तर हिंग पाण्यात मिसळून एनिमा दिल्याने आराम मिळतो.

❖ भूक लागत नसेल तर तुपात थोडं हिंग भाजून आलं आणि लोण्यासोबत खावं.

❖ तिळाच्या तेलात हिंग घालून हे मिश्रण कानात घातल्यास कानदुखी बरी होते.

❖ उलट्या होत असतील तर हिंग पाण्यात मिसळून तो लेप पोटावर लावावा.

❖ हिंग गरम करून त्याचा लेप कपाळाला लावल्यास डोकेदुखी थांबते.

## महत्त्वपूर्ण काही...
# हरितगृह वायू

अलीकडे हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाबाबत सतत चर्चा ऐकायला येत आहे. त्यामुळे हरितगृह वायूंविषयी जाणून घेण्याची उत्सुकता वाढली आहे. खरं तर हरितगृह वायूंची संख्या सहा आहे. त्यातील कर्बवायू आणि मिथेन वायू यांचा पर्यावरण ढासळण्यामध्ये महत्त्वाचा भाग असला तरी उरलेले चार म्हणजे बाष्प, नायट्रस ऑक्साइड, ओझोन आणि सीएफसी (कार्बन फ्लोरो कार्बन) या वायूंचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही. हे तसे मानव निर्मित असून, उष्णता शोषण करून सभोवतालचे तापमान वाढवण्याचे कार्य करतात. पाणी जपून वापरा, असा संदेश दिला जातो, तेच पाणी प्रत्यक्षात मात्र ढिसाळपणे वापरलं की उष्णतेमुळे या पाण्याचं बाष्प होतं आणि हे बाष्प पुन्हा उष्णता ग्रहण करून ठेवतं. नायट्रस ऑक्साइड हासुध्दा असाच उष्णता शोषण करून सुदृढ पर्यावरणास हानी पोहोचवणारा हरितगृह वायू आहे. रासायनिक शेतीमध्ये मोठया प्रमाणावर नत्र खतं वापरणं हे या वायूच्या निर्मितीस आमंत्रण आहे. वाहनांची संख्या मोठया प्रमाणावर वाढते तेव्हा हा वायूही वाढतो.


## खेचाखेची
### पूर्वी आणि आता

पूर्वी दोघांचे भांडण सुरू झाले,
तर, तिसरा सोडवायला जायचा,
आता, तिसरा त्या भांडणाचा व्हिडिओ बनवतो!

## पंचांग

मंगळवार, २१ जानेवारी २०२५
विक्रम संवत्सर, शके १९४६
पौष कृ. ७, नक्षत्र : चित्रा
चंद्राशी : कन्या, धृति योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२४

# प्रोस्टेट ग्रंथीवरचे उपचार



पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित समस्या आढळतात. त्यातही पन्नाशीनंतर पुरुषांना ही समस्या जास्त सतावते. सर्वसामान्य प्रोस्टॅस्टिटीसपासून जीवघेण्या प्रोस्टेट कॅन्सरपर्यंत या ग्रंथींशी संबंधित बरेच विकार असतात. त्यावर वेळेत उपचार होणं गरजेचं असतं. प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित विविध प्रकारांनुसार आयुर्वेदात उपचार सांगण्यात आले आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या.

पित्तदोषांमुळे निर्माण होणारे प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित विकार पुनर्नवा, बार्ली आणि खसखस अशा औषधी वनस्पतींच्या सेवनाने आटोक्यात राहू शकतात. या वनस्पतींमध्ये थंडावा देणारे गुणधर्म असतात. यामुळे पित्ताची तीव्रता कमी होते आणि आराम मिळतो.

वातदोषांमुळे निर्माण होणाऱ्या प्रोस्टेट ग्रंथींच्या समस्या दूर करण्यासाठी सालेप ऑर्किडच्या मुळांचा वापर करावा. यात शरीराचं झालेलं नुकसान भरून काढण्याची क्षमता असते. यासोबतच गुग्गुळ, पुनर्नवा आणि गोक्षुरासारख्या वनस्पतीही लाभदायी ठरतात.

दालचिनी, गुग्गुळ, आलं, शैलजीत हे औषधी घटक कफ दोषांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या दूर करायला मदत करतात. गुग्गुळात शरीर शुद्ध करण्याचे गुण असतात. त्यामुळे कफ दोषांचा प्रभाव कमी होतो. प्रोस्टेट ग्रंथींचा आकार वाढल्यानेही बराच त्रास होतो. अशा परिस्थितीत काटेरी किंवा कडवट लेट्यूसचा रस उपयुक्त ठरतो. शैलजीत आणि चरक या औषधी वनस्पतींचा वापरही यासाठी केला जातो.

## दिनवेध

- १८८२ : कादंबरीकार वामन मल्हार जोशी यांचा जन्म.
- १८९४ : कवी माधव त्र्यंबक पटवर्धन यांचा जन्म.
- १९२४ : समाजवादी नेते प्रा. मधू दंडवते यांचा जन्म.

### फोकस...



प्रा. मधू दंडवते (२१ जानेवारी १९२४ - १२ नोव्हेंबर २००५) हे समाजवादी नेते व अर्थतज्ज्ञ होते. त्यांचा जन्म अहमदनगर येथे २१ जानेवारी १९२४ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण तेथील म्युनिसिपल शाळेमध्ये झाले. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे माध्यमिक शिक्षण अहमदनगर एजुकेशन सोसायटीच्या शाळेमध्ये झाले. त्यांचे वडील रामचंद्र दंडवते हे सिव्हिल इंजिनीयर होते. वडिलांनी मधू यांची शिक्षणातील आवड पाहून त्यांना पुढील शिक्षणासाठी मुंबईला पाठवले. हिंदी आणि इंग्लिश या दोन्ही भाषांवर असलेले प्रभुत्व आणि व्यासंग यामुळे दंडवते यांनी लोकसभेच्या कामकाजावर आपला ठसा उमटवला. मधू दंडवते यांचे नाव संसदेत ठसा उमटवणाऱ्या काही महत्त्वाच्या मराठी नेत्यांमध्ये आवर्जून घेता येईल. ते लोकसभेवर राजापूर मतदार संघातून जवळजवळ वीस वर्षे सातत्याने निवडून आले. त्यांनी जनता पक्षाचे सरकार केंद्रात आले तेव्हा मंत्रिपदही भूषवले. दंडवते १९७१ ते १९९० दरम्यान राजापूर मतदारसंघातून सलग पाच वेळा लोकसभा सदस्यपदी निवडले गेले. दंडवते मोरारजी देसाई यांच्या पंतप्रधानकाळात रेल्वेमंत्री होते. या काळात त्यांच्या पुढाकारामुळे रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचा प्रवास अनेक प्रकारे सुखावह झाला. या वर्गातील शयनकक्षातील लाकडी फळकुटे बदलून त्यावर कमीतकमी दोन इंच जाडीच्या गाद्या घालण्यात आल्या. याच सुमारास त्यांनी कोकण रेल्वेच्या विकासाचे काम सुरू केले. याशिवाय व्ही.पी. सिंग यांच्या पंतप्रधानकाळात दंडवते भारताचे अर्थमंत्री होते. ते १९९०-१९९८ दरम्यान भारताच्या योजना आयोगाचे मुख्याधिकारी होते. त्यांच्या पत्नी प्रमिला दंडवते भारतातील समाजवादी चळवळीतील प्रमुख नेत्या होत्या. दंडवते आपल्या अगदी साध्या राहणीबद्दल ख्यातनाम होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इच्छापत्रानुसार त्यांचे पार्थिव शरीर मुंबईमधील जे.जे. हॉस्पिटलला दान करण्यात आले. दंडवते यांना तरुण वयातच राजकीय क्षेत्रात आवड निर्माण झाली. त्यांच्यावर ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, साने गुरुजी यांच्यासारख्या राजकीय नेत्यांचा प्रभाव होता. १२ नोव्हेंबर २००५ रोजी त्यांचे निधन झाले.

- १९४३: क्रांतिकारक हेमू कलाणी यांना ब्रिटिशांनी फाशी दिली.
- १९४५: क्रांतिकारक रासबिहारी बोस यांचे निधन.
- १९५०: कादंबरीकार जॉर्ज ऑरवेल यांचे निधन.
- १९७२ : त्रिपुरा, मणिपूर आणि मेघालय स्वतंत्र राज्य बनले.
- १९८६ : अभिनेता सुशांतसिंग राजपूतचा जन्म.
- २०१३:केंद्र सरकारने सोने आणि प्लॅटिनमवरील आयात कर चार टक्क्यांवरू सहा टक्के केला.
- २०१४:मुझफ्फरनगर दंगलीवेळी सामूहिक अत्याचारप्रकरणी २२ दंगलखोरांविरोधात स्थानिक न्यायालयाने अटक वॉरंट जारी केला.


## आजचा मेन्यू
# दुधी भोपळ्याचे भजे

**साहित्य :** बेसन, तांदळाचे पीठ, धने पावडर, जिरे पावडर, तिखट, हळद, हिंग, ओवा

**कृती :** दुधी भोपळा सोलून व धुऊन घ्या. सुरीने त्याचे मध्यम जाडसर आकाराचे गोल काप करून घ्या. मध्यम आकाराच्या बाटलीचे टोपण घ्या. एक गोल काप घेऊन त्याच्यामध्ये झाकण ठेवा व दाबून मधला गोल करून घ्या. अशाप्रकारे सर्व गोल रिंग्ज तयार करून घेणे. तिखट व मीठ हे रिंग्जला लावून, चोळून बाजूला ठेवा. एका बाऊलमध्ये बेसन व तांदळाचे पीठ घ्या. सर्व मसाले घालावे. ओवा हाताने चोळून त्यात घाला. सर्व व्यवस्थित मिक्स करून घ्या. थोडे-थोडे पाणी घालून पीठ भिजवून घ्या. गॅसवर कढईत तेल तापत ठेवा. भिजवलेल्या पिठात थोडी कोथिंबीर चिरून घाला. पीठ घट्ट वाटत असल्यास, एक टेबलस्पून पाणी घालून, हलवून घ्या. दोन-तीन रिंग्ज पिठात बुडवून घ्या. पीठ व्यवस्थित निथळून घ्या. पिठात बुडवून घ्या. नंतर तेलात सोडा. कढईत जेवढे मावतील, तेवढे घालून घ्या. दोन्ही बाजूने छान लालसर होईपर्यंत तळून घ्या. गॅस मध्यम आचेवर ठेवावा. अशाप्रकारे सर्व भजी तळून घेणे. टोमॅटो सॉस बरोबर किंवा नुसती खाल्ली तरी छान लागतात.



# महाशब्दकोडे ७९७



**आडवी विधाने**:— 1) अर्थात, खात्रीने, हमखास 3) खबरबात, सद्यःस्थिती 6) श्रीगणेशाचे एक नाव 9) केंव्हा 10) पाठीच्या हाडांची गाठ 12) हानी, तोटा 13) तुकडा, भाग 14) पुर्वजांनी मिळविलेल्या वतनाचा सांभाळ करणारा 15) अरण्य, जंगल 16) खुळा, भ्रमिष्ट, वेड लागलेला 17) पारद 18) थुंकी, चूळ, कोकिळ पक्षी 19) एकाएकी मनात उद्‌भवलेली अनावर इच्छा 21) स्पर्धा, चढाओढ 25) बुद्धिरुपी दिवा 28) हत्तीचे लांब नाक 29) स्वार झालेला 30) कन्या, मुलगी 32) नमस्कार, वंदन 33) घरी आलेल्यांचे हसून या म्हणणे 34) कविता 35) ज्यात गण, मात्रा, अक्षरे याविषयी काही निर्बंध नसतो असे लेखन 36) जिम्मा, जामीनकी 38) मौल्यवान मणी 40) सततचा, निरंतर 42) धान्य मोजण्याचे एक माप 43) काव्य 45) चिंतन, ध्यान 47) नुकताच जन्माला आलेला 50) तापविलेल्या दुधावरचा पापुद्रा 51) मूर्खपणाचे सोंग घेऊन स्वतःचा मतलब साधणे या अर्थाचा एक वाक्प्रचार 56) भाऊ, भ्राता 57) रात्र (हिं.) 58) धाक, वचक 60) बैलाच्या मानेवरील जोखड 61) आर्जव, विनवणी, प्रार्थना 62) जाणकार, माहिती असलेला 65) प्रख्यात विनोदी मराठी नाटक 'मोरुची मावशी' चे लेखक 67) ध्वनी, छंद 68) नेहमी, निरंतर 69) चापट व मऊ पदार्थाचा आघात 70) घर, शरीर 72) अधिकार, योग्यता, पदवी 73) आठवड्यातील एक वार 74) आनंद 75) लक्ष्मी, विष्णूपत्नी 77) वैरी, गनीम 78) भुलाबाईची गाणी संपल्यावर वाटण्यात येणारा प्रसाद 81) कट, कारस्थान, लबाडी 82) समशेर, खड्‌ग 83) आईचा भाऊ 84) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव 85) गाय 86) बैल ज्याचे वाहन आहे असा देव

**उभी विधाने**-1) उभा राहिला असता गुडघ्यास सहज पुरण्याजोगा लांब हाताचा (मनुष्य) 2) पर्जन्य, पाऊस (हिं.) 3) एखादे कार्य हमखास पार पाडण्याचे कौशल्य अंगी असणे 4) वध 5) गोडी, चव, स्वाद 6) हृदय चिरणारे 7) मृत्यूदेवता 8) दया, करुणा 9) केंव्हाही 11) कर्ण 14) डुक्कर 17) गरीब, क्षुल्लक, तेजोहीन 20) कठीण, त्रासदायक 22) वायू, पवन 23) मोजका खर्च, काटकसर 24) श्रवणेंद्रिय, 25) जाणीव, विषयाचे आकलन 26) नमन, वंदन 27) गरीब, नम्र 28) नाटकात धारण केलेली भूमिका 31) यज्ञ 33) शिकागो येथे विश्वातील धर्मशास्त्र पंडितांच्या सभेत प्रतिनिधित्व करुन हिंदू धर्माची शिकवण देणारे थोर भारतीय तत्वचिंतक 34) चुलत भावाचा पिता 37) अधिकार (हिं.) 39) अचानक 41) घोडदळातील एक अधिकार पद 42) धान्यवगैरे पिकविणारी जमीन 44) एक उंच वाढणारा वृक्ष 45) अभिप्राय, विचार 46) अडचण, त्रास 48) उणे, कमी करणे 49) गमन 50) संत पुरुष 52) वेढा, वर्तुळ, गराडा 53) उन्माद, माज 54) ज्याला खरी परीक्षा नाही असा 55) दिवस, वासर 59) सूर्यावर पडणारी छाया 61) विनाश करणारे 63) हिताच्या आड येणारा 64) थंडी 65) राखून ठेवलेले, राखीव 66) तारांबळ, धांदल 68) सिंह 71) दर महिन्यास 72) दोन पक्षात आपले कमिशन घेऊन मध्यस्थी करणारा 76) विचार, अभिप्राय 77) बाण, तीर 79) कौशल्येचा पुत्र 80) पाऊल, अधिकार, कवितेचा एक प्रकार 81) कावळा (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | नु | प | म | | र | ब | र | | पा | ण | पो | ई | | मे | घ |
| चू | | र | त | | सा | | ही | न | | | ळी | | द | म | ट |
| क | ल | म | | प्र | त | | त | ट | बं | दी | | द | र | | स |
| | क | वी | सं | मे | ल | न | | स | ड | पा | त | ळ | | स | र्प |
| ख | ब | र | | य | | व | | म्रा | | व | र | ण | भा | त | |
| ल | | च | | | खो | ल | ग | ट | | ली | | | | त | मा |
| | च | क्र | व्यू | ह | | वि | ज | | वे | | नि | वा | रा | | स |
| अ | | | ह | र | | शे | रा | स | स | व्वा | शे | र | | ध | |
| शो | ष | क | | ह | | ष | | ह | वा | | ष | | न | र्म | दा |
| क | | स | म | र | स | | टी | का | | पा | | प | | सं | |
| वा | न | | न | म | न | | प | रि | च | य | प | त्र | | क | |
| टि | का | ऊ | | हा | | क | | प | र | वा | | का | | ट | क |
| का | र | | | दे | ऊ | ळ | | त | | ट | क्क | र | | | ब |
| | दे | व | घे | व | | प | त | पे | ढी | | | | अ | पा | र |
| जा | णे | | र | | त | | क | ढी | | अ | घो | री | | म | |
| दू | | ग | णे | श | वा | त | | | पै | जा | र | | | र | वा |

# गमन आणि आगमन!

अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी सोहळा सोमवारी पार पडला. भारतीय वंशाच्या मतदारांचे वाढते समर्थन आणि त्यांचे ट्रम्प यांच्या धोरणांमागे उभे राहणे, यामुळे वेगळे चित्र निर्माण झाले आहे. भारतीयांच्या संदर्भात अमेरिकेचा विचार करत असताना, आगमन आणि गमन या दोन घटनांचाही विचार करावा लागेल. एकीकडे अमेरिकेत नवीन अध्यक्षांचे आगमन झाले असतानाच, दुसरीकडे अमेरिकेपासून सुमारे ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या कॅनडातील पंतप्रधानांच्या अलीकडच्या गमनाकडे बघणेही रंजक ठरावे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांना अलीकडेच पायउतार व्हावे लागले. २०१५ पासून त्यांनी कॅनडाचे नेतृत्व केले, परंतु दुसऱ्या कार्यकालाची समाप्ती होण्याआधीच त्यांना राजकीय दडपणामुळे पद सोडावे लागले. त्यांच्या लिबरल पक्षात असंतोष वाढला होता आणि ज्यांच्या सहकार्याने त्यांचे सरकार चालले होते, त्या खलिस्तानवादी शीख पक्षानेदेखील त्यांचा पाठिंबा मागे घेतला. परिणामी, ट्रुडो यांना पदत्यागाशिवाय पर्याय उरला नाही. त्यांना लिबरल पक्षाची नेतृत्वही सोडावे लागले. होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूक त्यांच्या नेतृत्वात जिंकण्याच्या शक्यता कमी दिसल्याने पक्षात असंतोष निर्माण झाला, ज्याचा परिणाम त्यांच्या पद सोडण्यात झाला. कॅनडातील शीख मतदारांसह अनेक भारतीयांचा ट्रुडो यांना पाठिंबा होता, तरीही त्यांना जावे लागले! दुसरीकडे, ही घटना घडण्यापूर्वी २०२४च्या अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प यांनी जोरदार विजय मिळवला. अमेरिकेतील बहुतांश मतदारांनी ट्रम्प यांच्यावर आपला विश्वास दाखवला. विशेषतः भारतीय मतदारांनी! शपथविधी सोहळ्यानिमित्त एक मुद्दा पुन्हा नव्याने चर्चेत आला. तो म्हणजे ट्रम्प आणि त्यांच्या रिपब्लिकन पक्षाला समर्थन देणाऱ्यांमध्ये वेगाने वाढत जाणारे भारतीय वंशाच्या मतदारांचे प्रमाण! अमेरिकेत राहणारे बहुतेक भारतीय वंशाचे मतदार हे डेमॉक्रॅटिक पक्षाशी संबंधित आहेत. अनेक वर्षे त्यांची मते डेमॉक्रॅटिक पक्षाच्या बाजूने जात होती, अध्यक्षीय निवडणुकीत भारतीय वंशाच्या मतांमध्ये पर्यायाने मतदारांमध्ये भिन्नता दिसून आली. एका आकडेवारीनुसार, निवडणुकीत भारतीय वंशाची मते विभागली गेली होती. सरासरी ५५ टक्क्यांवर भारतीय वंशाच्या मतदारांनी ट्रम्प यांच्याबाजूने मतदान केले. भारतीय वंशाचे मतदार, हे अमेरिकेतील एकूणच मतदारांच्या संख्येत केवळ एका टक्का आहेत. असे असले तरी, रिपब्लिकन पक्षाला त्याचे दिवसेंदिवस वाढते समर्थन मिळते आहे. ट्रम्प यांची इमिग्रेशनबाबतची कडक भूमिका जगजाहीर आहे. त्यामुळे भारतीय वंशाचे मतदार इमिग्रेशनच्या संदर्भात डेमॉक्रॅटिक पक्षाकडे आशेने बघत असल्याचे चित्र आजवर बघायला मिळाले होते. डेमोक्रॅटिक पक्षाची धोरणे ही भारतीय वंशाच्या मतदारांना स्वीकारार्ह असल्याचेही दिसून आले होते. निवडणुकीतही ट्रम्प यांच्यापुढे भारतीय वंशाच्याच कमला हॅरिस यांचे आव्हान होते. हॅरिस यांना भारतीय मतदारांची मते विनासायास मिळतील, अशी अटकळ तेव्हा मीडियाने बांधली होती, परंतु तसे घडले नाही. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या बाजूने झुकणाऱ्या भारतीयांनी वेगळा मार्ग स्वीकारला. अमेरिकन जनतेमध्ये ट्रम्प यांचे आकर्षण मोठे आहे. त्यांनी महागाई, अर्थव्यवस्था, बेकायदेशीर इमिग्रेशन यांसारखे विविध मुद्दे सध्या पुढे आणले आहेत. मेक अमेरिका ग्रेट अगेन या घोषणेची त्यांची जादू अजूनही कायम आहे. काही अभ्यासकांनुसार, मागील दोन निवडणुकांपासून भारतीय वंशाचे मतदार हे हळूहळू रिपब्लिकन पक्षाकडे वळत आहेत. ट्रम्प यांची स्थलांतरितांबाबतची कठोर भूमिका अमेरिकन लोकांना आवडत आहे काय? कायदेशीर मार्गाने अमेरिकेत येणाऱ्यांबाबत भेदभाव केला जातो, तर बेकायदा पद्धतीने येणाऱ्यांना ग्रीन कार्ड आणि नागरिकत्व पटकन मिळते, असा समज सध्या पक्का झालेला आहे. या सगळ्या पृष्ठभूमीवर, भारतीय-अमेरिकन नागरिकांना विश्वास आहे की, ट्रम्प असताना अमेरिका आणि भारत यांच्यासोबतचे संबंध मजबूत राहतील. एकूणच डोनाल्ड ट्रम्प यांना व्यवसाय-केंद्रित मानले जाते, त्यामुळे आयटी क्षेत्रातील भारतीयांचा एक वर्ग ट्रम्प यांच्याशी जोडला गेला आहे. त्यामुळेच की काय, रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी, एलोन मस्क, जेफ बेझोस आणि मार्क झुकरबर्ग यांची शपथविधी सोहळ्यातील उपस्थिती ठळक आणि भारतीय बाजारपेठेसंदर्भात ठळक म्हणावी लागेल.

> **अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी सोहळा सोमवारी पार पडला. भारतीय वंशाच्या मतदारांचे वाढते समर्थन आणि त्यांचे ट्रम्प यांच्या धोरणांमागे उभे राहणे, यामुळे वेगळे चित्र निर्माण झाले आहे. भारतीयांच्या संदर्भात अमेरिकेचा विचार करत असताना, आगमन आणि गमन या दोन घटनांचाही विचार करावा लागेल. एकीकडे अमेरिकेत नवीन अध्यक्षांचे आगमन झाले असतानाच, दुसरीकडे अमेरिकेपासून सुमारे ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या कॅनडातील पंतप्रधानांच्या अलीकडील गमनाकडे बघणेही रंजक ठरावे.**

# एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची मोलाची भूमिका

सुप्रसिद्ध लावणीकार, कवी राम जोशी मानवी नरदेहाबाबत वर्णन करताना ही लावणी गायलेली आहे. चौऱ्यांशी दशलक्षकोट्या योन्या फिरल्यानंतर मानवाला दुर्लभ असा नरदेह प्राप्त होतो. त्यामुळे त्याने या देहाचा उपयोग विधायक कायार्साठी करणे आवश्यक आहे. परंतु आज वाढती व्यसनाधिनता नैतिक मूल्यांचा ऱ्हास, तसेच सहजीवनाचा वाईट परिणाम देशातील लोकांवर मुख्यत्वे करुन युवकांवर पडत असलेला पहावयास मिळत आहे. त्याचा परिणाम देशाची भावी आधारस्तंभ असणारी तरुण पिढी ही एचआयव्ही संक्रमणाला बळी पडत असलेली पहावयास मिळते. मानवी भावना या नैसर्गिक असतात. परंतु या भावनांचा उद्रेक म्हणजेच विनाशास निमंत्रण असते. त्यामुळे त्यामध्ये सुवर्णमध्य साधणे आवश्यक असते.

तेजस्वीतता, तपस्वीतता, तत्परता हे तारुण्याचे तीन 'त' कार आहेत. हे प्रत्यक तरुण-तरुणीमध्ये असले पाहिजेत. परंतु खरोखरच हे तिन्ही गुण आपल्या स्वतः मध्ये आहेत का ? या प्रश्नाचे आत्म संशोधन करण्याची आज वेळ आली आहे. कारण नैतिक शिक्षण आवश्यक झालेले आहे. त्यामुळे व्यक्तीला गतिमानता प्राप्त होण्यास मदत होईल. आजचा युवक व्यसनरूपी चक्रव्युव्हामध्ये अडकत आहे. ज्याचे पर्यावसन १५ ते ४९ या वयोगटातील लोकच आज जास्तीत जास्त व्यसनाधीन, एचआयव्ही बाधित पहावयास मिळताहेत. एचआयव्ही संक्रमणाला बळी पडण्याचे महत्त्वाचे कारण हे या रोगाबद्दल असलेले अपुरे ज्ञान. तारुण्य अवस्थेतील जल्लोष आहे. त्यामुळे आजच्या युवांनी या आजाराबाबत प्रशिक्षित समुपदेशक, सल्लागार यांच्या मार्फत शास्त्रीय माहिती घेणे आवश्यक आहे. आयसीटीसी केंद्र यामध्ये (दिशा केंद्रामध्ये) येणाऱ्या सर्व व्यक्तींना एचआयव्ही, एड्स बाबत संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली जाते. तसेच त्यांच्या संमतीनेच त्यांची एचआयव्ही चाचणी केली जाते. चाचणीपूर्व तपासणीमध्ये चाचणी नंतरच्या निष्कषार्बाबत समोरील व्यक्तीला कल्पना दिली जाते. तपासणीबाबत पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाते. चाचणी पश्चात समुपदेशनामध्ये समोरच्या व्यक्तीच्या मानसशास्त्रीय मुल्याचा अभ्यास करुन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन केले जाते. तात्पर्य, परिवर्तन हा काळाचा नियम आहे. या चराचर सृष्टीची निर्मिती ज्या निर्मिकाने उदात्त धोरणाने केली, तो उद्देश सफल करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. संस्कृतीचा वारसा आपण जोपासला पाहिजे. परंतु नवीन इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्सअप च्या संस्कृतीमध्ये आपण आपली जुनी संस्कृती, नितीमुल्य पायदळी तुडवता कामा नये. वाढती फॅशन, अंगप्रदर्शन तसेच संयमहीन जीवन यामुळे आपण आपले अस्तित्वच विसरत चाललो आहोत. खऱ्या अर्थाने युवकांनी एड्समुक्त महाराष्ट्र, भारत स्वप्न नव्हे ध्येय, हे वाक्य खरे ठरवायचे असेल तर वरील सर्व बाबींचा सारासार विचार करायला हवा.महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. या कक्षांतर्गत विविध आयसीटीसी मार्फत युवकांसाठी एचआयव्ही, एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद, पोस्टर प्रदर्शन इत्यादी उपक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन वेगवेगळ्या लक्ष्यगटांमध्ये केले जाते.

यावर्षीचे जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य 'मार्ग हक्काचा, सन्मानाचा!' हे आहे. म्हणजेच एचआयव्ही संसर्गित लाभार्थ्यांना पण सर्व सामान्य नागरिकांसारखे हक्क आहेत, ते वेगळे नाहीत. त्यांना समाजामध्ये सन्मानाची व आदराची वागणूक दिली पाहिजे. सर्व कौटुंबिक सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, नव्हे तो त्यांचा हक्क आहे. यासाठी भारत सरकारने हक्काची जोपासणा करण्यासाठी एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७ अंमलात आणला आहे. ज्या कायद्याद्वारे एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना सन्मानपूर्वक वागणूक प्रदान करण्यात आली आहे. जर कोणी कलंकित करत असेल किंवा भेदभाव करत असेल, तर कायद्याने त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. यावर्षीच्या घोषवाक्यानुसार एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही ही आम्हीपणाची भावना एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या लाभार्थ्यांच्या मनामध्ये विविध जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढीस लावणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

**सुहास कुलकर्णी,**
जिल्हा रुग्णालय, बीड
मो.नं. ९४२००१७५३९

## 'एचएमपीव्ही' विषाणूला घाबरू नका

सध्या चीनमध्ये 'ह्यूमन मेटा न्यूमो व्हायरस' (एचएमपीव्ही) उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. मानवी मेटा न्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँडस मध्ये २००१मध्ये आढळला. मानवी मेटा न्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे, जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो. यानुषंगाने डीजीएचएस आणि संचालक, एन सी डी सी, दिल्ली यांनी दि. ३ जानेवारी २०२५ रोजी एक निवेदन प्रसिध्द केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. तथापि खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये, या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

चीनमधून आलेल्या नवीन विषाणू 'ह्यूमन मेटा न्यूमो व्हायरस' (एचएमपीव्ही) अहवालांबाबत चिंतेचे कारण नाही. याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भितीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नाही. तथापि या पार्श्वभूमीवर आपल्या कार्यक्षेत्रातील सर्वेक्षण अधिक गतिमान करुन सर्दी-खोकला अर्थात आय एल आय/ सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात यावेत, असे आवाहन आरोग्य सेवा, पुणेचे संचालक डॉ.नितीन अंबाडेकर यांनी केले आहे.

**मनोज सानप,**
ठाणे

# इस्त्रायल -हमास युद्धबंदीमुळे शांततेची आशा

**विशेष**
**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
९५६१५९४३०६

हमासच्या ताब्यातील इस्त्रायली ओलिसांच्या सुटकेबाबतच्या करारावर दोन्ही बाजूंचे एकमत झाले. त्यानंतर इस्त्रायल मंत्रिमंडळांनने गाजातील युद्धबंदीच्या कराराला मंजुरी दिली. त्यामुळे गेल्या १५ महिन्यांपासून सुरू असलेल्या इस्त्रायल - हमास संघर्षावर तोडगा निघण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. इस्त्रायल हमासमध्ये युद्धबंदीच्या कराराची घोषणा अमेरिका व कतारने केली होती. त्यानंतर जगभरातून याचे स्वागत झाले. मात्र हमासच्या ताब्यातील इस्त्रायली ओलिसांच्या सुटकेबाबत दोन्ही बाजूंचे एकमत झाले असल्याचे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी स्पष्ट केल्यानंतर नवा पेच निर्माण झाला होता. त्यावर इस्त्रायल मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यामुळे हा पेच सुटला.

युद्धविरामाच्या करारानुसार पहिल्या टप्प्यात सहा आठवड्यांच्या कालावधीत युद्ध थांबवले जाईल, तसेच हमासच्या ताब्यातील ओलिसांची आणि इस्त्रायलच्या ताब्यातील पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली जाईल. इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धविरामावरील कराराची घोषणा ही निश्चितच मोठी उपलब्धी आहे. परंतु जोपर्यंत तो प्रत्यक्षात येत नाही, तोपर्यंत पुन्हा युद्धाची भीती कायम राहणार आहे. किंबहुना, गेल्या वर्षी मे महिन्यानंतर तत्काळ किंवा तात्पुरत्या युद्धबंदीबाबत अनेक पुढाकार घेण्यात आला. परंतु त्यानंतर काही दिवसांनी हल्ल्यात लोक मारल्या गेल्याच्या बातम्या येत राहिल्या. साहजिकच, युद्ध काही दिवस थांबवण्याची कटिबद्धता नसल्यामुळे आणि शांततेकडे दुर्लक्ष केल्यामुळेच आतापर्यंत इस्त्रायलच्या हल्ल्यात पॅलेस्टिनी लोक मारल्या जात असल्याच्या बातम्या येत आहेत. पण आता इस्त्रायल आणि हमास यांच्यात युद्धबंदीच्या प्रश्नावर ताज्या कराराच्या बातम्या आल्याने यावेळी शांततेचा मार्ग मोकळा होईल, अशी आशा निर्माण झाली आहे. कराराच्या सध्याच्या स्वरूपानुसार, हमास इस्त्रायली ओलीस आणि इस्त्रायलमधील शेकडो पॅलेस्टिनी कैद्यांची टप्प्याटप्प्याने सुटका सुनिश्चित करेल. याव्यतिरिक्त, गाझामधील विस्थापित लोकांना देखील परत येण्याची परवानगी दिली जाईल. याशिवाय युद्धग्रस्त भागात मानवतावादी मदत पोहोचवण्याची व्यवस्था असेल. सध्याचे युद्ध ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्त्रायलवर हमासच्या हल्ल्याने सुरू झाले होते, ज्यामध्ये सुमारे बाराशे लोक मारले गेले होते. त्यानंतर हमासला प्रत्युत्तर देण्याच्या नावाखाली इस्त्रायलने गाझावर केलेला हल्ला ही स्वाभाविक प्रतिक्रिया मानली गेली. एका आकडेवारीनुसार, इस्त्रायलच्या हल्ल्यात आतापर्यंत सुमारे ५० हजार लोक मारले गेले आहेत. गाझामध्ये दोन लाखांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. त्यामुळे हमासचा दहशतवाद संपुष्टात येईल, असे इस्त्रायलचे म्हणणे आहे. पण इस्त्रायलच्या हल्ल्यात हमासचे किती सदस्य मारले गेले आणि किती नागरिकांना जीव गमवावा लागला, हा तपासाचा विषय आहे. युद्धात मारल्या गेलेल्या सामान्य लोकांमध्ये मोठ्या संख्येने लहान मुले आणि महिला होत्या, ज्यांचा युद्धाशी काहीही संबंध नव्हता. गाझावरील हल्ल्यादरम्यान रुग्णालये, शाळा आणि आश्रय घेण्याची ठिकाणेही या हल्ल्यापासून वाचली नाहीत. युद्धासंदर्भातील आंतरराष्ट्रीय नियम आणि नियमांचा कोणताही हिशेब घेणे आवश्यक मानले जात नव्हते. या सगळ्यासाठी इस्त्रायलवर नरसंहाराचा आरोप होता आणि त्याच्या पंतप्रधानांवरही युद्ध गुन्ह्यांचा आरोप होता. इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध संपवण्यासाठी संयुक्त राष्ट्रासह विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते, मात्र त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत नव्हते. आता एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर दोन्ही बाजूंमध्ये युद्धविरामाचा करार झाला असेल, तर त्यात कोणतेही अडथळे निर्माण होऊ नयेत, त्याची अंमलबजावणीही व्हावी आणि शांतता कायम राहावी, यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. एकीकडे युद्धबंदीच्या कराराची घोषणा होत असताना आणि दुसरीकडे हल्ले आणि लोकांची हत्या सुरू असताना अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये. कोणत्याही समस्येचे किंवा वादाचे निराकरण हे अंतहीन युद्ध असू शकत नाही हे एक प्रस्थापित सत्य आहे. हे शक्य आहे की या युद्धविरामाने इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील प्रदीर्घ काळातील कटुता पूर्णपणे संपुष्टात येणार नाही, परंतु कोणत्याही गुंतागुंतीच्या समस्येचे निराकरण शेवटी संवादातूनच होते. करार रविवारी प्रत्यक्षात अंमलात येण्यापूर्वीत संपूर्ण गाझा पट्टीत पॅलेस्टिनी नागरिकांनी जल्लोष करायला सुरुवात केली. संपूर्ण प्रदेश बेचिराख करणारे युद्ध १५ महिन्यांनंतर थांबण्याची आशा निर्माण झाल्यामुळे लोक आनंदात होते. काही ठिकाणी हमासचे अतिरेकीही त्यांच्याबरोबर सहभागी झाले. काही ठिकाणी हमासच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या.करारानुसार युद्धविरामाचा पहिला टप्पा सहा आठवड्यांचा असेल. त्या कालावधीत गाझामधून ३३ ओलिसांची सुटका केली जाईल. त्याबदल्यात शेकडो पॅलेस्टिनी कैदी आणि कच्चे कैदी यांना परत पाठवले जाईल.यादरम्यान, गाझातील बफर क्षेत्रातून इस्त्रायली फौजा माघार घेतील आणि विस्थापित पॅलेस्टिनींना परत येता येईल. तसेच उद्ध्वस्त झालेल्या भागामध्ये मोठ्या प्रमाणात मानवतावादी मदत पुरवली जाईल.

**वर्धा**

# महिला सक्षमीकरणाला बळ मिळावे

**प्रासंगिक**
**वृषाली पाटील**

महिलांच्या अंगी असणाऱ्या विविध क्षमतांचे संवर्धन करुन त्यांचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकास साधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने अनेक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर राज्यातील महिला आणि मुलींना आवश्यक संधी व सेवा-सुविधा उपलब्ध करुन देवून महिला सक्षमीकरणासाठी राज्याचे चौथे महिला धोरण मार्च २०२४ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. प्रत्यक्ष कृतीतून महिला सबल होण्यासाठी राज्य शासन भरीव योगदान देत आहे. महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या विकासासाठी राज्य शासनाच्या वतीने सन १९९४ मध्ये पहिले, सन २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण जाहीर करण्यात आले आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी ७ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचे 'चौथे महिला धोरण-२०२४' जाहीर झाले आहे. या धोरणाच्या कृती आराखड्याबरोबरच अंमलबजावणीच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. महिलांचे सक्षमीकरण आणि विकास साधण्यासाठी या धोरणातील विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्या त्या प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी राज्य आणि जिल्हा स्तरावर गट व समित्या स्थापन करण्यात येत आहेत. राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती ही मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तर जिल्हा स्तरीय अंमलबजावणी सुकाणु समिती ही त्या त्या जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येत आहे.

या धोरणामध्ये महिलांचे आरोग्य, पोषण, आहार, स्वास्थ्य, शिक्षण व कौशल्य, लिंगाधारीत हिंसाचारास आळा, लिंगभाव समानता पूरक रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास इ. उपजिवीकेची साधने वृद्धिंगत करणे, परिवहन, निवारा व स्वच्छतेच्या सुविधांसारख्या लिंगभाव समावेशक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे, लिंगसमभाव संवेदनशील प्रशासन व राजकीय सहभाग तसेच नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल व आपत्ती व्यवस्थापन तसेच अन्य महत्वाच्या क्षेत्रांचा विकास या धोरणामुळे साधण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना आर्थिक हातभार झ जन्मजात अंगी असणारी विविध कौशल्ये आणि क्षमतांचा विकास साधत महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करुन दाखवत आहेत.

महाराष्ट्रातील गरजू महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जून २०२४ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांच्या बॅक खात्यात दरमहा १५०० रुपये डीबीटीव्दारे थेट लाभ हस्तांतरीत करण्यात येत आहेत. यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या हातभार मिळत त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्याबरोबरच आरोग्य आणि पोषणातही सुधारणा होत आहे. तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका अधिक मजबूत होत आहे.

महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी पिंक ई- रिक्षा योजना झपिंक ई- रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येत असून यात एकल महिला, विधवा, परित्यक्तांना प्राधान्य देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत रिक्षा किंमतीच्या २० टक्के रक्कम शासनाकडून देण्यात येते तर १० टक्के रक्कम महिलांनी भरावयाची असून उर्वरित ७० टक्के रक्कम बॅक कर्जाच्या माध्यमातून भरावी लागणार आहे.

ग्रामीण, शहरी भागातल्या तसेच वाड्या-वस्त्या, पाड्यांवरील पीडित, अर्जदार महिलांपर्यंत राज्य महिला आयोग पोहोचत आहे. महिलांना त्यांच्याच जिल्ह्यात जलद न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पिडितांना सुरक्षिततेचा आत्मविश्वास देण्यासाठी राज्यात 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली २० डिसेंबर रोजी कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जनसुनावणी घेण्यात आली. यात १५६ तक्रारी प्राप्त झाल्या असून यापैकी २६ केसेस सामोपचाराने मिटवण्यात आल्या. राज्यात आजवर झालेल्या जनसुनावण्यांच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक केसेस मिटणे हे या उपक्रमाचे यश म्हणावे लागेल. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांनी प्रेरित होवून राज्यात कोल्हापूर जिल्ह्यात विधवा प्रथा बंदीचा ठराव सर्वप्रथम मंजूर करण्यात आला आहे. याच विचारांनी प्रेरित होवून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी हेरवाड ग्रामपंचायतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून 'विधवा प्रथा बंदी'चा असा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी कोल्हापूर दौऱ्यावेळी व्यक्त केली.

महिलांचा सन्मान वाढण्यासाठी 'लेक लाडकी' ही नवीन योजना राज्य शासनाने सुरू केली आहे. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात जन्मलेल्या मुलीसाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

**कोल्हापूर**

# सामाजिक स्वास्थ्य सुदृढ असावे

**दृष्टिकोन**
**प्रा. मधुकर चुटे**
९४२०५६६४०४

अलीकडेच राज्यात ठाणे, कल्याण, परभणी आणि बीडमध्ये घडलेल्या घटनांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडले आहे. चंगळवाद आणि परकीय संस्कृतीच्या अतिरेक्याने आपण आपली संस्कृती आणि आचारविचार पायदळी तुडवत असल्याच्या विकृतीने अशा दुर्दैवी घटनांना मोठे उत्तेजन मिळत आहे. ठाण्यातील एका शाळेत दोन चिमुरडींवर शाळेतील सफाई कार्मचाऱ्यानेच केलेल्या अत्याचाऱ्याच्या घटनेने महाराष्ट्रच नव्हे तर देश हादरला होता. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला त्या गुन्हेगाराने कलंकित केले. त्याला फासावर चढवण्याच्या

मागणीसाठी राज्यात ठिकठिकाणी जनतेला रस्त्यावर उतरावे लागले. सरकारने त्याला फासावर लटकवण्यासाठी प्रख्यात वकील नेमले होते. मात्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ठाण्यातील या अत्याचाऱ्याच्या घटनेचे विरोधकांकडून भांडवल केले जाऊ नये म्हणून त्या गुन्हेगाराचा एन्काउंटर करून पोलिसांनी त्यावर पडदा टाकला. त्यानंतर दिल्लीतील निर्भयापेक्षाही भयानक घटना कल्याण पूर्व मध्ये घडली. १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून विशाल गवळी या नराधमाने तिच्यावर अत्याचार केला. नंतर तिची हत्या केली. ही घटना उघडकीस येऊ नये म्हणून मृतदेहाचे तुकडे करून सुटकेसमध्ये भरले. या कटात त्याची तिसरी पत्नीही सहभागी होती. या क्रूरकर्म्यांच्या मुसक्या आवळल्यानंतर त्याची पत्नी माफीचा साक्षीदार होण्यास तयार झाली. अत्यंत थंड डोक्याने केलेल्या या गुन्हेगाराला राजकीय मंडळींचा वरदहस्त असल्याची चर्चा आहे. या गुन्हेगारास कायद्यातील पळवाटांची संधी मिळू नये, कमीत कमी वेळेत त्याला यमसदनी पाठवण्यासाठी सरकारने त्वरेने कार्यवाही केली तरच अशा माथेफिरूंवर जरब बसू शकेल.

राजगुरुनगरमध्ये दोन सख्या बहिणींचा खून करण्यात आला. त्यापैकी एका बहिणीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. बदलापूर आणि कोलकोतातील घटनांनंतर आपण कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक हिंसाविरोधी कायदा आणि विशाखा समितीची चर्चा केली होती. याबाबत नव्याने आलेली सरकारमध्ये काही सकारात्मक चर्चा आवश्यक होत्या, काही धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील शिक्षण संस्था, खासगी संस्था, क्लासेस, दुकाने, सरकारी कार्यालय, खासगी कार्यालय जिथे जिथे स्त्रिया मोठ्या संख्येने कामाला जातात, तिथे तिथे अंतर्गत तक्रार निवारण समिती म्हणजे विशाखा समिती कार्यरत आहे किंवा नाही याची माहिती जनसामान्यांपर्यंत मिळणे गरजेचे होते. परंतु तसे काहीच घडले नाही. निवडून आलेल्या कोणाही आमदाराला याबाबत प्रश्न विचारावा, असे वाटले नाही. या दोन्ही विधानसभा आणि विधान परिषदमध्ये होणाऱ्या कामकाजाला विधिमंडळाचे कामकाज म्हणतात. म्हणजेच कायदेमंडळाचे कामकाज म्हणतात. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये आणि त्यानंतर आलेल्या महायुतीच्या सरकारमध्ये गेल्या दहा वर्षात सरकारने बालहक्क आयोग नेमला गेला नाही. वाजतागात शक्ती कायद्याची चर्चा करण्यात आली. सूचना मागविण्यात आल्या, पण अजूनही त्याचे कायद्यात रूपांतर झालेले नाही. परभणीत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाची विटंबना केलेल्या समाजकंटकांमुळे महाराष्ट्रात काही दिवस तणावाचे वातावरण राहिले. जाळपोळ, रास्ता रोको, निदर्शने, मोर्चे यामुळे सामाजिक सुव्यवस्था बिघडली. सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला. परभणीच्या घटनेनंतर दोषी समाजकंटकांना कठोर शिक्षा व्हावी तरच राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्याची विटंबना होण्याचे प्रकार थांबतील. बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्घृणपणे हत्या झाली. या घटनेला महिना उलटून गेला तरी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात तसेच मुख्य सूत्रधाराला सरकार आणि पोलीस यंत्रणेला यश आले नाही. राजकीय नेत्यांच्या वलयाखाली असलेल्या गुंडांकडून सरपंचाची हत्या झाल्याचा मोठा आरोप होत आहे. अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्यामुळे त्या गुंडास अटक होत नसल्याचा जनतेसह विरोधी पक्षांची ओरड आहे. हत्येचा आरोप असलेल्या या गुंडांवर खंडणीसह अनेक गुन्हे दाखल असताना त्याला राजकीय आश्रय देणारेही तितकेच दोषी आहेत. त्यामुळे आपल्या राज्याची वाटचाल गुंडशाहीच्या मार्गावर जात आहे की काय ही शंका निर्माण होते.

**नागपूर**

**लोकसंवाद**

## हळदी कुंकू कार्यक्रमाचे राजकीयकरण

**महिलांचा** हळदी कुंकू समारंभ हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे. विशेषतः मकर संक्रांतीनंतर हळदी कुंकू समारंभ मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. या निमित्ताने महिला आपले दुःख विसरून एकत्र येतात. वान म्हणून एकमेकांना भेटवस्तू देतात. या निमित्ताने विविध सामाजिक संदेश दिला जातो. पण हल्ली हळदी कुंकू समारंभदेखील इतर सणांप्रमाणेच इव्हेंट बनला आहे. अलीकडे तर या सार्वजनिक हळदी कुंकू समारंभाचे पेवच फुटले आहे. विशेषतः यातले ९० टक्के हळदी कुंकू समारंभ हे राजकीय स्वरुपाचे किंवा त्या हेतूने प्रेरित असल्याचे दिसून येते. ज्या शहरात किंवा गावात निवडणुका असतात तिथे तर हे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. स्थानिक नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य असे कार्यक्रम करण्यात अग्रेसर असतात.

यावर्षी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका आहेत त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात हळदी कुंकू समारंभ आयोजित केले जात आहेत. या निमित्ताने उपस्थित महिलांना भेटवस्तूंचे वाटप राजकीय नेते करत आहेत. हळदी कुंकू समारंभ हे एकप्रकारे राजकीय शक्ती प्रदर्शनाचे आणि प्रचाराचे माध्यम बनत आहे.

राजकीय नेत्यांनी आयोजित केलेले हळदी कुंकू समारंभ हे महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी आयोजित केले जातात. एरव्ही या महिलांना कोणी विचारतही नाही. आज ज्याप्रमाणे राजकीय नेत्यांनी दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव यासारख्या सार्वजनिक उत्सवात अतिक्रमण करून या उत्सवांचा इव्हेंट बनवला आहे. त्याचीच पुनरावृत्ती हळदी कुंकू समारंभात होताना दिसत आहे. निखळ, कौटुंबिक आणि सांस्कृतिक स्वरूपातील या कार्यक्रमाचा नवरात्र, गणेशोत्सव यासारखा राजकीय व बाजारू वापर केला जात आहे. यातून राजकीय नेते आपला राजकीय मतलब साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत.

राजकीय नेत्यांनी महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी हळदी कुंकू समारंभाचा वापर करण्याऐवजी महिलांचे प्रश्न सोडवावेत, म्हणजे राजकीय नेत्यांना अशा सार्वजनिक कार्यक्रमाचा वापर करण्याची गरज पडणार नाही. त्यातून हळदी कुंकू सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे अवमूल्यनदेखील होणार नाही.

**श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## दृष्टिक्षेप

### अनैसर्गिक अत्याचार करून अल्पवयीन गतिमंद मुलाची हत्या

**वृत्तसंस्था/नाशिक**

अल्पवयीन गतिमंद मुलावर अनैसर्गिक अत्याचार करुन त्याची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. उपनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या भयंकर प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. नाशिक रोडवरील गंधर्व नगरी भागात ही घटना घडली. या प्रकरणाचा तपास पोलिसांनी तपास सुरु केला आहे. त्यासाठी तीन पथके तयार करण्यात आली आहेत. उपनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या नाशिक रोड परिसरात गंधर्व नगरी भागात एका इमारतीचे काम सुरु आहे. त्याच इमारतीत एका अल्पवयीन गतिमंद मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली. अत्याचार केल्यानंतर पीडित मुलाला इमारतीच्या सहाव्या मजल्यावरुन खाली फेकून देण्यात आलं. त्यात त्याचा मृत्यू झाला. १९ जानेवारी घडलेल्या या घटनेची माहिती पोलिसांकडून सोमवारी देण्यात आली. गंधर्व नगरीतील एका निमार्णाधीन इमारतीत आठ वर्षीय गतिमंद मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करण्यात आला. हा मुलगा मजूर कुटुंबातील आहे. अत्याचारानंतर त्याला सहाव्या मजल्यावरुन फेकण्यात आले. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तपासकार्य सुरू केले. सध्याच्या घडीला पोलिसांची तीन पथके आरोपीचा शोध घेत असल्याची माहिती उपायुक्तांनी दिली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### आदित्य उत्सव २०२५ मध्ये 'भज गोविंदम्'चे अनावरण



**वृत्तसंस्था/मुंबई**

बिर्ला समूहाचे संस्थापक बसंत कुमार बिर्ला यांच्या स्मरणार्थ त्यांना श्रद्धांजली म्हणून समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला आणि नितीन मुकेश यांनी 'आदित्य उत्सव २०२५' मध्ये आदि शंकराचार्य निर्मित 'भज गोविंदम्' या भक्तिमय संगीत रचनेचे अनावरण केले. पद्मश्री अनुराधा पौडवाल, कविता पौडवाल आणि समूहाने आदि शंकराचार्यांच्या भक्तिमय काव्यरचनांचे यावेळी सादरीकरण केले. कुमार मंगलम बिर्ला म्हणाले की, भक्तिरचनांच्या सादरीकरणाच्या पलीकडे ही एक चळवळ आहे. ज्याला देशाचा आणि आमचा सर्वात मोठा अध्यात्मिक खजिना म्हणून पाठिंबा देण्यात आम्हाला अभिमान आहे. आदित्य बिर्ला समूह हा भारतातील मोठा समूह आहे आणि त्याने निवडक प्राचीन भारतीय अध्यात्म जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. 'भज गोविंदम' हे त्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी असलेले एक भक्तिगीत आहे. एकदा, आदि शंकराचार्य काशीच्या रस्त्यावर, पवित्र गंगा नदीच्या काठावर आपल्या काही शिष्यांसह फिरत होते. वाटेत त्यांना संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करणारा एक वृद्ध व्यक्ती सापडला. त्या व्यक्तीने कारण स्पष्ट करताना कबूल केले की त्याने संस्कृत व्याकरण न समजल्यामुळे आयुष्यभर भगवंताची स्तुती केली नाही. त्याला फक्त ईश्वरभक्तीकडे आपले मन वळवण्याचा आग्रह करून आदि शंकराचार्यांनी त्याला 'भज गोविंदम' म्हणून ओळखले जाणारे गीत दिले.

# पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात वावगे काय?

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सवाल : रायगड अन् नाशिकच्या पालकत्वावर सांगितला दावा



**पत्रकारांनी यावेळी त्यांना महायुतीत सर्वकाही चांगले आहे का? असा थेट प्रश्न केला असता शिंदे म्हणाले की, तुम्हाला असा प्रश्न का पडतो? निवडणुकीपासून सातत्याने तुम्हाला असे प्रश्न पडत आले आहेत. पण तिकीट वाटपापासून ते आतापर्यंत सर्व प्रश्न सुटत गेले. मंत्रिमंडळाचा व आता पालकमंत्रिपदाचा प्रश्नही लवकरच सुटेल. भरत गोगावले यांनी नाराजी स्पष्ट केली असली तरी पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात गैर काय? त्यांनी अनेक वर्षांपासून रायगडमध्ये काम केले आहे. त्यामुळे त्यांनी अशी अपेक्षा ठेवून मागणी करण्यात काहीही चुकीचे नाही.**

**वृत्तसंस्था/सातारा**

नाशिक व रायगडच्या पालकमंत्रिपदावरून सत्ताधारी महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी रायगड तर दादा भुसे यांनी नाशिकच्या पालकमंत्रिपदावर दावा सांगितला आहे. यामुळे महायुतीत ताणतणाव सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात काहीच वावगे नाही असे विधान करत अप्रत्यक्षपणे या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकत्वावर शिवसेनेचा दावा सांगितला आहे. यामुळे गोगावले व भुसे यांच्या भूमिकेला एकप्रकारे त्यांनी आपला पाठिंबाच दिला आहे.

### मी नाराज नाही, कामासाठी गावी आलो

**मी महायुतीमध्ये आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवारही आमच्यासोबत आहेत. आम्ही तिघे बसून यावर चर्चा करू. योग्य तो तोडगा काढू. आता मी काही कामानिमित्त माझ्या गावी आलो आहे. पण मी इकडे आलो की लगेच तिकडे माझ्या नाराजीची चर्चा सुरू होते. मी नाराज नाही. मी इथल्या विकासकामांसाठी येथे आलो आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे.**

नाशिक व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून सत्ताधारी भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद निर्माण झाल्याचे चित्र आहे. पालकमंत्र्यांची यादी जाहीर झाली तेव्हा रायगडचे पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे यांच्याकडे गेले, तर नाशिकचे पालकमंत्रिपद भाजप नेते गिरीश महाजन यांना मिळाले. शिवसेनेच्या मंत्र्यांनी या दोन्ही ठिकाणच्या पालकमंत्रिपदावर दावा सांगितल्यानंतर येथील पालकमंत्र्यांच्या नियुक्तीस स्थगिती देण्यात आली. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी दरे या आपल्या मुळगावी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, नाशिक व रायगडच्या पालकमंत्रिपदावर लवकरच मार्ग निघेल. तुम्ही (पत्रकार) काहीही काळजी करू नका. तुम्हाला चिंता आहे. पण या सर्व चिंता व प्रश्न लगेच सुटतात. आम्हाला काहीच अडचण येत नाही. त्यातच आता नाशिक व रायगडच्या पालकमंत्रिपदाला स्थगितीही देण्यात आली आहे.

## गीता प्रेसमधील कॉटेज जळून खाक

### महाकुंभमधील आग आटोक्यात

**वृत्तसंस्था/प्रयागराज**

महाकुंभमेळा परिसरात रविवारी भीषण आग लागली, ही आग आटोक्यात आणण्यात आली आहे. शास्त्रीय पुलाखालील सेक्टर १९ परिसरात ही आग लागली. आगीच्या ज्वाळा इतक्या भयानक होत्या, यामुळे परिसरात मोठा गोंधळ उडाला. दरम्यान, या आगीमुळे यामुळे गीता प्रेसमधील १८० कॉटेज जळून खाक झाल्या.

जेवण बनवत असताना तंबूला आग लागल्याचे सांगण्यात आले. घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन दलाच्या गाड्यांनी मोठ्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. आग विझल्यानंतर, गीता प्रेसचा परिसर अवशेषांसारखा दिसत होता. गवताचे छप्पर आणि जमिनीवर काळी राख पडलेली दिसत होती. आग लागण्यापूर्वी इथे खूप गर्दी होती, पण आता तिथे फक्त जळालेले सामान पडले आहे. सेक्टर १६ मधील दिगंबर अणी आखाड्यात दुपारी चार वाजताच्या सुमारास प्रसाद तयार केला जात होता. या दरम्यान मोठी आग लागली. तंबूत ठेवलेले तीन सिलिंडरचा स्फोट झाला. स्फोट इतका शक्तिशाली होता की २० ते २५ तंबू जळून खाक झाले. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. खूप मेहनतीनंतर आग आटोक्यात आणण्यात टीमला यश आले. गर्दीमुळे अग्निशमन दलाला पोहोचण्यास वेळ लागला. यादरम्यान संपूर्ण महाकुंभमेळ्यात अलर्ट जारी करण्यात आला होता. गोरखपूर येथील रहिवासी देवेंद्र तिवारी म्हणाले की, ते आगीपासून सुमारे २०० मीटर अंतरावर होते. अचानक एक उडणारी ठिणगी दिसली आणि काही क्षणातच आगीच्या ज्वाळा आकाशाकडे उडू लागल्या. काही वेळाने, सिलिंडर फटाक्यांसारखे फुटू लागले. चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली पण पोलिसांच्या तत्परतेमुळे ती आटोक्यात आणण्यात यश आले.



**गीता प्रेसचे विश्वस्त कृष्ण कुमार खेमका यांनी माध्यमांना सांगितले की, सुमारे १८० कॉटेज बांधण्यात आल्या. एका खासगी कंपनीला झोपड्या बांधण्याची जबाबदारी देण्यात आली. ज्यांना झोपड्या देण्यात आल्या होत्या. झोपड्या देताना त्यांना सांगण्यात आले होते की, कोणीही अग्नीशी संबंधित कोणतेही काम करणार नाही. त्यांच्या हद्दीबाहेरून एक ठिणगी आली, त्यानंतर आग लागली आणि पसरली. यामुळे मोठे नुकसान झाले.**

## २२ खासगी रुग्णालयांनी केले उल्लंघन

**पुणे :** खाजगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या नागरिकांची लूटमार थांबविण्यासाठी पुणे महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलत रुग्णालयात दरपत्रक लावणे बंधनकारक केले होते. मात्र, महानगरपालिकेच्या या नियमाचे २२ खासगी रुग्णालयांनी उल्लंघन केले आहे. त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाने या २२ रुग्णालयांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे.

आरोग्य विभागाच्या तपासणीत या रुग्णालयांनी दरपत्रक न लावणे, तक्रार निवारण कक्षाचा 'टोल फ्री' क्रमांक आणि रुग्ण हक्कांची सनद न लावल्याचे दिसून आले. खासगी रुग्णालये दरपत्रक लावत नसल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना आरोग्य विभागाने दिल्या होत्या.

## दुसऱ्या रामतीर्थ गोदा राष्ट्र जीवन पुरस्काराची घोषणा

### जलतज्ज्ञ पद्मश्री महेश शर्मा यांचा होणार सन्मान

### ७ फेब्रुवारीला राज्यपालांच्या हस्ते वितरण सोहळा

**वृत्तसंस्था/नाशिक**

नदी संस्कृतीचे अस्तित्व जतन करणे तसेच धर्म, समाज व राष्ट्र कार्यात लोकसहभाग वाढविण्यास रामतीर्थ श्री गंगा गोदावरी आरती हा उपक्रम हाती घेणाखया रामतीर्थ गोदावरी सेवा समितीतर्फे दुसरा रामतीर्थ गोदा राष्ट्र जीवन पुरस्कार विख्यात जलतज्ज्ञ पद्मश्री महेश शर्मा यांना जाहीर झाला आहे. ७ फेब्रुवारी रोजी गोदा आरतीनंतर महामहिम राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल,अशी माहिती समितीचे अध्यक्ष जयंत गायधनी आणि स्वागत समितीचे श्रीनिवास लोया, धनंजय बेळे, सचिव मुकुंद खोचे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रामतीर्थ गोदावरी सेवा समितीतर्फे दैनंदिन गोदा आरती तसेच वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात.समितीतर्फे २०२४ पासून गोदा जीवन गौरव पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. गेल्यावर्षी श्री राम मंदिराच्या उभारणीत भरीव योगदान देणारे थोर राष्ट्रीय संत गोविंदगिरी महाराज यांना पहिल्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. शाल,श्रीफळ सन्मानचिन्ह,मानपत्र आणि विशेष रकमेची थैली असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

गोदावरी जन्मउत्सवाचे औचित्य साधून रामतीर्थ गोदावरी सेवा समितीतर्फे विशेष सप्ताहाचे आयोजनही करण्यात आले आहे. त्यानुसार दि.२ फेब्रुवारीला ३ ते ६ या वेळेत खिमजी भगवान धर्मशाळा येथे गोदा स्वच्छता पर्यावरण परिसंवाद यास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांची उपस्थिती असणार आहेत. तर ७ फेब्रुवारीला गोदा जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळा पार पडेल.

## जम्मूमध्ये गूढ आजार, तलावातील पाणी टेस्टिंगमध्ये फेल

### कीटकनाशकाची खात्री झाल्यानंतर तलाव सील, आतापर्यंत १७जणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था/श्रीनगर**

जम्मूच्या राजौरीमध्ये एका रहस्यमय आजाराशी संबंधित एक मोठा खुलासा समोर आला आहे. या गावात आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे. तेथील तलावाचे पाणी चाचणीत अपयशी ठरले. तलावातील पाण्याच्या नमुन्यांमध्ये कीटकनाशकांच्या उपस्थितीची पुष्टी झाली आहे. सध्या तलाव सील करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे प्रशासनाने सांगितले.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, मोहम्मद अस्लमने गेल्या रविवारी (१२ जानेवारी) आपली मुलगी यास्मिना जानला राजौरी येथील वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. दुसऱ्या दिवशी तिला जम्मू येथे रेफर करण्यात आले, तेथे उपचारादरम्यान सायंकाळी तिचा मृत्यू झाला. या गूढ आजारामुळे अस्लमच्या सहाही मुलांचा मृत्यू झाला आहे. गेल्या आठवडाभरात त्यांच्या चार मुली आणि दोन मुलांशिवाय त्यांचे मामा यांचाही मृत्यू झाला आहे.

दरम्यान, जम्मू-काश्मीरच्या आरोग्य मंत्री सकिना मसूद यांनी गावातील मृत्यूचे कारण रहस्यमय आजार असण्याची शक्यता नाकारली आहे. घाबरण्याची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रशासित प्रदेशाच्या आत आणि बाहेर केलेल्या सर्व चाचण्यांचे निकाल नकारात्मक आले आहेत. मंत्री सकिना मसूद म्हणाल्या की, हे मृत्यू एखाद्या आजाराने झाले असते तर ते झपाट्याने पसरले असते आणि केवळ तीन कुटुंबांपुरते मर्यादित नसते. मात्र, काही आरोग्य तज्ज्ञांनी मृतांच्या नमुन्यांमध्ये 'न्यूरोटॉक्सिन' आढळून आल्याचे सांगितले आहे.



### गृह मंत्रालयाने तपासासाठी आंतरमंत्रालयीन पथक केले स्थापन

गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी या मृत्यूंची चौकशी करण्यासाठी आंतरमंत्रालयीन पथक तयार करण्याचे आदेश दिले होते. हे उच्चस्तरीय पथक रविवारी गावात पोहोचले होते. गृहमंत्रालय स्वतः संघाचे नेतृत्व करत आहे. या टीममध्ये आरोग्य, कृषी, रसायने आणि जलसंपदा मंत्रालयातील तज्ज्ञांचा समावेश आहे. मृत्यूच्या कारणाचा तपास करण्याबरोबरच भविष्यात असे मृत्यू टाळण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील. यापूर्वी १५ जानेवारी रोजी रियासी जिल्ह्याचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक गौरव सिकरवार यांनी एसआयटी स्थापन केली होती. ११ सदस्यीय एसआयटीचे नेतृत्व पोलिस अधीक्षक वजाहत हुसेन करत आहेत.

### राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य संस्थांची मदत

**सरकार राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य संस्थांची मदत घेत आहे. यामध्ये पुण्याची भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, दिल्लीचे राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, ग्वाल्हेरची संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि पीजीआय चंदीगड यांचा समावेश आहे. कोणत्याही तपासणीत कोणतेही नकारात्मक परिणाम आढळले नाहीत. पाणी आणि खाद्यपदार्थांचीही चाचणी करण्यात आली आहे, परंतु कोणतेही विषारी पदार्थ आढळून आलेले नाहीत, असे आरोग्यमंत्री म्हणाले.**

## आजी-माजी मुख्यमंत्र्यांना 'अॅट्रॉसिटी अॅक्ट'वरून नोटीस

### समितीची सहा वर्षांत एकही बैठक नाही

**वृत्तसंस्था/मुंबई**

'अॅट्रॉसिटी अॅक्ट' बद्दलच्या या चिंताजनक उदासीनतेवरून माजी सनदी अधिकारी आणि 'संविधान फाऊंडेशन'चे अध्यक्ष ई. झेड. खोब्रागडे यांनी विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे या दोन माजी मुख्यमंत्र्यांनाही कायदेशीर नोटीस बजावली आहे. त्यांच्या वतीने संविधान तज्ज्ञ अॅड. डॉ. सुरेश माने यांनी ही नोटीस धाडली आहे.

या नोटिसांची प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी केंद्रीय अनुसूचित जातीजमाती आयोग, राज्य अनुसूचित जाती जाती आयोग, मुख्य सचिव आणि सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांनाही पाठवण्यात आली आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यावरील वाढत्या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी संसदेने १९८९ सालात 'अॅट्रॉसिटी अॅक्ट' हा कायदा संमत केला. पण अंमलबजावणीच्या पातळीवर त्या कायद्याला निष्प्रभ करण्यात राज्य सरकारांनी कोणतीही कसूर सोडलेली नाही, असे चित्र देशभरात दिसत आहे. त्या कायद्यातील २०१६ च्या नियमांप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने वर्षात दोनदा बैठका घेवून अत्याचार प्रकरणांचा आढावा घेत पुढील परिणामकारक कार्यवाही करणे बंधनकारक आहे. पण फुले-शाहू-आंबेडकर यांचा उठसूट उदोउदो करणाऱ्या महाराष्ट्रात २०१८ सालापासून गेल्या सहा वर्षांत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची एकसुद्धा बैठक झालेली नाही. परिणामीः जिल्हा आणि तालुका स्तरावरही अशा बैठका प्रशासनानेही घेतलेल्या नाहीत.

### शेवटची बैठक ३० ऑगस्ट २०१८ ला

**अॅट्रॉसिटी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची शेवटची बैठक ही ३० ऑगस्ट २०१८ रोजी झाली होती. त्यानंतर २०१९ ते डिसेंबर २०२४ पर्यन्त एकूण १० बैठका घेणे बंधनकारक होते. पण गेल्या सहा वर्षांत तशी एकही बैठक झालेली नाही, असे राज्य सरकारनेच माहिती अधिकार कायद्याअंतर्गत ३० डिसेंबर २०२४ रोजी दिलेल्या उत्तरात मान्य केलेले आहे.**

## सुकाणू समितीने घेतला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आढावा

**वृत्तसंस्था/जळगाव**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली असून विद्यापीठाचे या कामकाजाबाबत सुकाणू समिती सदस्य मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. आर.डी. कुलकर्णी व छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरु वाल्मिक सरवदे यांनी आढावा बैठकीत समाधान व्यक्त केले. राज्य शासनाकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी बाबत सुकाणू समिती सदस्यांकडून विद्यापीठांच्या या कामकाजाबाबतचा आढावा घेण्यात येत आहे. त्यादृष्टीने विद्यापीठात ही बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र- कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस.राजपूत, मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ.जगदीश पाटील, डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय प्राचार्य डॉ.गौरी राणे, प्राचार्य डॉ. आर.बी.वाघुळदे उपस्थित होते. प्र- कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी विद्यापीठाकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल सादर करतांना सांगितले की, नव्या शैक्षणिक धोरणानुसार सर्वच विद्याशाखेतील अभ्यासक्रम सुधारित करण्यात आले असून ते लागू करण्यात आलेले आहेत. तसेच शासनाने सुचविलेल्यानुसार स्वयंम कोर्सेस करीता मार्गदर्शक नियमावली, मल्टीपल एन्ट्री आणि एक्झिटच्या मार्गदर्शक सूचना, कुलगुरु इंटर्नशिप प्रमोशन स्कीम, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीसची कार्यपध्दती, अभ्यासक्रम पुस्तकांचे मराठी रुपांतरण, स्कूल कनेक्ट यासह विविध महत्वपूर्ण विषयांवर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दिली.

## ... पण तटकरे कुटुंबाला स्वीकारणार नाही - आ. महेंद्र थोरवे

**वृत्तसंस्था/मुंबई**

आमचा राजकीय अस्त झाला तरी चालेल, पण आम्ही तटकरे कुटुंबीयांना कदापि स्वीकारणार नाही, अशा ठाम शब्दांत रायगडच्या कर्जत खालापूरचे सत्ताधारी शिवसेनेचे आ. महेंद्र थोरवे यांनी रायगडचे पालकमंत्रीपद आदिती तटकरे यांना देण्यास विरोध दर्शवला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे सत्ताधारी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बेबनाव निर्माण होण्याची शक्यता आहे.

महायुती सरकारने रायगडचे पालकमंत्री पद आदिती तटकरे यांना दिले होते. त्यावर शिवसेनेच्या आमदारांनी तीव्र आक्षेप घेतला होता. आदिती तटकरे या रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकमेव आमदार आहेत. त्यानंतरही त्यांच्याकडे पालकमंत्रीपद दिल्यामुळे शिवसेनेचे स्थानिक आमदार रविवारपासून आपला विरोध व्यक्त करत आहेत. या विरोधामुळे सरकारने रविवारी रात्री त्यांच्या पालकमंत्रिपदास तात्पुरती स्थगिती दिली. या पार्श्वभूमीवर आ. थोरवे यांनी भूमिका घेतली आहे. थोरवे म्हणाले की, शिवसेनेच्या उठावात रायगडच्या आमदारांचा मोठा वाटा आहे. शिंदे यांनी सुरू असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. त्यांच्या नेतृत्वात आम्ही महायुतीत आलो. खरे तर गोगावले हे मागच्या सरकारमध्येच मंत्रिपदाचे दावेदार होते. मंत्री झाल्यानंतर त्यांना पालकमंत्रीही होता आले असते. पण त्यांनी मंत्रिपदाचा त्याग करून संघटनेला बळ दिले.

### अक्षय साधूसंत नव्हता, एन्काउंटर चुकीचाच - अंधारे

**मुंबई :** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीचा अक्षय शिंदेच्या एन्काउंटर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने पाच पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहे. यावरून ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी अक्षय शिंदे हा कुणी साधूसंत नव्हता, पण एन्काउंटर चुकीचाच होता, असे म्हटले आहे. आरोपीला शिक्षा देण्यासाठी आपल्याकडे न्यायव्यवस्था आहे. परंतु, कुणाला तरी वाचवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी पोलिसांच्या संगनमताने अक्षय शिंदेचा खून केला, असा आरोप त्यांनी केला. दरम्यान, ही शिक्षा देण्यासाठी आपल्याकडे कायदा, न्यायालय आहे. ती शिक्षा देण्याचा अधिकार फक्त न्यायव्यवस्थेला आहे, असे म्हणत जबाबदार पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली.

## २० हजारांना 'वधू'ची विक्री; अनेक राज्यांत रोहिंग्या मुलींची तस्करी, रॅकेट उघड

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

एका ५२ वर्षांच्या व्यक्तीच्या लग्नाकरिता नवऱ्या मुलीचा शोध घेतला जात होता. मात्र त्याला नवरी मुलगी भेटत नव्हती. त्यामुळे त्याचे मानसिक संतुलन ढासळले. अचानक एक दिवस शेजारच्यांना कळाले की त्या व्यक्तीचे लग्न झाले आहे. जेव्हा हे प्रकरण उघडकीस आले तेव्हा ती मुलगी रोहिंग्या असल्याचे कळले. २० हजार रूपयांसाठी त्या मुलीला विकले गेले होते. जम्मू काश्मीरसह अन्य राज्यांमधून समोर येत आहेत.

एक दिवस अगोदरच कोलकाता रेल्वे स्थानकावर पोलिसांनी अब्दुल रहमान नावाच्या व्यक्तीला अटक केली. तो बांगलादेशातील रोहिंग्या मुस्लिम आहे आणि अनेक वर्षांपासून काश्मीरमध्ये मजूरी काम करत आहे.त्याच्यासोबत त्यावेळी १२ वर्षांच्या दोन मुली होत्या. ज्यांना तो काश्मीरला घेऊन जात होता. पोलिसांना या अब्दुलबद्दल माहिती मिळाली म्हणून त्याला अटक करू शकले. मात्र अशा असंख्य रोहिंग्या मुलींना बेकायदेशीर पद्धतीने काश्मीरसहित देशाच्या अन्य राज्यांमध्ये नेले जाते आणि तेथे त्यांना जबरदस्तीने 'वधू' बनवले जाते.

बांगलादेश म्यानमार या देशातील रोहिंग्या मुलींना खोटी आश्वासने आणि स्वप्ने दाखवून भारतात आणले जाते. त्यांचे लग्न हे वयाने खूप मोठ्या असणाऱ्या व्यक्तींशी केले जाते. तसेच अनेकदा या मुलींचे लग्न दिव्यांग,मानसिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या लोकांशी केले जाते. गेल्या महिन्यात एनजीओच्या नावाखाली असे काम करत असलेल्यांच्या नेटवर्कचा जम्मू काश्मीर पोलिसांनी पदार्फाश केला. प्रसाशनाच्या मते, डिसेंबर २०२४ पर्यंत जम्मू काश्मीरमध्ये १४८ रोहिंग्या मुली वधू बनल्या होत्या. तज्ज्ञांच्या मते ही स्थिती धोकादायक असून पाकिस्तान याचा फायदा घेऊ शकतो.

### रॅकेटचे संचालन

**बांगलादेश आणि म्यानमारमध्ये रोहिंग्यांच्या वसाहतीमध्ये एनजीओच्या नावाखाली मुलींची तस्करी केली जाते. लहान वयाच्या मुलींवर या लोकांची जास्त नजर असते. त्यांना भारतात तुम्हाला चांगले काम दिले जाईल, असे आश्वासन देण्यात येते. बस, ट्रेनचाद्वारे त्यांना जम्मू काश्मीर, दिल्ली, चैन्नई, हैद्राबाद, केरळ अशा ठिकाणी नेण्यात येते. तिथे त्यांची विक्री केली जाते.**

हे दैनिक, **लोकशाही पब्लिकेशन्स प्रा. लि.** करिता **प्रकाशक - सौ. प्रज्ञा संजय हेडा** यांनी, **मुद्रक - श्री. अरुण श्यामराव जोशी** यांच्या, देश पब्लिकेशन, इ-30 /2, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मागे, हिंगणा एम.आय.डी.सी. नागपूर - 440016 येथे मुद्रित करून, थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह - II, 148, युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ, नागपूर - 440010 येथे प्रसिद्ध केले. **RNI No.- MAHMAR/2010/35482. व्यवस्थापकीय संचालक - * सौ. प्रज्ञा संजय हेडा** ( * पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) **दूरध्वनी क्र. 0712-2424244, 0712-4043332.**
**E-Mail : editorial@lokshahivarta.in.** (लोकशाही वार्तामधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. तसेच लोकशाही वार्ताशी संबंधित कुठलेही वाद केवळ नागपूर न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातच राहतील.)




# शेअर बाजारात सेन्सेक्समध्ये उसळी!

**वृत्तसंस्था/मुंबई**

जागतिक सकारात्मक संकेत आणि बँकिंग शेअर्समधील तेजीच्या जोरावर आज सोमवारी भारतीय शेअर बाजारातील सेन्सेक्स ४५४ अंकांनी वाढून ७७,०७३ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १४१ अंकांच्या वाढीसह २३,३४४ वर स्थिरावला.

क्षेत्रीय पातळीवर ऑटो आणि एफएमसीजी वगळता इतर सर्व निर्देशांक तेजीत बंद झाले. बँक, मीडिया, मेटल, कॅपिटल गुड्स, पीएसयू बँक, टेलिकॉम, पॉवर हे निर्देशांक एक ते दोन टक्के वाढले. तर बीएसई मिडकॅप ०.६ टक्के आणि स्मॉलकॅप ०.८ टक्के वाढला.कोटक महिंद्रा बँकेने तिमाही नफ्यात १० टक्के वाढ नोंदवली आहे. या पार्श्वभूमीवर सेन्सेक्सवर कोटक बँकेचा शेअर्स तब्बल ९.१ टक्के वाढला. बजाज फायनान्स आणि बजाज फिनसर्व्ह हे शेअर्स प्रत्येकी तीन टक्के वाढले. त्याचबरोबर एनटीपीसी, एसबीआय, पॉवर ग्रिड, टाटा स्टील हे शेअर्स एक ते तीन टक्के वाढले. दुसरीकडे, झोमॅटोचा शेअर्स तीन टक्के घसरला. अदानी पोर्ट्स, टीसीएस, एम अँड एम हे शेअर्स सुमारे एक टक्का घसरले.

## बँकिंग शेअर्सची भरारी



## भारतात नवीन मिनी कूपर एस जॉन कूपर वर्क्स पॅक लाँच



**नवी दिल्ली :** मिनीने भारतात नवीन मिनी कूपर एस जॉन कूपर वर्क्स पॅकच्या लाँचची घोषणा केली. कार कम्प्लीटली बिल्ट-अप युनिट्स (सीबीयूए) म्हणून उपलब्ध असेल. डिलिव्हरीजना एप्रिल २०२५पासून सुरूवात होईल. बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे प्रेसिडेण्ट व सीईओ विक्रम पावाह म्हणाले, नवीन मिनी कूपर एस जॉन कूपर वर्क्स पॅकच्या लाँचमधून कालातीत डिझाइनसह आधुनिक नाविन्यतेला एकत्रित करण्याचा मिनीचा वारसा दिसून येतो. नवीन मिनी कूपर एस जेसीडब्ल्यू पॅक दोन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असेल. लीजेण्ड ग्रे आणि मिडनाइट ब्लॅक सोबत जेट ब्लॅकमध्ये रूफ व मिरर कॅप्स. कार अमर्यादित किलोमीटर्ससाठी प्रमाणित दोन वर्ष वॉरंटीसह येते. ग्राहक बीएमडब्ल्यू ३६० ओ फायनान्स प्लॅनसह उत्तम मूल्य आणि परिपूर्ण मनःशांतीचा आनंद घेऊ शकतात. नवीन मिनी कूपर एस जॉन कूपर वर्क्स पॅकमध्ये आकर्षक डिझाइनसोबत शहरी विशिष्टता आणि मिनी समुदायाचा नाविन्यपूर्ण उत्साह समाविष्ट आहे.

## भारती एअरटेल आणि बजाज फायनान्स यांच्यात धोरणात्मक भागीदारी

**नवी दिल्ली :** भारती एअरटेल ही भारतातील सर्वात मोठ्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक आहे आणि बजाज फायनान्स ही देशातील सर्वात मोठी खासगी क्षेत्रातील बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) आहे. या दोघांनी वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी आणि शेवटच्या टप्प्यातील वितरणात बदल करण्यासाठी एक धोरणात्मक भागीदारी करण्याचे जाहीर केले आहे. या अनोख्या भागीदारीमुळे एअरटेलचे ३७० मिलियन, १२ लाख+ भक्कम वितरण नेटवर्क आणि बजाज फायनान्सचे २७ उत्पादन श्रेणींचे वैविध्यपूर्ण समूह आणि ५,००० + शाखा आणि ७०, ००० फील्ड एजंट्सचे वितरण प्रभाव एकत्र येत आहेत.

भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाल वित्तल म्हणाले, दोन्ही कंपन्यांची एकत्रित पोहोच, प्रमाण आणि वितरण शक्ती या भागीदारीचा पाया म्हणून काम करणार आहे. बजाज फायनान्सचे व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन म्हणाले, डेटावर आधारित क्रेडिट हमी (अंडररायटिंग) आणि वित्तीय समावेशनाच्या केंद्रस्थानी भारतातील डिजिटल परिस्थितीक व्यवस्था आहे. एअरटेलसोबत एकत्र काम करून आम्ही भारताचा पसंतीचा वित्तदाता बनू इच्छितो आणि दुर्गम भागातही लाखो लोकांना वित्तीय सेवांचा लाभ घेण्यास समर्थ बनवू इच्छितो. आतापर्यंत बजाज फायनान्सची दोन उत्पादने एअरटेल थँक्स ॲपवर प्रयोगात्मक दृष्टीने देण्यात आली आहेत. मार्चपर्यंत बजाज फायनान्सची चार उत्पादने एअरटेल थँक्स ॲपवर ग्राहकांना उपलब्ध होतील.

# वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा केंद्रबिंदू 'डिजिटल इंडिया'!

**वृत्तसंस्था/दावोस**

जागतिक नेते, धोरणकर्ते आणि उद्योग क्षेत्रातील नेते जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीसाठी स्वित्झर्लंडमधील दावोस येथे एकत्र आले आहेत. पाच दिवस चालणाऱ्या या बैठकीत आर्थिक विकासाला गती देणे, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि सामाजिक-आर्थिक स्थिरता मजबूत करणे यासारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा केंद्रबिंदू 'डिजिटल इंडिया' आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या सूत्रांनुसार, भारत तंत्रज्ञानाचे



विशेषतः डिजिटल तंत्रज्ञाचे लोकशाहीकरण कसे करत आहे हे समजून घेण्यासाठी जग उत्सुक आहे.

जागतिक आर्थिक मंचाची ही ५५ वी वार्षिक बैठक आजपासून सुरू झाली. २४ जानेवारीपर्यंत ती चालणार आहे. आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीला जगभरातील ६० प्रमुख नेते उपस्थित आहेत. केंद्रीय आयटी, इलेक्ट्रॉनिक्स मंत्री अश्विनी वैष्णव भारताचे या मंचामध्ये प्रतिनिधित्व करीत आहेत.

दावोस येथील जागतिक आर्थिक मंच २०२५ साठी रवाना होण्यापूर्वी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील भारताच्या परिवर्तनकारी डिजिटल प्रवासबाबत जगाला उत्सुकता असल्याचे अधोरेखित केले. ते म्हणाले की, जग भारताची आर्थिक धोरणे, तसेच डिजिटल इंडिया कार्यक्रमामुळे झालेले डिजिटल परिवर्तन आणि समाजाच्या सर्व घटकांमधील नागरिकांना सक्षम करण्यासाठी तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याचे मार्ग समजून घेण्यास उत्सुक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक धोरणांमध्ये जगभरात खूप रस आहे.

२०२५ च्या जागतिक आर्थिक मंचमध्ये भारताच्या सहभागाचे उद्दिष्ट भागीदारी मजबूत करणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि शाश्वत विकास आणि तांत्रिक नवोपक्रमात देशाला जागतिक नेता म्हणून स्थापित करणे आहे.

## आंतरराष्ट्रीय समुदायात मोठी उत्सुकता

जागतिक आर्थिक मंच २०२५ च्या अजेंड्याबद्दल बोलताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आर्थिक धोरणे आणि डिजिटल इंडिया याबाबींना जागतिक स्तरावर खूप रस आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक मंचात या गोष्टी केंद्रबिंदू असेल. भारताच्या विकासाच्या कथेबद्दल, विशेषतः डिजिटल परिवर्तन आणि नवीन डिजिटल वास्तुकलेबद्दल आंतरराष्ट्रीय समुदायात मोठी उत्सुकता आहे.

# भारत साडेसहा टक्के आर्थिक विकास दर गाठणार

**वृत्तसंस्था/वॉशिंग्टन**

आयएमएफ अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने त्यांच्या जागतिक आर्थिक अहवालात म्हटले आहे की, २०२५ आणि २०२६ मध्ये भारताची अर्थव्यवस्था ६.५ टक्के आर्थिक विकास दराने वाढेल. जागतिक बँकेने आर्थिक वर्षात भारताची अर्थव्यवस्था ६.७ टक्के दराने वाढण्याचा अंदाज व्यक्त केला असतानाच, आयएमएफचा हा अंदाज आला आहे. आयएमएफच्या मते, जागतिक अर्थव्यवस्था स्थिर आहे, परंतु देशांमधील विकास दरांमध्ये मोठी तफावत आहे. २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीत जागतिक सकल राष्ट्रीय उत्पादन वाढ ०.१ टक्के घसरले. आशिया आणि युरोपमधील काही देशांमध्ये कमकुवत आर्थिक आकडेवारीमुळे ही घसरण दिसून आली. या वर्षी आणि पुढील वर्षी जागतिक विकासदर ३.३ टक्के स्थिर राहण्याचा अंदाज आहे, असे आयएमएफचे मुख्य अर्थतज्ज्ञ पियरे-ऑलिव्हियर म्हणाले.

महागाई सतत कमी होत आहे आणि ती या वर्षी ४.२ टक्के आणि पुढील वर्षी ३.५ टक्के पर्यंत खाली येऊ शकते. मजबूत देशांतर्गत मागणीमुळे अमेरिकन अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करत आहे, तर युरोपमध्ये ऊर्जेच्या उच्च किमती आणि मंदावलेल्या वाढीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये, चीन हळूहळू सावरत आहे.

# सॅमसंग हेल्थ ॲपवर वैयक्तिक हेल्थ रेकॉर्ड्स फिचर लाँच

**गुरुग्राम :** सॅमसंगने सॅमसंग हेल्थ ॲपमध्ये हेल्थ रेकॉर्ड्स फिचरची भर केल्याची घोषणा केली. यामुळे वापरकर्त्यांना अधिक सर्वसमावेशकपणे त्यांच्या आरोग्याचे व्यवस्थापन करण्यास मदत होईल. हे फिचर वापरकर्त्यांना प्रत्यक्ष सॅमसंग हेल्थ मोबाइल ॲपच्या माध्यमातून त्यांचे आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट (आभा) तयार करण्यासोबत उपलब्ध होण्यास मदत करते. वापरकर्ते आता भारतभरातील आरोग्यसेवा प्रदात्यांनी तयार केलेल्या त्यांच्या हेल्थ डेटाचे प्रभावीपणे व्यवस्थापन करू शकतात, ज्यामुळे व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक हेल्थ रेकॉर्डसवर देखरेख ठेवण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. हे फिचर वापरकर्त्यांना त्यांच्या हेल्थ हिस्ट्रीचे व्यवस्थापन करण्यास, प्रोग्रेसवर देखरेख ठेवण्यास आणि त्यांच्या आरोग्यावर सर्वोत्तम नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते, असे नोएडामधील सॅमसंग रिसर्च इन्स्टिट्यूटचे व्यवस्थापकीय संचालक क्यूनग्यून रू म्हणाले. ईका केअरमध्ये आम्हाला सॅमसंगसोबतच्या सहयोगाचा आनंद होत आहे. यामुळे भारतभरात एबीडीएमच्या अवलंबनाला मोठ्या प्रमाणात गती मिळेल. हा सहयोग देशामध्ये अधिक कनेक्टेड व कार्यक्षम आरोग्यसेवा इकोसिस्टम निर्माण करण्याच्या दिशेने प्रमुख पाऊल आहे, असे ईका केअरचे सह-संस्थापक दीपक तुली म्हणाले. भारतातील वापरकर्ते सॅमसंग गॅलेक्सी स्टोअर व गुगल प्ले स्टोअरवर सॅमसंग हेल्थचे नवीन ॲप अपडेट्स करीत नवीन हेल्थ रेकॉर्ड्स फिचरचा अनुभव घेऊ शकतात.

# नॅशनल अल्युमिनियम कंपनीमध्ये पदभरती




**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

नॅशनल अल्युमिनियम कंपनीमध्ये ५००हून अधिक रिक्त पदांवर भरती होत आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख उद्या २१ जानेवारी आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी अधिकृत वेबसाईटवर अर्ज करावा.

राष्ट्रीय अल्युमिनियम कंपनी लिमिटेडने ५१८ नॉन-एक्झिक्यूटिव्ह पदांवर भरतीसाठी नोटिफिकेशन जारी केले आहे. या पदांमध्ये ऑपरेटर, फिटर, इलेक्ट्रिकल, नर्स, फार्मासिस्ट आणि अनेक इतर पदांचा समावेश आहे. जर तुम्ही दहावी, बारावी किंवा आयटीआय पास असाल आणि सरकारी नोकरीच्या शोधात असाल, तर तुमच्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. लॅक टेक्नीशियन आणि इतर पदांसाठीः दहावी, बारावी, डिप्लोमा, आयटीआय किंवा बीएससी डिग्री असणे आवश्यक आहे. टेक्नीशियन आणि ऑपरेटर पदांसाठी संबंधित क्षेत्रात डिप्लोमा किंवा आयटीआय असणे आवश्यक आहे. या पदांसाठी उमेदवाराचे वय २७ ते ३५ वर्षांदरम्यान असावे. आरक्षित श्रेणीच्या उमेदवारांना वयाच्या मर्यादेत सवलत दिली जाईल.

उमेदवारांची परीक्षा ही कंप्युटर आधारित होईल. या परीक्षेमध्ये १०० प्रश्न असतील आणि प्रत्येक प्रश्न एक गुणाचा असेल. या परीक्षेत ६० टक्के प्रश्न तांत्रिक विषयांवर असतील, तर ४० टक्के प्रश्न सामान्य जागरूकतेवर आधारित असतील. परीक्षेसाठी दोन तासांचा वेळ दिला जाईल.

# करणवीर झाला 'बिग बॉस १८'चा विजेता!

**मुंबई :** टीव्हीच्या पडद्यावरील लोकप्रिय आणि तितकाच वादग्रस्त रिॲलिटी शो हिंदी बिग बॉसच्या अठरावा सीझनचा ग्रँड फिनाले नुकताच पार पडला. यंदाच्या विजेता करणवीर मेहरा ठरला.करणवीर मेहराला बिग बॉस १८च्या विजेत्या ट्रॉफीसह लाखोंचे बक्षीस मिळाले.

करणवीर मेहरा, विवियन डिसेना, ईशा सिंह, रजत दलाल, अविनाश मिश्रा आणि चुम दरंग हे यंदाच्या सीझनचे टॉप सहा फायनलिस्ट होते. यंदाचा बिग बॉस हा शो विविनय जिंकेल असे चाहत्यांना वाटत होते, परंतु करणवीरने बाजी मारत धक्का दिला. सुरुवातीपासूनच विवियन डिसेना आणि करणवीर मेहरा यांचे नाव विजेत्याच्या शर्यतीत होते. विवियन आणि करणवीर दोघेही बिगबॉसच्या घराची दारे बंद करुन बाहेर आले. त्यावेळी सलमान खानने करणवीर मेहरा याचे नाव विजेता म्हणून घोषित केले. पहिल्या दिवसापासून करणवीर मेहराचा खेळ चाहत्यांना भावला होता. बिग बॉसचा घरातील वावर तसेच खेळी यामुळे चाहत्यांनी करणवीरला चांगली पसंती दाखवली होती.



करणवीर मेहरा टीव्ही सीरियलमधील कलाकार आहे. त्याने रिमिक्सपासून करियरला सुरुवात केली होती. त्यानंतर ऑलवेज, परी हूं मै, पवित्र रिश्ता, टीव्ही बीवी और मै, बहने, हम लडकिया सारख्या टीव्ही मालिकांमध्ये काम केले. मालिकांसोबतच रागिनी एमएमएस २, मेरे डैड की मारुती, ब्लड मनी, बदमाशिया आणि आमीन सारख्या चित्रपटातही काम केले. याआधी तो खतरों के खिलाडी १४चा विजेता ठरला होता.


## अभिनेते योगेश महाजन यांचे निधन



**अहमदाबाद :** मराठी मनोरंजन विश्वातून धक्कादायक माहिती आहे. प्रसिद्ध मराठी अभिनेते योगेश महाजन यांचे गुजरातमधील उमरगाव येथे निधन झाले.

हिंदी मालिकेच्या शूटिंगसाठी योगेश उमरगावमध्ये होते. त्यावेळी हॉटेलच्या रुममध्ये ते मृतावस्थातेत सापडले. त्यांना हृदयविराचा तीव्र झटका आल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या निधनाने सर्वांना धक्का बसला आहे. योगेश महाजन हे शिव शक्ती-तप, त्याग, तांडव या हिंदी मालिकेच्या शूटिंगवर होते. संध्याकाळी शूटिंगची शिफ्ट संपताना योगेश यांना प्रकृती अस्वस्थ असल्याचे जाणवले. त्यामुळे ते डॉक्टरांकडे गेले आणि औषधे घेतली. रात्री हॉटेलमधील रुममध्ये झोपले, पण सकाळी शूटिंगसाठी सेटवर पोहोचले नाहीत. त्यानंतर टीममधील लोकांनी त्यांना बरेच कॉल केले, पण त्यांनी कॉल रिसिव्ह केला नाही.

## दाक्षिणात्य अभिनेते रंगराजू यांचे निधन



**चेन्नई** – दाक्षिणात्य अभिनेते विजय रंगराजू उर्फ राज कुमार यांचे चेन्नईतील एका खासगी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. हैदराबादमध्ये एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान त्यांना दुखापत झाली होती. त्यांना उपचारासाठी चेन्नईला हलवण्यात आले होते, पण तिथेच त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चेन्नईत अंत्यसंस्कार होणार आहेत. विजय रंगराजू हे लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेते होते. त्यांच्या निधनाबद्दल चाहते शोक व्यक्त करत आहेत. त्यांना दाक्षिणात्य सिनेसृष्टीतून श्रद्धांजली वाहिली जात आहे. विजय यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली, दीक्षिता आणि पद्मिनी असा परिवार आहे. विजय रंगराजू यांचे खरे नाव राज कुमार होते. चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी त्यांनी चेन्नईतील अनेक नाटकांमध्ये काम केले. नंदमुरी बालकृष्णाच्या भैरव द्वीपममध्ये त्यांनी खलनायकाची भूमिका केली होती. या चित्रपटाने त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. नकारात्मक भूमिका साकारण्यासाठी विजय रंगराजू ओळखले जायचे.

## मार्चमध्ये 'स्थळ' झळकणार

**मुंबई** – अनेक हिंदी मराठी चित्रपटांमध्ये अभिनय, चित्रपटांचे दिग्दर्शन, गायन अशी पाच दशकांपेक्षा अधिक मोठी, बहुरंगी कारकिर्द गाजवणारे सचिन पिळगांवकर आता नवी इनिंग सुरू करत आहेत. धुन प्रॉडक्शन निर्मित आणि जयंत सोमलकर दिग्दर्शित स्थळ या बहुचर्चित चित्रपटाची प्रस्तुती सचिन पिळगांवकर करणार आहेत. महिला दिनाच्या औचित्याने ७ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आले. शेफाली भूषण, करण ग्रोवर, रिगा मल्होत्रा आणि जयंत सोमलकर यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. नंदिनी चिकटे, तारानाथ खिरटकर, संगीता सोनेकर, सुयोग ढवस, संदीप सोमलकर, संदीप पारखी, स्वाती उलमले, गौरी बदकी, मानसी पवार या नव्या दमाच्या कलाकारांचा अभिनय आपल्याला या चित्रपटात पहायला मिळणार आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

Tender offers are invited online from Registered Contractors/ Companies/Agencies etc. towards Empanelment of Agencies for Infrastructure Development for release of new service connections and Empanelment of Agencies for Breakdown maintenance of DTC, HT lines and LT Lines for FY 2025-26 in **Ballarshah Division, Tender No. EE/Bshah/O&M/Div/2025-26/BDMaint/T-01 to T-03 and EE/Bshah/O&M/Div/2025-26/NSC/T-04.** The details of Tender & other relevant details is available from **Dt. 21.01.2025** at our website **www.mahadiscom.in.** The last date of submission is **12.02.2025 up to 11:00 hrs.** Any change in Version/ Corrigendum of Tender will be published on our website hereafter.

**Executive Engineer, O&M Division, MSEDCL, Ballarshah.**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-tender Notice**

Sealed and superscripted tender offers are invited online from Registered Contractor/ Companies etc. for **Empanelment of Agencies for Infrastructure Development for release of new service connections, Breakdown maintenance of LT Line, HT Line & Dist. Transformer in Chandrapur Division for total 4 Nos.** tenders. The details of Tender & other relevant details of E-Tender No. **EE/CH/T-04 to T-07** is available from **Dt. 22.01.2025**. At our website **www.mahadiscom.in**. The last date of submission is **07.02.2025. upto 11:00 hrs**. Any change in version/Corrigendum of Tender will be published on our website hereafter.

**Executive Engineer, O&M Division, MSEDCL, Chandrapur**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**NOTICE INVITING SHORT E-TENDER**

Proposal invited by this office from Registered., Reputed & Experienced Bidders/Agencies, Firms, Companies & Contractors in the prescribed Tender Form for the E-Tender for Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of HT overhead lines and underground cables, Breakdown Maintenance of LT overhead lines, LT underground cables, & Fuse calls and Breakdown Maintenance of Distribution Transformer Centre in Gadchiroli Division Gadchiroli Circle for vide **Tender No. EE/OANDM/DN/GAD/HTLINE/BM/2024-2025/T-13 (HT Line) EE/OANDM/DN/GAD/LTLINE/BM/2024-2025/T-14 (LT Line) EE/OANDM/DN/GAD/DTC/BM/2024-2025/T-15 (DTC)** repectively. This tender is available on **https://etender.mahadiscom.in/eatApp/website w.e.f.** Dt.20.01.2025 Upload the Tender-offer duly filled on or before **Dt.10.02.2025 up to 11:00 hrs.** Pre Bid Meeting is on **dt. 29.01.2025 at 15.00 hrs.** at Division Office Gadchiroli. The Tender will be opened on **Dt.10.02.2025 at 16:00 hrs.**, if possible. Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc., if any shall be available in our website only and will not be published in the Newspapers.

**Executive Engineer, Gadchiroli Division**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

Separate e-tenders are invited against tender no. **T-34** to **T-37** from Eligible Registered and Reputed Firms/Contractor/Agencies for the works detailed as under, **eTender for Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of LT, HT and overhead lines & underground cables, DTC and Infrastructure Development for release of new connections/ enhancement of load (RCI and others except Ag) in ACHALPUR** Division of AMRAVATI Circle & tender documents are available at our website **www.etender.mahadiscom.in** and is downloaded from our website from dt. **20.01.2025** onwards. No hard copy of tender will be provided. Any change in e-tender schedule, corrigendum etc shall also be put up on website. Prospective bidders are therefore requested to regularly check the website for updates. Submit the Tender through e-tendering process only latest by dt. **10.02.2025** upto **11:00 hrs.** While submitting the Tender, please attach the Tender fee stated above and EMD in the form of Cash/Demand Draft in favor of **Executive Engineer**, MSEDCL, O&M Division, Achalpur. Technical Bid will opened on **Dt. 10.02.2025 @16:00 hrs** & Prize bid will be opened on **Dt. 03.03.2025,** if possible. **Contact person:** - Dy Ex. Engineer (O), Achalpur. **Tel. No. 7875763690.**

**Executive Engineer MSEDCL, O&M Division, Achalpur**

**AMZ PRO/16**

**सा.बां. विभाग शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्रक्र८/इमा-२ दिनांक २७ सप्टेंबर, २०१८**

**प्रपत्र - १**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद**

**पत्ता :- पुसद दिग्रस रोड, रामदेवबाबा पेट्रोल पंपाजवळ, पुसद**

**ई मेल पत्ता :- pusad.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्र. ०७२३३/२४६५५३/फॅक्स क्र. ०७२३३/२४६३३५**

**ई निविदा सुचना क्रमांक ४८ / २०२४-२०२५ जा. क्र. १९८ /निली/दि. १३/०१/२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामा करीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑन लाईन) निवीदा मागवित आहेत. निवीदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. तसेच निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निवीदा स्विकारली जाणार नाही.

| ई-निविदा काम क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष | इसारा बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | कालावधी पावसाळ्या सह | वर्गीकृत कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **खालील काम क्रं. १ ते ३ कामे खुली निविदे करीता** | | | | | | |
| १) | सार्वजनक बांधकाम उपविभाग उमरखेड कार्यालयाच्या नविन ईमारतीचे बांधकाम करणे ता. उमरखेड | १२५.०० | १२५०००.०० | रु १०००/- + जीएसटी = ११८०/- | ३०० दिवस | वर्ग-४ व वरील |
| २) | मौजे महागाव नगरपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यापासून ते प्रभाग क्रं.१ मधील स्वामी समर्थ मंदिराकडे जाणारा सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉकसह नाली बांधकाम करणे (दुसरी वेळ) | १२.०० | १२०००.०० | रु ५००/- + जीएसटी =५९०/- | १८० दिवस | वर्ग-६ व वरील |
| ३) | मौजे महागाव नगरपंचायत हद्दीतील श्री दत्तराव इंगोले यांच्या घरापासून ते कन्याशाळे समोरील रोडपर्यंत पेव्हर ब्लॉकसह नाली बांधकाम करणे (दुसरी वेळ) | ११.०० | ११०००.०० | रु ५००/- + जीएसटी =५९०/- | १८० दिवस | वर्ग-६ व वरील |
| **खालील काम क्रं. ४ ते ६ कामे मजुर कामगार सहकारी संस्थे करीता** | | | | | | |
| ४) | मौजे ग्रा.पं. निंबी ता. पुसद अंतर्गत कवडीपुर येथील हिंदू स्मशानभुमीचे बांधकाम करणे व सौंदर्यीकरण करणे (दुसरी वेळ) | १३.०० | १३०००.०० | रु ५००/- + जीएसटी =५९०/- | १८० दिवस | वर्ग - ब |
| ५) | मौजे ग्रा.पं. गायमुखनगर ता. पुसद येथे ग्रा.पं. चे खुल्या जागेत नागेश्वर महादेव मंदिराजवळ सभागृहाचे बांधकाम करणे (दुसरी वेळ) | १३.०० | १३०००.०० | रु ५००/- + जीएसटी =५९०/- | १८० दिवस | वर्ग - ब |
| ६) | नगर परीषद पुसद येथील प्रभाग क्र.१४ मध्ये श्री बाळु सोमवार ते जयवंतराव पाटील ते जयंत चिद्दरवार यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे | २५.०० | २५०००.०० | रु ५००/- + जीएसटी =५९०/- | १०० दिवस | वर्ग - ब |

ई-निवीदा उपलब्ध कालावधी :- संकेत स्थळावरील शेडयुल नुसार

निवीदा पूर्व बैठक :- संकेत स्थळावरील शेडयुल नुसार

ई-निवीदा उघडणे :- संकेत स्थळावरील शेडयुल नुसार

**खालील संकेतस्थळावर ई-निवीदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.**

**1. http:/mahapwd.gov.in**

**2. http:/mahatenders.gov.in**

**( सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**

३. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद कार्यालयातील सूचना फलक.

जावक क्रमांक १९८/निली/दि १३/०१/२०२५

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद

**(प्रिया पुजारी)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद**

DGIPR 2024-25/C5770

# नायजेरियाने न्यूझीलंडला केले स्पर्धेतून 'आउट'

## अंडर १९ महिला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत मोठी उलथापालथ

**वृत्तसंस्था/क्वालालांपूर**

अंडर १९ महिला वर्ल्ड कप स्पर्धेत नायजेरियाच्या संघाने मोठी उलथा पालथ केलीये. लिंबू टिंबू वाटणाऱ्या संघाने न्यूझीलंड महिला अंडर -१९ संघाला वर्ल्ड कप स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. पावसाच्या व्यत्ययानंतर निकाली लागलेल्या सामन्यात नायजेरियाच्या अंडर १९ महिला संघाने दोन धावांनी विजय मिळवत क्रिकेट जगताचे लक्षवेधून घेतले आहे. नायजेरिया संघ पहिल्यांदाच मोठ्या स्पर्धेसाठी पात्र ठरला असून त्यांनी पदार्पणाच्या स्पर्धेत मोठी कामगिरी नोंदवली आहे.



मलेशियाच्या मैदानात महिला अंडर-१९ टी- २० वर्ल्ड कप स्पर्धा सुरु आहे. न्यूझीलंड संघाला या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पराभूत केले होते. त्यानंतर आता नायजेरिया विरुद्ध दुसरा पराभव स्वीकारावा लागल्यामुळे किवी संघाचा स्पर्धेतील प्रवासच संपुष्टात आला. पहिल्यांदा बॅटिंग करताना नायजेरियाच्या संघाने सहा विकेट्सच्या मोबदल्यात ६५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंड महिला संघ सहा विकेट्सच्या मोबदल्यात फक्त ६३ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

### १३ षटकांच्या सामन्यात न्यूझीलंडचे 'वाजले बारा'

**न्यूझीलंडच्या संघाने टॉस जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. नायजेरियाकडून कॅप्टन लकी पायटी हिने २२ चेंडूत १८ धावा केल्या. याशिवाय लिलियन उडेह हिने २५ चेंडूत संघाच्या धावसंख्येत १९ धावांची भर घातली. पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना १३ षटकांचा खेळवण्यात आला. नायजेरियाने या १३ षटाकात सहा विकेट्सच्या मोबदल्यात ६५ धावा केल्या होत्या. नायजेरियाच्या संघाने दिलेल्या ६६ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंड संघाची सुरुवातच खराब झाली. पहिल्या १३ चेंडूत न्यूझीलंडच्या डावाची सुरुवात करणाऱ्या दोघी पॅव्हेलियनमध्ये परतल्या. संघाच्या धावलकावर यावेळी फक्त ७ धावा लागल्या होत्या. सुरुवातीच्या धक्क्यातून सावरण्यासाठी मध्यफळीतील फलंदाजांनी संघाचा डाव सावरला. पण विजयाचे लक्ष्य गाठण्यात संघ अपयशी ठरला. लिंबू टिंबू संघाने क्रिकेटची मोठी परंपरा असलेल्या संघाला वर्ल्ड कप स्पर्धेतून बाहेर काढले.**

# ऋषभ पंत लखनौ सुपर जायंट्सचा नवा कर्णधार



**आयपीएल २०२५ साठी लखनौचा संपूर्ण संघ :** निकोलस पूरन, रवी बिश्नोई, मयंक यादव, मोहसिन खान, आयुष बदोनी, ऋषभ पंत, डेव्हिड मिलर, एडेन मार्कराम, मिशेल मार्श, आवेश खान, अब्दुल समद, आर्यन जुयाल, आकाश दीप, हिम्मत सिंग, एम. सिद्धार्थ, दिग्वेश सिंग, शाहबाज अहमद, आकाश सिंग, शमर जोसेफ, प्रिन्स यादव, युवराज चौधरी, राजवर्धन हंगरगेकर, अर्शीन कुलकर्णी, मॅथ्यू ब्रीट्झके

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारताचा स्टार यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत याची लखनौ सुपर जायंट्सचा नवा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पंतला कर्णधार बनवल्याची घोषणा एलएसजीचे मालक संजीव गोयंका यांनी सोमवारी (दि. २०) केली. मेगा लिलावात पंतला एलएसजीने २७ कोटी रुपयांना खरेदी केले होते. यासह तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. गोयंका यांनी पंतवर विश्वास व्यक्त करण्याचे कारणही स्पष्ट केले. पंत एक महान खेळाडू आहे. तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वोत्तम कर्णधार बनू शकतो,अशी भविष्यवाणी त्यांनी वर्तवली.

ऋषभ पंत २०१६ पासून दिल्ली कॅपिटल्सकडून खेळत होता. २०२१ पासून तो तीन वर्षे त्याने दिल्ली संघाचे नेतृत्व केले. पण ३० डिसेंबर २०२२ रोजी त्याचा भीषण अपघात झाला, ज्यानंतर तो २०२३ च्या हंगामात खेळू शकला नाही. पंतने २०२४ च्या हंगामात पुनरागमन केले. पण या हंगामानंतर डीसीने त्याला रिलीज केले. यानंतरच्या आयपीएल मेगा लिलावात एलएसजीने त्याला २७ कोटी रुपयांमध्ये विकत घेतले. आतापर्यंत तीन खेळाडूंनी एलएसजीचे नेतृत्व केले आहे. आता त्यांना ऋषभ पंतच्या रूपात चौथा कर्णधार मिळाला आहे. पंतसाठी हे आव्हान सोपे असणार नाही.

## ऑस्ट्रेलियन ओपन : बोपण्णा-शुई उपांत्यपूर्व फेरीत



**वृत्तसंस्था/मेलबर्न**

भारताचा दिग्गज टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि त्याचा चीनी जोडीदार झँग शुई यांनी ऑस्ट्रेलियन ओपनच्या मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. दरम्यान, रविवारी दुसऱ्या फेरीच्या सामन्यात या जोडीला वॉकओव्हर मिळाला. बोपण्णा-शुई जोडीचा सामना युनायटेड स्टेट्सचा टेलर टाऊनसेंड आणि मोनॅकोच्या ह्युगो न्यास यांच्याशी होणार होता. मात्र या सामन्यात वॉकओव्हर मिळाल्याने भारत-चीन जोडीने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

टिमिया बाबोस- मारसिलो अॅरेवालो आणि ऑस्ट्रेलियन जोडी ऑलिव्हीया गडेकी-जॉन पिर्स यांच्यात सामना होणार आहे. त्यांच्यातील विजेत्या जोडीशी बोपण्णा आणि शुई यांचा पुढचा सामना होणार आहे.बोपण्णा-शुईने स्पर्धेची सुरुवात दणक्यात केली. स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात फ्रान्स-क्रोएशियाच्या जोडीला ६-४, ६-४ असे पराभूत करत त्यांनी आगेकूच केली.

# भारताचा गोल्डन बॉय निरज चोप्राने बांधली लग्नगाठ!

## फोटो शेअर करत दिली चाहत्यांना आनंदाची बातमी

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारताचा गोल्डन बॉय आणि स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याने रविवारी (दि.१९) हिमानी या मुलीशी लग्नगाठ बांधली. त्याने स्वतः सोशल मीडियावर लग्नाचे फोटो शेअर करत आपल्या चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली आहे.

त्याने इंस्टाग्रामवर आपल्या लग्नाचे फोटो शेअर करत एक पोस्ट लिहली आहे. त्यामध्ये त्याने म्हटले आहे की, माझ्या कुटुंबासोबत आयुष्याचा एक नवीन अध्याय सुरू झाला आहे. आम्हाला एकत्र आणणाऱ्या प्रत्येकांचा मी आभारी आहे. शेवटी त्याने आपले व हिमानीचे नाव लिहिले आणि मध्यभागी एक हृदयाचा इमोजी देखील दिला आहे. गुपचूप लग्न उरकताना त्याचे काही नातेवाईक या लग्नसमारंभाला उपस्थित होते. नीरज चोप्राची पत्नी हिमानी सध्या अमेरिकेत शिक्षण घेत असून ती न्यू हैम्पशायरमधील फ्रँकलिन पियर्स विद्यापीठात स्पोर्ट्स मॅनेजमेंट शिकत आहे. तिने याआधी दिल्लीतील मिरांडा हाऊस येथे राज्यशास्त्र आणि शारीरिक शिक्षण या विषयात पदवी घेतली होती.



### टोकियो ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक तर पॅरिस ऑलिंपिकमध्ये रौप्यपदक नीरजच्या नावावर

टोकियो ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या नीरजने पॅरिस ऑलिंपिकमध्ये रौप्यपदक जिंकले. सलग दोन ऑलिंपिकमध्ये पदके जिंकणारा तो पहिला भारतीय ट्रॅक अँड फील्ड खेळाडू आहे. नीरजने पॅरिस ऑलिंपिकमध्ये ८९.४५ मीटर अंतर भालाफेक करून रौप्य पदक जिंकले. नीरज दुसऱ्या स्थानावर होता. दरम्यान, पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ९२.९७ मीटर भालाफेक करून सुवर्णपदक जिंकले.

## तब्बल १० वर्षांनी रोहित शर्मा खेळणार रणजी

**वृत्तसंस्था/मुंबई**

भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत नसताना बीसीसीआयने त्यावेळी सुरू असलेल्या देशांतर्गत स्पर्धेत खेळण्याची सक्ती सर्व खेळाडूंना लागू केली आहे. त्यामुळे आता भारताचा कर्णधार रोहित शर्मा तब्बल १० वर्षांनी मुंबईकडून रणजी स्पर्धेत खेळताना दिसणार आहे. २३ जानेवारीपासून बीकेसी येथील शरद पवार अकादमीच्या मैदानावर होणाऱ्या जम्मू आणि काश्मीर संघाविरुद्धच्या साखळी लढतीसाठी आपण उपलब्ध असू, असे रोहितने स्वतःच सांगितले. २३ ते २६ जानेवारी या कालावधीत हा सामना झाल्यावर ३० जानेवारीपासून मुंबईची मेघालयविरुद्ध लढत होणार आहे. या सामन्यातही रोहित खेळणार का, हे पाहणे रंजक ठरेल. रणजी स्पर्धेतील साखळी सामने ४ दिवसांचे असतात. त्यामुळे ही लढत २ फेब्रुवारीपर्यंत लांबू शकते. त्यानंतर ६ फेब्रुवारीपासून इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय मालिका सुरू होणार असून मालिकेच्या किमान ३-४ दिवसांपूर्वी भारतीय संघ नागपूरला रवाना होणे अपेक्षित आहे. रणजी स्पर्धेत खेळणार का, असे पत्रकार परिषदेत विचारले असता रोहितने फक्त 'हो, मी खेळेन', असे म्हणत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. काही दिवसांपूर्वीच रोहित मुंबईच्या रणजी संघासह सराव करतानासुद्धा दिसला होता. न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया संघाविरुद्धच्या कसोटी मालिकेत अपयशी ठरल्यामुळे रोहितच्या भारतीय कसोटी संघातील स्थानावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. सिडनीतील पाचव्या कसोटीत रोहितने स्वतःहून संघाबाहेर राहण्याचा निर्णयही घेतला.

# शमीने पट्टी बांधून केला सराव

## १४ महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन

**वृत्तसंस्था/कोलकाता**

मोहम्मद शमी डाव्या गुडघ्यावर पट्टी बांधून कोलकाता येथे सरावासाठी आला होता. इंग्लंडविरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेत शमीचा टीम इंडियात समावेश आहे. १४ महिन्यांच्या दीर्घ कालावधीनंतर तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतला आहे. २०२३ मध्ये भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने १९ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध अंतिम सामना खेळला. तेव्हापासून तो दुखापतीमुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतील पहिला सामना २२ जानेवारीला कोलकाता येथे होणार आहे.

दरम्यान, इंग्लंडविरुद्धच्या सलामीच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाने रविवारी कोलकाता येथे तीन तास सराव केला. शमीने एका तासाहून अधिक वेळ पूर्ण लयीत गोलंदाजी केली. त्याने डाव्या गुडघ्यावर पट्टी बांधली आणि गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्नी मॉर्केलच्या देखरेखीखाली हळू गोलंदाजी केली, सुरुवातीला लहान धाव आणि नंतर पूर्ण धाव आणि वेग वाढवून गोलंदाजी केली. सुमारे तासभर गोलंदाजी केल्यानंतर क्षेत्ररक्षणाच्या सरावातही भाग घेतला. त्याने अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा सारख्या युवा फलंदाजांना त्याच्या वेगवान आणि अचूक लाईन लेन्थने त्रास दिला. यादरम्यान यष्टीरक्षक फलंदाज ध्रुव जुरेलने त्याच्याविरुद्ध काही आक्रमक फटके मारले. गोलंदाजीचा सराव संपल्यानंतर त्याने गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्नी मॉर्केल यांच्याशी चर्चा केली.

### शमीने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली

रणजी ट्रॉफीच्या पहिल्या फेरीत मध्य प्रदेश विरुद्ध बंगालच्या सामन्यातून शमी दुखापतीनंतर परतला. तो सय्यद मुश्ताक अली आणि विजय हजारे ट्रॉफी देखील खेळला. शमीवर जानेवारी-२०२४ मध्ये इंग्लंडमध्ये घोट्यावर शस्त्रक्रिया झाली होती. गेल्या अनेक महिन्यांपासून शमी बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या पुनर्वसन शिबिरात होता.

# इस्त्रायलने ९० पॅलेस्टिनी कैद्यांची केली सुटका

## हमासच्या कैदेतून तीन इस्त्रायली ओलिसांची सुटका



**वृत्तसंस्था/तेल अवीव/रामल्ला**

इस्त्रायल आणि हमास यांच्यात गेल्या १५ महिन्यांपासून सुरू असलेले युद्ध रविवारी, १९ जानेवारीला थांबले आहे. युद्धबंदीच्या पहिल्याच दिवशी इस्त्रायलने ९० पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली आहे. या बदल्यात हमासने तीन इस्त्रायली महिला ओलिसांचीही सुटका केली आहे. रोमी गोनेन, एमिली डमारी आणि डोरोन स्टेनब्रेचर अशी त्यांची नावे आहेत. रेड क्रॉसच्या मदतीने तिन्ही ओलीसांना इस्त्रायलमध्ये परत आणण्यात आले.

ओलीस परत आल्यावर इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू म्हणाले की, संपूर्ण देश तुम्हाला मिठी मारत आहे. सुटकेनंतर पॅलेस्टाईन आणि इस्त्रायल या दोन्ही ठिकाणी लोकांनी आनंदोत्सव साजरा केला. युद्धविराम जाहीर झाल्यानंतर, इस्त्रायलच्या कडक नाकेबंदीदरम्यान सहाशेहून अधिक ट्रक मानवतावादी मदत घेऊन गाझाला पोहोचले. युद्धग्रस्त भागातून पॅलेस्टिनी नागरिक त्यांच्या घरांची पाहणी करण्यासाठी आणि नातेवाईकांना दफन करण्यासाठी परतत आहेत.

### युद्धविराम करार तीन टप्प्यात होईल पूर्ण

१५ जानेवारी रोजी जो बायडेन म्हणाले की, हा करार १९ जानेवारीपासून म्हणजे रविवारपासून तीन टप्प्यांत सुरू झाली. यामध्ये ४२ दिवस ओलिसांची अदलाबदल केली जाईल.

**पहिला टप्पा :** गाझामध्ये १९ जानेवारी ते १ मार्चपर्यंत संपूर्ण युद्धविराम असेल. हमास ३३ इस्त्रायली ओलीस सोडणार आहे. इस्त्रायल आपल्या एका ओलिसाच्या बदल्यात दररोज ३३ पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका करेल. प्रत्येक इस्त्रायली महिला सैनिकामागे ५० पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली जाईल.

**दुसरा टप्पा :** पहिल्या टप्प्याच्या १६व्या दिवशी म्हणजे ३ फेब्रुवारीपर्यंत सर्व काही सुरळीत राहिल्यास दुसऱ्या टप्प्याच्या योजनेवर चर्चा सुरू होईल. या काळात कोणताही हल्ला केला जाणार नाही. जिवंत राहिलेल्या ओलिसांची सुटका केली जाईल. इस्त्रायल १,००० पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका करेल, ज्यात १५ वर्षांपेक्षा जास्त काळ शिक्षा भोगत असलेल्या सुमारे १९० कैद्यांचा समावेश आहे.

**तिसरा टप्पा :** या कराराच्या शेवटच्या टप्प्यात गाझाचे पुनर्वसन केले जाईल. यासाठी ३ ते ५ वर्षे लागतील. हमासच्या ताब्यातून मारल्या गेलेल्या ओलीसांचे मृतदेहही इस्त्रायलकडे सोपवण्यात येणार आहेत.

# यून सुक येओल यांना औपचारिकपणे अटक

**वृत्तसंस्था/सेऊल**

दक्षिण कोरियाचे निलंबित अध्यक्ष यून सुक येओल यांना शनिवारी औपचारिक अटक करण्यात आली. त्याबरोबर त्यांच्या समर्थकांनी दंगल करायला सुरुवात केली. मार्शल लॉ लागू करण्याबाबतच्या चौकशी दरम्यान विचारलेल्या प्रश्नांना उत्तर न देण्यावर यून अजूनही ठाम आहेत. तसेच या अटक वॉरंटला न्यायालयात आव्हान दिले जाणार असल्याचेही यून यांच्या वकिलांनी म्हटले आहे.

यून यांना बुधवारी ताब्यात घेतल्यापासून तपास अधिकाऱ्यांनी त्यांना स्थानबद्ध ठेवले होते. शनिवारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आल्यावर त्यांच्या औपचारिक अटकेसाठीचे वॉरंट न्यायालयाने बजावले. त्यानंतर औपचारिक अटकेची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. औपचारिक अटक करण्यात आल्यामुळे आता यून यांना महिनाभर किंवा त्यापेक्षाही जास्त कालावधीसाठी कोठडीमध्ये ठेवले जाऊ शकणार आहे. या कालावधीमध्ये मार्शल लॉ लागू करण्यामागील नेमके कारण, बंडखोरी करण्याचा हेतू, अध्यक्षीय सुरक्षा रक्षकांकडून अटकेची अंमलबजावणी करण्यामध्ये आणला गेलेला अडथळा आणि यून यांच्या पत्नीशी संबंधित भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचीही चौकशी केली जाणार आहे.

## मार्शल लॉ आणि बंडखोरीबद्दल वॉरंट बजावले



### यून समर्थकांकडून दंगल

यून यांच्या अटकेनंतर राजधानी सेऊलमधील वेस्टर्न डिस्ट्रीक्ट न्यायालयाच्या आवारातच यून समर्थकांनी दंगल घडवायला सुरुवात केली. यून समर्थकांनी न्यायालयाच्या आवारात घुसून तोडपोड केली. न्यायालयाचे मुख्य दार आणि खिडक्याही फोडल्या गेल्या. पोलिसांवर मिळेल त्या वस्तू आणि अग्निशामक उपकरणेही फेकली गेली. फर्निचर आणि ऑफिस मशीन्सची नासधूस केली गेली. काचेचे दरवाजे फोडले गेले आणि संगणक सर्व्हरवर पाणी फवारले गेले. पोलिसांनी बळाचा वापर करून या आंदोलकांना हुसकावून लावले. यून यांच्याविरोधात अटक वॉरंट बजावणाऱ्या न्यायाधीशांना हे आंदोलक शोधत होते.

यून यमर्थकांच्या हुल्लडबाजला आवर घालण्यासाठी शेकडो पोलिस अधिकारी तैनात करण्यात आले आणि जवळपास ९० निर्दशकांना अटक करण्यात आली. यून यांच्याकडून पुरावे नष्ट केला जाण्याचा प्रयत्न केला गेल्याचे न्यायालयानेही म्हटले आहे.

## अमेरिकेत भारतीय विद्यार्थ्याची गोळ्या घालून हत्या

**वॉशिंग्टन :** अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थ्याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. हा विद्यार्थी पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत होता. वॉशिंग्टन डीसीमध्ये त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. यात त्याचा मृत्यू झाला. हत्या करण्यात आलेला विद्यार्थी हैदराबादचा रहिवासी आहे. त्याचे नाव रवी तेजा असे असून, पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेण्यासाठी तो अमेरिकेत गेला होता. रवी तेजा याच्यावर एका गॅस स्टेशनजवळ गोळ्या झाडण्यात आल्या.

# नायजेरियात गॅस टँकरच्या स्फोटात ७० ठार

**वृत्तसंस्था/अबुजा**

नायजेरियामध्ये एका गॅस टँकरचा स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेमध्ये किमान ७० जण ठार झाले आहेत. नायजेरियाच्या आपत्कालिन प्रतिसाद एजन्सीने ही माहीती दिली आहे. उत्र मध्य नायजेरियातल्या नायजेर प्रांतात सुलेजा शहराजवळ शनिवारी पहाटेच्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे.

दुर्घटनाग्रस्त झालेल्या गॅसोलाईन टँकरमधून जनरेटच्या मदतीने गॅसोलाईन इंधन दुसऱ्या टँकरमध्ये हलवण्यात येत होते. त्यादरम्यान हा स्फोट झाला. या स्फोटाच्यावेळी टँकर जवळ अनेक लोक जमा झाले होते. तसेच गॅसोलाईन दुसऱ्या टँकरमध्ये हलवणारे अनेक कर्मचारी देखील होते. हे सर्वजण या गंभीर स्फोटात मरण पावले, असे राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन संस्थेचे हुसैनी इसाह यांनी सांगितले. स्फोटानंतर अनेक जण दूरवर फेकले गेले. त्यामुळे घटनास्थळी मदत आणि बचावाबरोबर अनेकांचा शोध देखील सुरू करण्यात आल्याचे इसाह यांनी सांगितले.

# अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्यवसाय आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत






**वृत्तसंस्था/न्यूयॉर्क**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी बाजी मारली आहे. ते आता दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले आहेत. ट्रम्प हे अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष असतील. ट्रम्प हे त्याचे राजकीय जीवन, व्यवसाय आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतात. ट्रम्प यांचे वैयक्तिक आयुष्यही अनेकदा वादात सापडले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी तीन वेळा लग्न केले असून त्यांना पाच मुले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या पाच मुलांची नावे डोनाल्ड जॉन ट्रम्प जूनियर, इव्हांका, एरिक, टिफनी आणि बॅरॉन अशी आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या पत्नीचे नाव इव्हाना ट्रम्प होते. दुसरी पत्नी मारला मॅपल्स आणि सध्याची पत्नी मेलानिया ट्रम्प आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आईचे नाव मेरी आणि वडिलांचे नाव फ्रेडरिक ट्रम्प होते. त्यांच्या आईचा जन्म स्कॉटलंडमध्ये झाला होता तर वडील न्यूयॉर्कमध्ये जन्मले होते. मेरी आणि फ्रेडरिक यांना देखील पाच मुले होते. ज्यामध्ये ट्रम्प हे चौथे आहेत. ट्रम्प यांना दोन भाऊ आणि दोन बहिणी असून एका भावाचा मृत्यू झालाय. ट्रम्प यांनी १९६८ मध्ये व्हार्टन स्कूलमधून अर्थशास्त्रात पदवी प्राप्त केली होती. त्यानंतर त्यांनी वडिलांच्या रिअल इस्टेट व्यवसायात प्रवेश केला. दोघांनी एकत्र काम करून आपल्या नावाल ब्रँड बनवले. ट्रम्प यांनी २००४ मध्ये 'द अप्रेंटिस' हा टीव्ही रिॲलिटी शो सुरू केला होता. खुद्द ट्रम्प यांनी याचे आयोजन केले होते.

विशेष म्हणजे, डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१६ नंतर दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षपद भूषवविले आहे. या आठ वर्षांत, म्हणजे २०१६ ते २०२४ पर्यंत, ट्रम्प कुटुंबात खूप बदल झाले आहेत. त्यांचा धाकटा मुलगा बॅरन, जो डोनाल्ड ट्रम्प पहिल्यांदा अध्यक्ष झाले तेव्हा १० वर्षांचा होता, तो आता १८ वर्षांचा आहे आणि व्यवसायाचा अभ्यास करत आहे. त्यांची नात काईनेही आता सोशल मीडियावर स्वतःचे नाव कमावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी मेलानिया, त्यांची मुले डोनाल्ड ज्युनियर, इवांका, एरिक आणि टिफनी, बॅरन आणि १० नातवंडे आहेत.

### डोनाल्ड ट्रम्प यांनी तीन वेळा केले आहे लग्न

**डोनाल्ड ट्रम्प यांनी पहिले लग्न १९७७ मध्ये मॉडेल इवानासोबत केले. इवानापासून त्यांना डोनाल्ड ट्रम्प ज्युनियर, इवांका आणि एरिक अशी तीन मुले आहेत. . १९९२ मध्ये त्याचा इवानाशी घटस्फोट झाला. इवानासोबत घटस्फोट घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी १९९३ मध्ये अभिनेत्री मार्ला मॅपल्सशी लग्न केले. डोनाल्ड आणि मार्लाची मुलगी टिफनी आहे. डोनाल्ड आणि मार्ला देखील १९९९ मध्ये वेगळे झाले. त्यानंतर डोनाल्डने २००५ मध्ये स्लोव्हेनियामध्ये जन्मलेल्या माजी मॉडेल मेलानियाशी लग्न केले. डोनाल्ड आणि मेलानिया यांना बॅरॉन नावाचा एक मुलगा आहे.**

# चीन, भारताला भेट देऊ शकतात ट्रम्प

## जिनपिंग यांच्याशी झाली होती फोनवरून चर्चा

**वृत्तसंस्था/वॉशिंग्टन**

अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प चीनला भेट देऊ शकतात. चीनबरोबर अमेरिकेचे संबंध सुधारण्याच्या हेतूने हा दौरा असेल. त्याचबरोबर भारताला भेट देण्यासंदर्भात देखील ट्रम्प यांनी त्यांच्या सल्लागारांशी चर्चा केली आहे.

ट्रम्प यांनी अध्यक्षीय निवडणुकीत विजयी झाल्यानंतर चिनी वस्तूंवर अतिरिक्त आयात शुल्क लावण्याची धमकी दिली होती. मात्र आता चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी संबंध सुधारण्याच्या उद्देशाने चीनला भेट देण्याची तयारी ट्रम्प यांनी दाखवली आहे. तसेच ट्रम्प यांनी भारताला भेट देण्याची इच्छाही बोलून दाखवली आहे. गेल्या महिन्यात परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर अमेरिकेच्या भेटीवर गेले होते, तेंव्हा ट्रम्प यांच्या या संभाव्य भेटीच्या तयारीच्या दृष्टीने प्राथमिक चर्चा देखील सुरू झाली आहे, असे काही निकटवर्तीयांनी सांगितले. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि भारत सदस्य असलेल्या क्वॉड गटाची परिषद एप्रिल महिन्यात किंवा या वर्षाच्या अखेरीस भारतात होणार आहे. ट्रम्प यांच्याकडून पंतप्रधान मोदी यांना बैठकीसाठी व्हाइट हाऊसमध्ये निमंत्रित केले जाण्याची शक्यता देखील वर्तवली जाते आहे.